श्रीअक्कलकोटनिवासी

स्वामीसमर्थ

पदामृतसागर



श्रीस्वामीसमर्थ उत्सवमंडळ, मुंबई

श्रीअक्कलकोटनिवासी

स्वामीसमर्थ

पदामृतसागर

आवृत्ति ४ थी

श्रीस्वामीसमर्थ उत्सवमंडळ, मुंबई

सन १९६२ शके १८८४

—: प्रकाशक :—

वसंत मो. पुरव

श्रीस्वामीसमर्थ उत्सवमंडळ

ठाकुरद्वार, मुंबई २

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण

श्रीस्वामीसमर्थ उत्सवमंडळ,

ठाकुरद्वार, मुंबई नं. २

—: मुद्रक :—

लक्ष्मीबाई नारायण चौधरी

निर्णयसागर प्रेस, २६।२८

कोलभाट स्ट्रीट, मुंबई २

"श्रीस्वामीसमर्थ मंडळा" संबंधीं विशेष खुलासा

"श्रीस्वामीसमर्थ मंडळा" संबंधीं त्रोटक माहिती ह्य पदामृतसागराच्या प्रारंभीं अभंगरूपांत दिली आहे. परंतु त्यामुळें भाविक जनांस कळावें म्हणून श्रीस्वामीसमर्थ मंडळानें आजतागायत केलेल्या कार्यांची माहिती व हें मंडळ स्थापन करण्यास ज्या लहानथोर व्यक्तींनीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें मदत केली, त्यांचा उल्लेख झाला नाहीं. म्हणून तो येथें आम्ही करीत आहों.

सन १९०६ सालीं श्रीस्वामीसमर्थांच्या कांहीं भक्तमंडळींनीं एक मंडळ स्थापन करावयाचें ठरविलें. उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणें आम्हांस अशी माहिती मिळाली कीं, कै. शेठ द्वारकादास गंगादास, कै. वामनराव सोकरजी नवलकर, कै. बाळाजी हरिश्चंद्र तळपदे व कै. माधवराव विनायक नवलकर यांनीं प्रामुख्यानें त्यांत भाग घेतला. कै. शेठ द्वारकादास गंगादास हे ह्या मंडळाचे अध्यक्ष होते. दर गुरुवारीं सकाळीं अभिषेक, पूजा व रात्रौ महाराजांची आरती व पालखी हे कार्यक्रम होत असत. तसेंच दर शनिवारीं सायंकाळीं आरती

होत असे. दरवर्षी दत्तजयंती उत्सव, स्वामीपुण्यतिथीनिमित्त नामसप्ताह, गुरुपौर्णिमा, कोजागरी पौर्णिमा, गुरुद्वादशी वगैरे उत्सव साजरे केले जात असतां कै. वामनराव सोकरजी नवलकर, कै. बाळाजी हरिश्चंद्र तळपदे व कै. माधवराव विनायक नवलकर ह्या तीन सेवकांनीं आयुष्यभर मंडळाची फारच सेवा केली.

दिनांक १ जानेवारी १९४० रोजीं वरील मंडळाचें रुपांतर श्रीस्वामीसमर्थ उत्सवमंडळामध्यें झालें. तेव्हांपासून हें उत्सवमंडळ वरील सर्व कार्यक्रम श्रीसमर्थांच्या कृपेनें सुरळीत पार पाडीत आहे.

श्रीस्वामीसमर्थ पदामृतसागराच्या पूर्वी दोन आवृत्त्या प्रसिद्ध करण्यांत आल्या होत्या. तिसरी आवृत्ति प्रसिद्ध करतांना वाचकांना सुलभ व्हावें म्हणून ह्या उत्सवमंडळाच्या व्यवस्थापकांनीं नेहमीं म्हटल्या जाणाऱ्या आरत्या, पदें व अष्टकें क्रमांकानें दिलीं आहेत. त्याप्रमाणेंच ही चौथी आवृत्ति छापली आहे.

॥ श्रीस्वामीसमर्थ महाराज की जय ॥

व्यवस्थापक

श्रीस्वामीसमर्थ उत्सव मंडळ

प्रस्तावना

श्रीसद्गुरुकृपेनें प्रस्तुत 'पदामृतसागर' ग्रंथाची चतुर्थावृत्ति भक्तजनांच्या हातीं देण्याचा मंगल समय लाभला आहे. श्रीअक्कलकोटस्वामी समर्थ महाराज हे श्रीदत्तात्रेयांचे अवतार होत. भगवंताचे अवतारदेह आणि अवतारकार्य हीं दिव्य असतात. '**जन्म कर्म च मे दिव्यम्**' अजन्मा असून जन्म घेणाऱ्या आणि अकर्मा असून कर्म करणाऱ्या भगवंताची लीला दिव्य आहे. भक्तांचें परित्राण करण्यासाठीं आणि दुष्प्रवृत्तींचा विनाश करण्यासाठीं भगवान् 'स्वेच्छोपात्ततनु' धारण करितो; म्हणजेच इच्छेनुसार देह धारण करितो. श्रीएकनाथमहाराजांनीं भगवंतांचा 'लीलाविग्रह' म्हणून सांगितला तो हाच होय.

सामान्य देहधारी जनांच्या जन्म-कर्मांचे नियम भगवंतांच्या दिव्य लीलाविग्रहाला लागू नाहींत. श्रीनाथ भागवतांत म्हणतात—"**देहसंभवाचें मूळ जाण । स्थूल सूक्ष्म आणि कारण । यांसी नातळतां तूं श्रीकृष्ण । चतुर्भुज देह धरिसी ॥ नवल तुझा 'लीलाविग्रहो'। मत्स्य कूर्म श्वेतवराहो । होतां न धरिसी संदेहो । जन्मभयो तुज**

नाहीं ॥'' भगवंताच्या लीलाविग्रहाचें रहस्य अगम्य असतें. नाथ म्हणतात—''पारंगत वेदशास्त्रार्थी । बृहस्पत्यादि वाचस्पति । त्यांसी ही लीलाविग्रहस्थिति । न कळे निश्चितीं श्रीकृष्णा ॥''

श्रीअक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांच्या अवतारी लीलांचें रहस्य आम्हां अज्ञ जनांना असेंच अगम्य आहे. श्रीस्वामीमहाराजांचा जन्म कोठें व केव्हां झाला वगैरे माहिती त्यामुळेंच कोणासही माहीत नाहीं. महाराजस्वरूपांत श्रीदत्तात्रेय प्रकट झाले असेंच समाधान या बाबतींत करतां येण्याजोगें आहे. अर्थातच सामान्य प्राकृत जनांच्या चरित्राची एकही कसोटी श्रीस्वामींच्या चरित्रांत उपयोगी नाहीं. भगवच्चरित्र हें असेंच दिव्य आहे. म्हणून भगवत्कृपासंपादनार्थ भगवंतांचें नामस्मरण आणि त्यांच्या अवतारलीलाचरित्राचें गायन एवढेंच आपण करूं शकतों; आणि आपण एवढें कर्तव्य जरी नित्यनियमानें श्रद्धापूर्वक परिपालन केलें, तरी भगवत्कृपा प्राप्त होईल. प्रस्तुत ग्रंथांत श्रीदत्तावतार श्रीअक्कलकोट स्वामी समर्थ महाराज यांचीं नामभजनें, आरत्या, धांवे, अभंग, चरित्रलीला वगैरे सर्व प्रकार संग्रहीत केले आहेत.

श्रीअक्कलकोटस्वामी समर्थ महाराजांच्या दिव्य पादुका श्रीकृष्ण ठाकुरदास बुवांनी मुंबईला ठाकुरद्वारीं स्थापन केल्या. किंबहुना ठाकुरदास बुवांच्या नांवावरूनच ठाकुरद्वार असें नांव या स्थलाला रूढ झालें असें म्हटलें तरी चालेल. **गुरुलीलामृत** ग्रंथांत याविषयीं असा उल्लेख आहे कीं– श्रीकृष्ण ठाकुरदासबुवा हे श्रीअक्कलकोट स्वामीमहाराजांचे परमभक्त होते. श्रीकृष्ण ठाकुरदासबुवांच्या शरीराला एकदां कुष्ठव्याधि झाली होती. श्रीअक्कलकोटमहाराजांच्या कृपेनें ती व्याधि दूर झाली. **"एके दिवशीं समर्थें कीर्तनांत। चिलमीवरील काष्ठ जळत। अंगावरी फेंकिलें क्षणांत। ठाकुरदासांनीं तो प्रसाद स्वीकारिला ॥ प्रासादिक दग्धकाष्ठ उगाळून। बुवा सर्वांगासी करिती चर्चन। मास-पक्षांत समर्थकृपेंकरून। कुष्ठरोग नष्ट झाला" ॥** नंतर एके दिवशीं श्रीस्वामींनीं प्रसन्न होऊन आपल्या पादुका श्रीकृष्ण ठाकुरदासबुवांना दिल्या आणि म्हटलें, **"रघुनाथजी के संनिध हमकु नाचनेकु जगा रखो."** त्या पादुका श्रीकृष्ण ठाकुरदास बुवांनीं मुंबईस आणल्या. **"पुढें बुवांस मुंबापुरींत। भाऊ रसूल सावकार विख्यात। त्यांनीं स्थान बांधोनि दिधलें विस्तृत। ठाकुरद्वार सुंदर तें ॥ तेथें**

स्वामीमहाराजांच्या चरणपादुका । स्थापूनि गुरुमार्ग दाविती लोकां । माघ वद्य गुरुप्रतिपदेसी प्रत्येका । उत्साहा येती श्रीपुरीं" ही गोष्ट शके १७९२ (सन १८७०) सालीं म्हणजे श्रीस्वामींच्या समाधिकालापूर्वीं ८ वर्षें घडली. याच गुरुलीलामृत ग्रंथांतील ३३ वा अध्याय, 'अक्कलकोटस्वामिमहाराज यांचें चरित्र'-लेखक सदाशिव वामन मराठे, आणि प्रस्तुत ग्रंथांतील श्रीपादभूषणप्रकरण अध्याय १० यांच्या परिशीलनानें याविषयींची सविस्तर माहिती होईल. असो.

प्रस्तुत ग्रंथांत श्रीस्वामीमहाराज, श्रीकृष्ण ठाकुरदास बुवा व श्रीदत्तमूर्ति वगैरे छायाचित्रें दिलीं आहेत. त्या चित्रांचे ब्लॉकस् श्री. शेठ नगीनदासजी नालावाला, कै. श्री. वामनराव तळपदे, श्री. वसंत चिंतामण दिगासकर, श्री. हिराजी हरीभाऊ पोतदार वगैरे मंडळींनीं तयार करून दिले. निर्णयसागर मुद्रणालयाचे व्यवस्थापक, आणि तेथील कार्यकारी मंडळी यांनीं ग्रंथाचें अंतरंग व बहिरंग आकर्षक करण्याचे कामीं फारच परिश्रम घेतले. आणि ग्रंथाची पाठशुद्धि व मुद्रितें तपासण्याचे कामीं वे. शा. सं. विष्णु वासुदेव शास्त्री पणशीकर, ज्योतिर्विद् कृष्णाजी विठ्ठल सोमण आणि ह. भ. प. विठ्ठल अनंत बुवा सायनेकर यांनीं अत्यंत

साह्य केलें. याबद्दल या सर्व मंडळींचे आम्ही अंतःकरणपूर्वक आभार मानितों. आमची ही अल्पशी सेवा श्रीस्वामीसमर्थांचे चरणीं अर्पण असो.

श्रीस्वामीसमर्थ दत्तमंदिर ठाकुरद्वार, मुंबई २. श्रीस्वामीसमर्थ पुण्यतिथी चैत्र कृष्ण १३ बुधवार शके १८८४	श्रीस्वामीचरणरजसेवक **वसंत मो. पुरव**

॥ श्रीस्वामीसमर्थ मंडळ ॥

॥ अभंग ॥

शब्दांसी अज्ञात ज्ञानाज्ञानातीत। आहे नाहीं जेथ कांहीं नाहीं ॥ १ ॥ स्वरूपस्वरूप ज्ञानदेवादिक ॥ भोगिती जें सुख जीवन्मुक्त ॥ २ ॥ कृष्णदेवापरी खरा ब्रह्मवेत्ता। तयाचीच सत्ता चाले जेथें ॥ ३ ॥ आम्हां प्रापंचिकांसाठीं तें चिद्रूप। धरूनि स्वामिरूप प्रगटलें ॥ ४ ॥ अक्कलकोटीं केल्या नानाविध लीला ॥ दाविला सोहळा स्वानंदाचा ॥५॥ या हो या हो तरी प्रापंचिक जन । तयाच्या भजन-पूजनार्थ ॥ ६ ॥ भेद दुराग्रह नाहीं मीतूंपण । येथें स्वात्मार्पण समर्थास ॥ ७ ॥ उपासना भक्ति सुखें चाला-वया। समर्थांच्या पायां लावुं काया ॥ ८ ॥ याचि भावनेनें उदयालागीं येत। **श्रीस्वामीसमर्थ मंडळ** हें ॥ ९ ॥ **पौष शुद्ध षष्ठी** वार **सोमवार** । जो कीं तत्त्वसार शिवरूप ॥ १० ॥ **अठराशें सत्तावीस** शककाल । स्थापन मंडळ झालें तेव्हां ॥ ११ ॥ **पहिली जानेवारी एकोणीसशें सहा** ॥ इंग्रजीनें ये हा जन्मकाल ॥ १२ ॥

स्वामिसमर्थांचे मुंबापुरीं मठ । प्रति अक्कलकोट एक एक ॥ १३ ॥ या हो तरी या हो अहो भाविकांनो । आबालवृद्धांनो येथं या हो ॥ १४ ॥ हृदयमंदिरीं सगुण खेळवूं ॥ निर्गुण मेळवूं अनायासें ॥ १५ ॥ लुटूं भक्तिरस लुटूं ब्रह्मरस । होऊं समरस स्वरूपांत ॥ १६ ॥

॥ ग्रंथसमर्पण ॥

ग्रंथ पदामृत-सागर हा नामीं ।
नटले श्रीस्वामी स्वामीस्तव ॥ १ ॥
तयांचाच ग्रंथ तयांनींच केला ।
कुणीं हो कुणाला अर्पायाचा ॥ २ ॥
परी लौकिकार्थं ग्रंथ समर्पिला ।
स्वामीचरणाला भक्तजनीं ॥ ३ ॥
गंगेचेंचि पाणी गंगोदकीं द्यावें ।
तैसें हें म्हणावें ग्रंथार्पण ॥ ४ ॥


॥ श्रीस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

अनुक्रमणिका

कै. नाना रेखी जोशी यांनीं तयार केलेली

श्रीस्वामी समर्थांची कुंडली—

बहुधान्यनामसंवत्सरे शके १०७१ चैत्र शुद्ध द्वितीया गुरुवार अश्विनी नक्षत्र द्वितीय चरण प्रीति योग जन्म दोन घटिका दिवसास आद्यनाडी देवगण यजुर्वेदी ब्राह्मण काश्यपगोत्र (नृसिंहभान) टोपणनांव जन्मनांव चैतन्यस्वामी मेषराशि राशिस्वामी मंगळ.



निर्याणकाल—मंगळवार चैत्र वद्य १३ शके १८००

दुपारीं ४ वाजतां

आठ वर्षांचीं पंचांगें **श्रीस्वामी समर्थ गादी** या नांवाचीं आहेत. शके १७९५ ते ९८ गणपत कृ० प्रेस लहान साईज व १७९९ ते १८०२ पर्यंत जगदीश्वर छापखान्यांत मोठ्या आकाराचीं आढळतात.

शके १७९२ मध्यें स्वामिजयंती अक्कलकोट येथें सुरू केली.

वर्षफलाचे पानाची सुरवात—“ **श्रीस्वामी समर्थाय नमः** ”

“तथा श्रीमन्नृपशालिवाहनशके १०७१ शुक्लनाम संवत्सरे उदगयने वसंततौं चैत्रमासे शुक्लपक्षे २ तिथौ गुरुवासरे अश्विनी नक्षत्रे प्रीतियोगे श्रीमत् मार्तंडमंडलोदयात् गतघटी २ समये श्रीस्वामी जन्म । वर्तमानश्रीस्वामी वर्ष ७२८” असा मजकूर एका पंचांगांत आढळतो. तर **“अत्र वर्तमाने हिंदुस्थाने हस्तिनापुरक्षेत्रसमीपे छेलीखेड्याग्रामे श्रीस्वामी अवतार. वर्तमाने श्रीस्वामी समर्थ वर्ष ७२५”** असें शके १७९५ च्या पंचांगांत आहे.

श्रीस्वामीसमर्थांचे मठ

अक्कलकोट येथील मठ

१ श्रीगुरुमंदिर ऊर्फ बाळाप्पा महाराज मठ :-

ता. ८ ऑगस्ट १९०१ रोजीं या मठाची जागा संस्थानाकडून श्रींना मिळाली. श्रीसमर्थांच्या आज्ञेप्रमाणें येथें मठाची स्थापना झाली. स्वामींच्या चैतन्यपादुका, दंड, छाटी, कंठमणी, माळ इत्यादि वस्तु येथें आहेत.

२ वडाखालचा मठ :-ज्या वडाखालीं श्रीसमर्थ पुष्कळदां बसत असत व जेथें अवतारसमाप्ति केली त्या वडाखालीं मठ झाला आहे.

३ समाधीचा मठ :-येथें समर्थांची समाधी व चोळप्पांना दिलेल्या प्रासादिक पादुका आहेत. या दोनही मठांची व्यवस्था चोळप्पावंशजांकडे आहे. हें स्थान जागृत आहे.

४ राजे रायरायन् यांचा मठ :-हैद्राबादच्या लक्षाधीशांचा ब्रह्मसमंध व क्षयरोग श्रीसमर्थांच्या कृपेनें नष्ट झाल्यानें त्यांनीं श्रींच्या आज्ञेनें हा मठ गांवाबाहेर बांधिला.

५ जोशीबुवांचा मठ :-चिंतोपंत टोळ यांना श्रीसमर्थांनीं पाटावर आपलीं पाउलें उमटवून दिलीं होतीं. तो परमपूज्य ठेवा जोशीबुवांचे घराजवळ श्रींचे मठांत आहे.

पुणें येथील मठ :-

६ ग्लोब टॉकीजजवळ :-श्रींचा मठ आहे. या मठांत श्रींची कमरेवर एक हात ठेवलेली उभी संगमरवरी मूर्ति, औदुंबरवृक्ष, तसेंच श्रीसमर्थांच्या प्रासादिक चर्म-पादुका आहेत.

७ भटांचा वाडा :-६६८ सदाशिव पेठ, येथें श्रींचें देवस्थान आहे.

८ शिवाजीनगर, रोकडोबाचे मंदिराजवळ :- श्री. गोविंदजी डांगे या तरुण स्वामिभक्तानें सुमारें दोन वर्षां-पूर्वीं स्वगृहीं श्रीसमर्थांच्या चांदीच्या पादुका स्थापिल्या आहेत.

मुंबई येथील मठ :-

९ खाडिलकर रोड :-स्वामिसुतांनीं स्थापन केलेला हा सुप्रसिद्ध मठ होय. श्रींच्या पादुका येथें आहेत.

१० दादर :-हा मठ समर्थांचे प्रशिष्य (श्रीतातमहा-राजांचे शिष्य) सुरतेचे बाळकृष्ण महाराज यांनीं डी. एल्. वैद्य रोडला स्थापन केला आहे.

११ ठाकुरद्वार :-श्रीकृष्णबुवा (बापूबुवा) ठाकुरदास यांचें कुष्ठ श्रीकृपेनें नाहींसें झाल्यावर श्रींनीं आपल्या पादुका त्यांना देऊन 'श्रीरघुनाथजीके संनिध हमकु नाचनेकु जगा रखो' अशी आज्ञा केल्यामुळें मुख्य काळ्यारामाच्या देव-

स्थानानजीक छोट्याशा मंदिरांत या स्थापन केल्या आहेत. श्रीदत्तजयंती, चैत्र कृ. १३ पुण्यतिथीचे वेळीं नामसप्ताह, दर गुरुवारीं अभिषेक, आरती, पालखी, तीर्थप्रसाद होत असतो.

१२ महालक्ष्मी :–श्री॰ विनायकराव वासुदेव आगास्कर श्रीकृपेंतले होते. 'पत्थरावर पैसे ठोक' अशी आज्ञा झाल्यावर शके १८१४ मध्यें महालक्ष्मीचे समुद्रकांठीं एका लहानशा संगमरवरी मंदिरांत या पादुका स्थापना केलेल्या आहेत.

१३ चेंबूरः–स्वामिसुतांची कन्या सिद्धाबाई यांनीं हा मठ स्थापन केला आहे.

अन्य ठिकाणचे मठः–

१४ ताथवडें :–श्रीबाळाप्पा महाराज श्रीपादुका घेऊन संचार करीत असतां कोल्हापुर मुक्कामीं श्री. वामनराव घाणेकर यांजवर त्यांची कृपादृष्टि होऊन त्यांस सिद्धी प्राप्त झाली व त्यांनीं पुण्याजवळ ताथवडें येथें श्रींचा मठ स्थापिला.

१५ मैंदरगी :–अक्कलकोट नजीक तीन कोसांवर एका मुसलमान जमादारानें श्रींचें मंदिर बांधून पादुका स्थापिल्या.

१६ शिवडाव :–श्रीवामनमहाराजांचे शिष्य श्रीदाजी महाराज ऊर्फ कैवल्याश्रमस्वामी यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांत शिवडाव येथें '**परमार्थसाधनालय**' मठ स्थापिला.

१७ जालना (मराठवाडा):–हा मठ श्रीबाळाप्पांनीं शके १८२३ सन १९०१ मध्यें स्थापन केला.

१८ मूर्तिजापुर:–श्रीबाळाप्पा महाराजांचे आशीर्वादानें गजांतलक्ष्मीवारस झाला म्हणून श्री. नारायणराव जमादार यांनीं येथें मठस्थापना केली.

१९ उमरेड (नागपुर):–छत्तिसगड प्रदेशांत विलासपुर या गांवीं श्री. बाळाप्पांचा मुक्काम असतांना श्री. नारायणराव बानेरकरांना त्यांच्या अलौकिकत्वाचा कांहीं अनुभव येऊन त्यांनीं उमरेड येथें मठ स्थापन केला.

२० बडोदें:–येथें सूरसागरजवळ श्रींची संगमरवरी मूर्ति स्थापन झाली आहे.

२१ सुरत:–श्रीबाळकृष्ण महाराजांनीं इ. स. १९११ मध्यें हा मठ स्थापन केला आहे.

२२ वेंगुर्लें, कँप–(धावडें):–श्रीसमर्थांचे आनंदनाथ नांवाचे शिष्य होते. त्यांस श्रींनीं मुखांतून सुमारें अर्धा इंच लांबीच्या आत्मपादुका काढून दिल्या होत्या. त्यांची या ठिकाणीं स्थापना केली आहे.

२३ येवलें व २४ होडावडें (सावंतवाडी):–येथेंही त्यांनीं आणखी दोन मठ स्थापन केले आहेत.

२५ केज :-(मोंगलाई) स्वामीसुतांचे धाकटे बंधु (वयवर्षे १०) श्रीसच्चिदानंदस्वामीकुमार यांचे समक्ष मोठा मठ स्थापन झाला.

२६ देवलग्राम व २७ राजूर :-येथें अक्कलकोटीं प्रकट होण्यापूर्वी स्वतः पादुका व मठ स्थापन केल्याचें नमूद आहे.

२८ नगर :-नगरचे श्री. नाना जोशी रेखी यांना स्वामिसुतांनीं भेट देऊन मठस्थापना केली.

२९ नाखरें (रत्नागिरीजवळ):-श्री. नाना सोहनी हे छलकबुद्धीनें मुंबईस श्री. स्वामिसुतांकडे मठांत येत असतां कांहीं अनुभव येऊन त्यांचे भक्त झाले व त्यांच्या आज्ञेनें श्री. नानांनीं नाखरें येथें श्रींच्या पादुका स्थापिल्या.

३० विजापुर, ३१ ठाणें, ३२ वसई, ३३ चिपळूण, येथेंही मठस्थापना केली आहे, असें मुळेकरांचे चरित्रावरून दिसतें.

३४ देहू, ३५ चर्चन, ३६ सावई वेरें (गोवा) व **३७ फलटण** येथें श्रींचे मठ आहेत. फलटण येथें चर्मकार भक्तांनीं श्रीसमर्थाचें देऊळ बांधल्याचें समजतें.

गुजराण, कारवार, बंगाल, बिहार, ओरिसा, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश येथेंही मठ आहेत.

सार्वजनिक प्रार्थना—

स्वस्ति प्रजाभ्यः परिपालयन्तां
न्याय्येन मार्गेण महीं महीशाः ।
गोब्राह्मणेभ्यः शुभमस्तु नित्यं
लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु ॥ १ ॥
काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी ।
देशोऽयं क्षोभरहितो ब्राह्मणाः सन्तु निर्भयाः ॥ २ ॥
अपुत्राः पुत्रिणः संतु पुत्रिणः संतु पौत्रिणः ।
अधनाः सधनाः संतु जीवंतु शरदां शतम् ॥ ३ ॥
सर्वेऽत्र सुखिनः संतु सर्वे संतु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यंतु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥ ४ ॥

आशीर्वादपर अभंग

आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा ।
माझिया सकळां हरिच्या दासां ॥ १ ॥
कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं ।
ही संत मंडळी सुखी असो ॥ २ ॥
अहंकाराचा वारा न लागो राजसा ।
माझ्या विष्णुदासां भाविकांसी ॥ ३ ॥
नामा म्हणे तया असावें कल्याण ।
ज्या मुखीं निधान पांडुरंग ॥ ४ ॥



अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

गीता अ. ९ श्लो. २२



अक्कलकोटनिवासी

श्रीस्वामीसमर्थ महाराज.

जन्म शक १०७१ चैत्र शुक्ल २

समाधिशक १८०० चैत्र कृष्ण १३

ॐ

श्रीअक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थ

पदामृतसागर

श्रीगुरुदेव दत्त दिगंबर अवधूत श्रीपाद श्रीवल्लभ नरसिंहसरस्वती अक्कलकोट-निवासी जय जय परब्रह्म सद्गुरु श्रीस्वामीसमर्थ महाराजकी जय

॥ ध्यान ॥

काषायवस्त्रं करदंडधारिणं
कमंडलुं पद्मकरेण शंखम् ।
चक्रं गदाभूषितभूषणाढ्यं
श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

॥ आरती १ ॥

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ॥ त्रिभुवनीं आधार त्रैलोक्यराणा ॥ नेति नेति शब्द न ये अनुमाना ॥ सुरवर मुनिजन योगी समाधिले ध्याना ॥ जयदेव जयदेव जय सद्गुरुदत्ता ॥ आरति ओंवाळीतां हरती भवचिंता ॥ जय देव० ॥ १ ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ॥ अभाग्यासी कैसी न कळे ही मात ॥ पराही परतली कैंचा हा हेत ॥ जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥ जय देव० ॥ २ ॥ दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान ॥ हारपलें मन झालें उन्मन ॥ मीतूं-पणाची झाली ओसण ॥ एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥ जय देव० ॥ ३ ॥

॥ आरती २ ॥

सुखसहिता दुखरहिता निर्मळ एकांता ॥ कलिमलदहना गहना स्वामीसमर्था । न कळे ब्रह्मादिकां अंत अनंता ॥ तो तूं आम्हां सुलभ जय कृपावंता ॥ जय देव जय देव जय करुणाकरा ॥ आरती ओंवाळूं सद्गुरु माहेरा ॥ जय देव० ॥ १ ॥ मायेविण माहेर विश्रांति ठाव ॥ शब्दीं अर्थी हांव बोलणें वाव ॥ सद्गुरुप्रसादें सुगम उपाव ॥ रामीरामदासा फळला सद्भाव ॥ जय देव० ॥ २ ॥

॥ आरती ३ ॥

जयदेव जयदेव जय अंबे गौरी जय मंगलमूर्ती ॥ तुमको निशिदिनिं गावो दिविजुग सबजुग ध्यावो ब्रह्मा विष्णु शिव स्मरे ॥ ध्रु० ॥ एकानन चतुरानन पंचानन शिव-भूतानंद राहे ॥ भरत शिवानंदस्वामी इच्छा फल पावे ॥१॥ कानोंमें कुंडल नाकोंपर मोती ॥ कोटीचंद्र दिवाकर दिनके संजोति ॥ जयदेव० ॥ २ ॥

॥ आरती ४ ॥

जयदेव जयदेव जयजय अवधूता ॥ अगम्य लीला स्वामी त्रिभुवनिं तुझि सत्ता ॥ जयदेव० ॥ १ ॥ तूझें दर्शन होतां जाती हीं पापें ॥ स्पर्शनमात्रें विलया जाती भवदुरितें ॥ चरणीं मस्तक ठेवुनि मनिं समजा पुरतें ॥ वैकुंठींचें सुख नाहीं यापरतें ॥ जयदेव० ॥ २ ॥ सुगंध केशर भाळीं वर टोपी टीळा ॥ कर्णीं कुंडलें शोभति वक्षःस्थळिं माळा ॥ शरणागत तुज होतां भय पडलें काळा ॥ तूझे दास करिती सेवासोहळा ॥ जय० ॥ ३ ॥ मानवरूपी काया दिससी आम्हांस ॥ अक्कलकोटीं केला यतिवेषें वास ॥ पूर्णब्रह्म तोचि अवतरला खास ॥ अज्ञानी जीवांसी विपरित हा भास ॥ जयदेव० ॥ ४ ॥ निर्गुण निर्विकार विश्वव्यापक ॥ स्थिरचर

व्यापुनि अवघा उरलासी एक ॥ अनंतरूपें धरशी करणें मायीक ॥ तूझे गुण वर्णितां थकले विधिलेख ॥ जय० ॥ ५ ॥ घडतां अनेक जन्में सुकृत हें गांठीं ॥ त्याची ही फलप्राप्ति सद्गुरूची भेटी ॥ सुवर्णताटीं भरली अमृतरसवाटी ॥ शरणागत दासावरि कारें कृपादृष्टी ॥ जयदेव० ॥ ६ ॥

॥ आरती ५ ॥

जयदेव जयदेव जय श्रीस्वामी समर्था ॥ आरती ओवाळुं चरणीं ठेवुनियां माथा ॥ ध्रु० ॥ छेली खेडेग्रामीं तूं अवतरलासी ॥ जगदोद्धारासाठीं राया तूं फिरसी ॥ भक्तवत्सल खरा तूं एक होसी ॥ म्हणुनी शरण आलों तूझे चरणासी ॥ जय० ॥ १ ॥ त्रैगुण परब्रह्म तूझा अवतार ॥ त्याची काय वर्णूं लीला पामर ॥ शेषादिक शिणले नलगे त्यां पार ॥ तेथें जडमुढ कैसा करुं मी विस्तार ॥ जय० ॥ २ ॥ देवाधिदेवा तूं स्वामीराया ॥ निर्जर मुनिजन ध्याती भावें तव पायां ॥ तुजसी अर्पण केली अपुली ही काया ॥ शरणागता तारीं तूं जय स्वामीराया ॥ जय० ॥ ३ ॥ अघटित लीला करूनी जडमुढ उद्धरिले ॥ कीर्ती ऐकुनि कानीं चरणीं मी लोळें ॥ चरणप्रसाद मोठा मज हें अनुभवलें ॥ तूझ्या सुता न लगे चरणांविगळें ॥ जयदेव जय० ॥ ४ ॥

॥ प्रदक्षिणा ॥

धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची ॥ झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ धन्य० ॥ १ ॥ गुरुभजनाचा महिमा न कळे अगमानिगमासी ॥ अनुभवि ते जाणती जे गुरुपदिंचे अभिलाषी ॥ धन्य० ॥ २ ॥ पदोपदीं झाल्या अपार पुण्याच्या राशी ॥ सर्वंहि तीर्थें घडलीं आम्हां आदि-करुनि काशी ॥ धन्य० ॥ ३ ॥ मृदंग टाळ ढोल भक्त भावार्थें गाती ॥ नामसंकीर्तनें नित्यानंदें नाचती ॥ धन्य० ॥ ४ ॥ कोटी ब्रह्महत्या हरती करितां दंडवत ॥ लोटांगण घालितां मोक्ष लागे हो पायासी ॥ धन्य० ॥ ५ ॥ प्रदक्षिणा करुनी देहभाव हरवीला ॥ श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ॥ धन्य० ॥ ६ ॥

॥ पद १ ॥

अपराधी आहें मोठा ॥ मारणें कृपेचा सोटा ॥ स्वामि-राय सुखाचे कंद ॥ नेणोनि केला हा निज छंद ॥ तेणें पावलों हे बंद ॥ झालों निंद्य सर्वस्वी ॥ अपराधी० ॥१॥ तारिं तारिं दत्तात्रया ॥ वारिं माझ्या तापत्रया ॥ तुझे पाय काशी गया ॥ आहे साच मजलागीं ॥ अपराधी० ॥ २ ॥

आतां अंत पहासी काय ॥ तूंच माझा बापमाय ॥ रामदास तुझे पाय ॥ वारंवार वंदितो ॥ अपराधी० ॥ ३ ॥

॥ पद २ ॥

श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि तारिं तारिं मजला ॥ दयाळा तारिं तारिं मजला ॥ श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ॥ करितां आटाआटीं प्रपंच अवघा दिसतो मिथ्यत्व ॥ दयाळा दिसतो मिथ्यत्व ॥ म्हणउनि भजन तुझें मज देवा भासे सत्यत्व ॥ श्रीपाद० ॥ १ ॥ किंचित मात्र कृपा जरि मजवरि करिसि उदार मन ॥ दयाळा करिसि उदार मन ॥ चुकलों मी या विषयसुखाच्या आहारांतुनि जाण ॥ श्रीपाद० ॥ २ ॥ कृष्णातटिं निकटीं जो विलसे औदुंबर-छायीं ॥ दयाळा औदुंबरछायीं ॥ हंसपरात्पर भारति नायक लीन तुझे पायीं ॥ श्रीपाद० ॥ ३ ॥

॥ पालखीचे अखेरची आरती ॥

आरती आरती दत्ता ओवाळूं दाता ॥ स्वामी ओवाळूं दाता ॥ आरतीचें हरण दत्तें केलें तत्त्वतां ॥ आरती खुंटली आतां ओवाळूं कैसें ॥ स्वामी ओवाळूं कैसें ॥ तरी भजन निरंजनीं होतसे ॥ १ ॥ आरतीचें आरत पुरविलें श्रीदत्तें ॥ एका जनार्दनीं सहज ओवाळितसे ॥ २ ॥

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृति-
स्वभावात् ॥ करोमि यद्यत्सकलं परस्मै स्वामीसमर्थायेति
समर्पयामि ॥

—भजन—

१ स्वामीराज माउली गुरु स्वामीराज माउली दयाळा ॥

२ श्रीगुरु स्वामी समर्थ जयजय स्वामी समर्थ ।
श्रीगुरु स्वामी समर्थ जयजय स्वामी समर्थ ।
महाराज ॥ ध्रु० ॥

३ तूं माय मी लेंकरूं नकोरे, पान्हा चोरुं सद्गुरू ॥

४ स्वामिराज गुरु माझे आई, मजला ठाव द्यावा पायीं ॥

५ स्वामी महाराज भला किया, भगवा झेंडा लगा दिया ॥

६ अक्कलकोटीं अवतरला जगजेठी तो हरी,
टाळ वाजवी विणा मुखानें स्वामी स्वामी म्हणा ॥

७ पायीं घागुऱ्या हातीं घ्या विणा,
मुखानें स्वामी स्वामी म्हणा ॥

८ हिरवी टोपी बनात लाल । श्रीस्वामी आमुच्या संगातीं
चाल ॥

९ समर्था चरणीं ठेविला माथा रंगा येई हो ॥

१० अक्कल्कोटांत हिरवा मका । स्वामी सखा हो विसरूं नका ॥

११ स्वामी अक्कल्कोटवाले, भजनामध्यें गुंग आले ॥

१२ स्वामीराज, स्वामीराज, मी अपराधी घ्या पदरांत ॥

१३ पतितपावन नरसिंहभान । घरीं आमुचा तूं अभिमान ॥

१४ भवतारक ह्या तुझ्या पादुका वंदिन मी माथां ।

करावी कृपा गुरुनाथा ॥

१५ जयजय गुरु महाराज गुरु, जयजय परब्रह्म सद्गुरु ॥

१६ अक्कल्कोटीं भूवैकुंठीं श्रीगुरु दातार,

दयाळा श्रीगुरु दातार ॥

पूर्ण ब्रह्म श्रीगुरुस्वामी करिं जगदोद्धार ॥

१७ मोठे मोठे पतित तारिले कीर्ति ऐकियली ।

दयाळा कीर्ति ऐकियली ॥

म्हणवुनि दत्ता (स्वामी) पायापाशीं अर्जी म्यां केली ॥

१८ म्लेंच्छ राजा हीन जातिचा नामें उद्धरिला ।

दयाळा नामें उद्धरिला ॥

मजविषयीं कां दीनदयाळा विसर तुला पडला ॥

१९ दिगंबरा, दिगंबरा, श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥

२० दत्ता दिगंबरा ये रे, सांवळ्या मला भेट दे रे ॥

किति तरि घालूं जन्मफेरे, दत्ता मला भेट दे रे ॥

२१ पार्वतिच्या नंदना मोरया गजानना वा गजानना ॥

२२ शिवहर शंकर, नमामि शंकर, शिवशंकर शंभो ।

हे गिरिजापति भवानिशंकर शिवशंकर शंभो ॥

२३ विटेवरि उभा कटेवरि हात । काय मौजेचा पंढरिनाथ ॥

२४ पांडुरंगे रखुमाबाई राधे गोविंद ।

सांवळे ग माझे विठाबाई गोविंद, गोविंद ॥

२५ पायाचा मी दास समर्था, अर्जी ऐकावी,

समर्था अर्जी ऐकावी ।

पतितपावना दीनदयाळा लज्जा रक्षावी ॥

२६ हेंचि मागणें तुला समर्था । चरणीं ठाव द्या मला ॥

२७ मोठे संकटिं निजभक्तांचें रक्षण त्वां केलें ।

दयाळा रक्षण त्वां केलें ॥

मजविषयीं कां दीनदयाळा नेत्रां झांकियलें ॥

२८ अंत्रे भवानी, भवानी, तूं माझी जननी, मजला पाव गे ॥

२९ कपाळीं केशरी गंध । दत्ता तुझा मला छंद ॥

३० आजी आनंदू रे, एकी परमानंदु रे ।
जया श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे ॥ ध्रु० ॥
जयजय गोविंद राधे गोविंद ॥

विठोबाची वेढी आम्हां आनंदू सदा ।
गाऊं नाचूं वाजवुं टाळी रंजवुं गोविंदा ॥
स्वामी समर्थ जयजय स्वामी समर्थ ॥

सदा सण संत आम्हां नित्य दिपवाळी ।
आनंदें निर्भय आमुचा कैवारी बळी ॥
अवधूत, जयजय अवधूत ॥ स्वामी ॥

तुका म्हणे नाहीं जन्ममरणाचा धाक ।
संत सनकादिक ते हें आमुचें कौतुक ॥
जयजय अवधूत दिगंबर, स्वामी दिगंबर ॥

३१ अगड भं भं भं भं भं वाजे डमरू ।
नाचे सदाशिव जगद्गुरू ॥ ध्रु० ॥
नाचे ब्रह्मा, नाचे विष्णु, नाचे महादेव ।
जहां देखे पार्वती, नाचे सब देव ॥ १ ॥

भांग खाय, जहर खाय, कलिया धत्तर ।
योगिनीके पीछे लगे नंगे अवधूत ॥ २ ॥

काशिविश्वनाथनाम जाके विराजे ।
आगे भैरव पीछे हनुमान साजे ॥ ३ ॥

३२ जयजय गोपाळ कृष्ण राधा कृष्ण,
कान्होबाची संगती । ब्रह्मादिक इच्छिती,
धन्य आम्हां म्हणती ।

डोडो डोडो डोडो । गोपाळ कृष्ण राधा कृष्ण ॥ध्रु०॥
कृष्णा पती गोपाळ । म्हणती सकळ । अकळ तूं नकळ ।
अल लल-लल ॥ गो० ॥ १ ॥

पूतनेसी शोषीलें । नारदासी मोहीलें ।
गणिकेसी उद्धरिलें । अरे रे रे रे रे ॥ गो० ॥ २ ॥

अजगर मारीला । वणवाही ग्रासीला ।
गोवर्धन उचलीला । अब बब बब ॥ गो० ॥ ३ ॥

केशीयासी मारीलें । शकटासी चूर्ण केलें । दोन्ही
वृक्ष उन्मळीले । ळूळू ळूळू ळूळू ॥ गो० ॥ ४ ॥

यमुनाडोहीं बुडाला । कालिया मारीला । नाचतसे
त्याच्या माथां । थैथै थैथै थैथै ॥ गो० ॥ ५ ॥

गवळीयांच्या घरा जासी । दहीं दूध लोणी खासी ।
त्यांच्या मना मोहीसी । छीछी छीछी छीछी ॥ गो० ॥६॥
मामा मारूं गेलासी । आपटीलें गजासी ।
मल्लयुद्ध खेळसी । हुतू तुतू तूतू ॥ गो० ॥ ७ ॥
सोळा सहस्त्र भोगीसी । ब्रह्मचारी म्हणवीसी ।
लटकेंची बोलसी । हाहा हाहा हाहा ॥ गो० ॥ ८ ॥
कौरवांसी मारीलें । पांडवांसी रक्षीलें ।
द्रौपदीसी सांभाळीलें । अरे रेरे रेरे ॥ गो० ॥ ९ ॥
सोडुनीयां मीपण । आम्हां घाली लोटांगण ।
परब्रह्म नारायण । होहो होहो होहो ॥ गो० ॥१०॥
ऐसे तुझे पोवाडे । ब्रह्मादिक झाले वेडे । विष्णुदास
नामा म्हणे । ओयो योयो योयो ॥ गो० ॥ ११ ॥

३३ स्वामीसमर्था येई हो येई हो, दासा दर्शन देई हो ।
आजानुबाहू सुहास्यवदना शरणा चरण दावीं हो ॥

३४ अजी आहे गुरुवार । स्वामी आम्हां जनांला तार ॥

३५ स्वामी महाराज बैठे संतदलमें, बिजली चमके बादलमें ॥

३६ श्रीगुरु राजन् धीपुरवासी । कृपाकटाक्षें पाहिं अम्हांसी ॥

३७ शुद्ध सत्वगुणीं अवधूतचि तो अक्कलकोटीं पातला ॥
श्रीगुरुमूर्ती नरसिंहसरस्वती डोळां भरुनी पाहिला ॥

३८ सद्गुरु माय दाखविं पाय तुजविण स्वामी करूं मी काय ॥

३९ जय जय जय राजाधिराज योगीराज महाराजा,
अलख दिगंबर अवधूता श्री दत्त स्वामीराजा समर्था ॥

॥ मंत्रपुष्पांजलि ॥

ॐ यज्ञेन यज्ञमयजंतदेवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ॥ ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः । ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहा-राज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायीस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति । तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥

॥ विडा ॥

विडा घ्या हो स्वामिराया ॥ धरूनी मानवाची काया ॥ यतिवेष होऊनीयां ॥ वसतां दीनासी ताराया ॥ विडा

घ्या हो स्वामिराया ॥ १ ॥ विज्ञान हें पूगीफल ॥ भक्ति नागवल्लीदळ ॥ वैराग्यपूर्ण विमळ ॥ लवंगा सत्क्रिया सकळ ॥ विडा० ॥ २ ॥ प्रेम रंगवि जैसा कात ॥ पुळा अष्टभावासहीत जायफळ क्रोधरहित ॥ पत्री सर्व-भूतहित ॥ विडा० ॥ ३ ॥ खोबरें हेंचि क्षमा ॥ फोडुनि द्वैताच्या बदामा ॥ मनोजय वर्ख हेमा ॥ कापूर हें शांति नामा ॥ विडा० ॥ ४ ॥ कस्तुरी निरहंकार ॥ कोठें न मिळती उपचार ॥ भीमापौत्रा यास्तव फार ॥ सत्वर देउनि वारंवार ॥ विडा० ॥ ५ ॥

॥ हुक्का ॥

लेनाजी महाराज हुक्का भर लायो ॥
दिनके दयाल साई अरज सुनियो ॥ ध्रु० ॥
मनकी चिलीम धरिये तनका गुडाखू ॥
ज्ञान-अंगार सिलगायो ॥ १ ॥
निर्गुण दटा सगुणहि नेचा ॥
प्रेमजल हम भरियो ॥ २ ॥
भावभगतके तुमहि प्यारे ॥
आनंद खुब रंग उडायो ॥ ३ ॥

॥ शेजारती १ ॥

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता ॥ नरसिंह-सरस्वती अवधूता ॥ चिन्मयसुखधामीं जाउनि पहुडा एकांता ॥ वैराग्याचा कुंचा घेउनि चौक झाडिला ॥ स्वामी चौक झाडिला ॥ तयावरी सुप्रेमाचा शिडकाव दिधला ॥ पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ति ॥ स्वामी नवविधा भक्ति ॥ ज्ञानाच्या समया लावुनि उजळील्या ज्योती ॥ आशा तृष्णा कल्पनेचा सांडुनि गलबला ॥ स्वामी सांडुनि गलबला ॥ क्षमा दया शांति दासी उभ्या सेवेला ॥ द्वैताचें तें कपाट लावुनि एकत्र केलें ॥ स्वामी एकत्र केलें ॥ दुर्बुद्धीच्या गांठी सोडुनि पडदे सोडिले ॥ भावार्थाचा मंचक हृदयाकाशीं टांगिला ॥ हृदयाकाशीं टांगिला ॥ मनाचीं तीं सुमनें जोडुनि केलें सेजेला ॥ अलक्ष उन्मनि घेउनि नाजुक दुसेला ॥ स्वामी नाजुक दुसेला ॥ निरंजनीं सद्गुरु माझा निजे शेजेला ॥ आतां स्वामी० ॥ १ ॥


॥ शेजारती २ ॥

नरसिंह सरस्वती ॥ मनीं धरुनियां प्रीति ॥ ओंवाळितों सेज आरती ॥ अंगीकारा यतिपती ॥ नरसिंह० ॥ १ ॥ ब्रह्मा येउनि देवदेवा ॥ म्हणे कोण कोण जीवा ॥ उपजवुं

कोठें केव्हां ॥ संदेश हा मज व्हावा ॥ नरसिंह० ॥ २ ॥ विष्णुही येउनियां ॥ आज्ञा मागे वंदोनियां ॥ कोण जीवा काय खाया ॥ कैसें देऊं कवणा ठाया ॥ नरसिंह० ॥ ३ ॥ येऊनियां महादेव ॥ वंदोनियां पादद्वंद्व ॥ ज्ञान कोणा देऊं देवा ॥ आज्ञा करा स्वयमेव ॥ नरसिंह० ॥ ४ ॥ अंबा म्हणे बाळयती ॥ फार झाली असे रात्री ॥ झोंप आली तुजप्रती ॥ भक्त रक्षुनि श्रम होती ॥ नरसिंह० ॥ ५ ॥ विनविताती भक्तवृंद ॥ सेवा घेऊनियां छंद ॥ पुरवुनि देईं ब्रह्मानंद ॥ भीमापुत्रानंदकंदा ॥ नरसिंह० ॥ ६ ॥

॥ अष्टक १ ॥

दीनवत्सला दत्तस्वामिया ॥ धांव संकटीं आणुनी दया ॥ वारिं दैन्य हें अन्य यातना ॥ धीपुरस्थिता अत्रिनंदना ॥ १ ॥ योगयाग ते नाकळे मला ॥ यामुळें सदा प्रार्थितों तुला ॥ देउं तूं नको दुष्ट वासना ॥ धीपुर० ॥ २ ॥ मायबाप श्रीपादगुरुयती ॥ तूंचि असशी सांगु हें किती ॥ तारिं माझि तूं ऐक प्रार्थना ॥ धीपुर० ॥ ३ ॥ संसृती महापाश हा असे ॥ सौख्य मानसीं कांहिं बा नसे ॥ तोडिं बंध हा बोधिं मन्मना ॥ धीपुर० ॥ ४ ॥ कामधेनु तूं देसि संपदा ॥ कल्पवृक्ष तूं वारिं आपदा ॥ वेद वाणि ती नाकळे गुणा ॥



धीपुर० ॥ ५ ॥ दीनबांधवा धांव माउली ॥ तूंचि संकटीं योग्य साउली ॥ पूर्ण बा करीं सर्व कामना ॥ धीपुर० ॥ ६ ॥ भो दयानिधे कल्पपादपा ॥ मालुजी नृपा केलिसे कृपा ॥ वित्त दीधलें त्या अकिंचना ॥ धीपुर० ॥ ७ ॥ कीर्ति वर्णितां शेष भागला ॥ काय वर्णवे तें गुरू मला ॥ स्वामि राजसा देइं दर्शना ॥ धीपुर० ॥ ८ ॥ नित्य पाठ या अष्टका करी ॥ वांछितार्थ हो प्राप्त सत्वरी ॥ कृष्ण बाळका रक्षिं वामना ॥ धीपुर० ॥ ९ ॥

॥ अष्टक २ ॥

मातेचे उदरांत मास नव हे राहतां तधीं अग्निनें ॥ उष्मा होउनि जंतु दोषहि तया स्थानांत दुर्गंधिनें ॥ मातेच्या विविधान्नभक्षणरसें केलें बहू घाबरें ॥ दत्तात्रया फार दुःख मजला झालें अतां पाव रे ॥ १ ॥ येतां बाहेर सौख्य दुःख न कळे बोलावया येइना ॥ देती औषध जें जयासि रुचलें तें नेणती भावना ॥ किर किर करीं म्हणुनि मारिति करें येवोनियां कावरे ॥ दत्तात्रया० ॥ २ ॥ किंचित् ज्ञान आलें तधीं मज बहू खेळावयाची सवे ॥ खोड्याही करणें परासि पिडणें हें आवडे आठवे ॥ होती लोक समस्त तात जननी कोपे जसे दाव रे ॥

दत्तात्रया० ॥ ३ ॥ आलें यौवन तों मदांध बनलों विद्याधनाच्या बळें ॥ योषित्‌लंपट होउनी पितृ गुरु ज्ञातेहि धिक्कारिले ॥ होय स्त्री अवलोकितांचि मदनें मच्चित्त हें बावरें ॥ दत्तात्रया० ॥ ४ ॥ रोगें ग्रासियलें उपाय न चले या औषधानें कधीं ॥ प्रातःस्नानहि ब्रह्मकर्म न घडे शक्ती नसे विग्रहीं ॥ चिंता शोकभरें निरंतर मुखीं ये ना तुझें नांव रे ॥ दत्तात्रया० ॥ ५ ॥ वृद्धत्वीं पुत्रकन्या दिलिस गुरुवरा वांझ नारीस देवा ॥ वृद्धा तैशीच वंध्या महिषि दुभवुनी देउनियां द्रव्यठेवा ॥ छेदुनि घेवडा वेल विप्र बहु संतोषविला बरें ॥ दत्तात्रया० ॥ ६ ॥ करुणाघन म्हणुनी वानिति तुला वेदांतशास्त्रज्ञही ॥ भक्ताभीष्ट सदाहि दुःख हरिसी दुष्टांतका प्रत्यहीं ॥ भृत्या किंचित दुःख पाहुनि त्वरें घेसी सख्या धांव रे ॥ दत्तात्रया० ॥७॥ भीमात्मज तनयासी संसृतिभवें दुःखें बहू ग्रासिलें ॥ हें दवडा अथवा मनीं जरि असे हें पाहिजे भोगिलें ॥ भोगाया मनिं धैर्य देउनि पदीं देईं तुझ्या ठाव रे ॥ दत्तात्रया० ॥ ८ ॥

॥ प्रार्थनेचा अभंग ॥

आतां गुरुराया परिसा विज्ञापना ॥ दासाची करुणा येऊं द्यावी ॥ १ ॥ नेणोनियां सोय फिरलों दिशा दाही ॥

झालें दुःख देहीं बहुकाळ ॥ २ ॥ तुमची ब्रीदावळी पतितपावन ॥ कीर्ति ही ऐकून शरण आलों ॥ ३ ॥ माझा माय बाप गण गोत बंधू ॥ स्वामी कृपासिंधु गुरुराया ॥ ४ ॥ आतां कांहीं नेणें तुमच्या पायांविणें ॥ संसारींचें भेणें दुरी करा ॥ ५ ॥ जोडोनियां कर शिर पायांवरी ॥ ठेवियेलें निर्धारीं जनार्दना ॥ ६ ॥ तुज मी अनंता काय सांगू आतां ॥ माझी सर्व चिंता असों द्यावी ॥ ७ ॥ नेणें भक्ति ज्ञान कर्म उपासना ॥ तुज मी नारायणा ध्यात आहें ॥ ८ ॥ पतित मी पापी दुर्गुणी आगळा ॥ परी आलों गोपाळा शरण तुज ॥ ९ ॥ पतित तारिले पशु उद्धरिले ॥ पक्षी तेही नेले मोक्षालागीं ॥ १० ॥ सिद्धेश्वर म्हणे ऐसी तुझी ख्याती ॥ माधवा श्रीपती तारीं आतां ॥ ११ ॥

॥ पद ३ ॥

अपराध क्षमा आतां केला पाहिजे ॥ गुरु हा केला पाहिजे ॥ अबद्ध सुबद्ध गुण वर्णियले तूझे ॥ ध्रु० ॥ न कळेचि टाळ वीणा वाजला कैसा ॥ गुरु हा वाजला कैसा ॥ अस्ताव्यस्त पडे नाद गेला भलतैसा ॥ अपराध० ॥ १ ॥ नाहीं ताल ज्ञान नाहीं कंठ सुस्वर ॥ गुरु हा कंठ सुस्वर ॥

झाला नाहीं बरा वाचे वर्ण उच्चार ॥ अपराध० ॥ २ ॥
निरंजन म्हणे तुझे वेडे वांकुडे ॥ गुरु हे वेडे वांकुडे ॥
गुण दोष न लावावा सेवकाकडे ॥ अपराध० ॥ ३ ॥

॥ धांवा १ ॥

धांव धांव श्रीगुरुराया दीनातें या पाव दयाळा ॥
निशिदिनिं हृदयीं गर्जतसे हा मंगलदायक नाम तुझें गा ॥
मंगल० ॥ ध्रु० ॥ १ ॥
महाराज तूं त्रैलोक्याचा रंकाचा मी रंक दयाळा ॥
क्षमा करीं बा जरी वाटतें उद्धटसा मी शंख दयाळा ॥
धांव० ॥ २ ॥
वृक्षाखालीं झाडुनि भूमि रचिलें आसन सांग तुला मी ॥
रचिलें० ॥
हा नंग ठरलों कोठुनि आणूं रत्नमंच तुज सांग दयाळा ॥
रत्न० ॥ ३ ॥
सप्त सागरिंचा ओसंडे हा नेत्रां वाहे पूर दयाळा ॥ नेत्रां० ॥
प्रक्षाळूं दे पाय तुझे हे नको करूं मज दूर दयाळा ॥
नको० ॥ ४ ॥
भाग्यहीन मी कोठुनि आणूं कमलें पूजूं पाय कसे हे ॥
कमलें० ॥

शिरकमल तव पदीं वाहिलें स्वीकारीं गुरुराज दयाळा ॥
स्वीकारीं० ॥ ५ ॥

॥ प्रसादाचे वेळीं करुण धांवा ॥

स्वामिराया चंद्रमोग्रजा आनंदाच्या गुरुकंदा ॥
झडकरि येउनि भेट देउनी वारिं आमुच्या आपदा ॥

गुरुवारचा कार्यक्रम समाप्त

॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

फकिराचे दोहोरे

॥ दोहोरा १ ॥

फकिरी गुजर गई गुजरान ॥ ध्रु० ॥
कोई दिन सुका, कोई दिन भुका ।
कोई दिन बनया दुकान ॥ १ ॥ फकिरी० ॥
कोई दिन जंगल, कोई दिन मेहल ।
कोई दिन गुरुका मकान ॥ २ ॥ फकिरी० ॥
कोई दिन योगी, कोई दिन भोगी ।
कोई दिन दत्त निरंजन ॥ ३ ॥ फकिरी० ॥

॥ दोहोरा २ ॥

भाई खुदा न छोडो दिलका ॥ भाई स्वामी न छोडो दिलका ॥
भाई गुरु न छोडो दिलका । भाई दत्त न छोडो दिलका ॥
द्वैतभाव है अगमनिगमका । अल्ला मालिक तनुका ॥
भाई खुदा न छोडो दिलका ॥ १ ॥
तुर्याराणी साक्ष दीपिणी । खेल बनाया मनका ॥
भाई खुदा न छोडो दिलका ॥ २ ॥
दो दिनकी है जानि जवानी । नहिं भरवसा तनुका ॥
भाई खुदा न छोडो दिलका ॥ ३ ॥
कहे मछिंदर सुन रे गोरख, गुजर गया दिन कलका ॥
भाई खुदा न छोडो दिलका ॥ ४ ॥

॥ ध्यान ॥

(राग जोगी, ताल धुमाळी)

ध्यान दिगंबर ज्यांचें ॥ पाहूं नयनीं ॥ मदनमनोहर सुंदर ॥
आठवूनि मनीं ॥ ध्रु० ॥ तरुणारुण समचरणप्रभा ॥
करजितप्रभा ॥ नखपंक्तिशशी विलसे ॥ विराजितप्रभा ॥
प्रपदें सुंदर घोंटे ॥ नीलवर्ण शुभा ॥ जंघा लाजविती त्या ॥
कर्दळीस्तंभा ॥ ध्या० ॥ १ ॥ कटिरीण कटिजीत कटितट ॥
कौपीनबंध ॥ शांभवी मुद्रामुद्रित ॥ जळजापूरकंद ॥

तुंदिल नाभि सखोलित ॥ विकसितारविंद ॥ वक्ष विशाल ग्रीवा ॥ जलजाकृतिकंद ॥ ध्या० ॥ २ ॥ अमल कमलदल नयन विराजित ॥ चंपकनासा ॥ अधर प्रवाल तसे ॥ मुख मंद सुहासा ॥ कुड्मलदलमीनाकृती ॥ मकरे सुविलासा ॥ मस्तकीं मुकुट जटाजूटी ॥ मित्रारहिवासा ॥ ध्या० ॥ ३ ॥ षड्भुज बाहू अजान ॥ सुविलंबित सायुधमान ॥ दंड-कमंडलुत्रिशूल ॥ डमरुसंधान ॥ शंखचक्र करीं मिरवी ॥ स्वामीभगवान ॥ अभिनवजलदतनू हे ॥ श्रुति दे सन्मान ॥ ध्या० ॥ ४ ॥ भस्मविलेपितभाळीं ॥ सुशोभित केशरिगंध ॥ रत्नाक्षत वर मिरवे ॥ अतिसुगंध ॥ मुक्तामिश्रितरुद्राक्ष ॥ भाळीं सुगंध ॥ दत्तात्रयवर श्रीधर ॥ गुरुब्रह्मानंद ॥ ध्यान० ॥ ५ ॥

वार्षिक नामसप्ताह
कार्यक्रम

प्रथम दिवस

॥ अभंग १ ॥

भावें वंदोनी चरणा ॥ उभा राहिलों भजना ॥ १ ॥
आतां बोलवा उत्तरीं ॥ स्वामी नाम निरधारीं ॥ २ ॥
प्रेम द्यावें माझ्या मना ॥ मूर्ति दाखवा लोचना ॥ ३ ॥
तेथें नको देहभान ॥ संत करिती कीर्तन ॥ ४ ॥
आनंद म्हणे निरधारीं ॥ तुम्ही बोलवा उत्तरीं ॥ ५ ॥

॥ अभंग २ ॥

रूप पाहतां डोळेभरी ॥ जाहलें समाधान अंतरीं ॥ १ ॥
मूर्ति साजिरी गोजिरी ॥ माझ्या समर्थाची खरी ॥ २ ॥
कोटी मदनाची प्रभा ॥ पाहावा लावण्याचा गाभा ॥ ३ ॥
तेज पहातां हें अरूप ॥ ब्रह्म देखिलें स्वरूप ॥ ४ ॥
आनंद म्हणे निर्गुण ॥ जाहला कलींत कारण ॥ ५ ॥

॥ अभंग ३ ॥

कोठें जासी दीनानाथा ॥ प्रेमें आडवूं समर्था ॥ १ ॥
करूं देहाची कुरवंडी ॥ पायांपासों अर्पूं मुंडी ॥ २ ॥

नाहीं देहाचें कारण ॥ दिली सुरी हातीं मान ॥ ३ ॥
आतां पाहिजे तें करा ॥ ब्रीद राखावें दातारा ॥ ४ ॥
आनंद म्हणे लडिवाळ ॥ तुझ्या पायीं आमची आळ ॥ ५ ॥

॥ अभंग ४ ॥

आधीं नमूं तुमच्या पायां ॥ भक्तवत्सला स्वामीराया ॥ १ ॥
तूंचि माझा बुद्धिदाता ॥ शरण शरण हो समर्था ॥ २ ॥
चौदा विद्यांच्या दातारा ॥ शिरीं ठेवा अभय करा ॥ ३ ॥
चौसष्ट कळांचा हा रंग ॥ तुझ्या पायींचा सुरंग ॥ ४ ॥
आनंद म्हणे आदि अंत ॥ आम्हीं नमिला समर्थ ॥ ५ ॥

॥ अभंग ५ ॥

माझे अन्याय पोटीं घाला ॥ स्वामिराया दीनवत्सला ॥१॥
हेंचि सांगणें साचार ॥ करा पायांचा किंकर ॥ २ ॥
शरण येतां अव्हेरिला ॥ बोल लागेल पायांला ॥ ३ ॥
पूर्ण मनाचे दयाळू ॥ माझा करावा सांभाळू ॥ ४ ॥
आनंद म्हणे हो समर्था ॥ सर्व जगीं तुमची सत्ता ॥ ५ ॥

॥ अभंग ६ ॥

स्वामी माझी माता स्वामी माझा पिता ॥ गणगोत त्राता स्वामी माझा ॥ १ ॥ स्वामी माझा देव स्वामी हो वैभव ॥ स्वामीपायीं जीव सदा राहो ॥ २ ॥ जग हेंचि

सारा स्वामीचा पसारा ॥ स्वामीविण थारा नाहीं नाहीं ॥ ३ ॥ आनंद म्हणे माझें खरें भांडवल ॥ ब्रह्मादिक लोक ज्याचे पायीं ॥ ४ ॥

॥ अभंग ७ ॥

मागणें हें माझें एक पायांपाशीं ॥ प्रेम भजनासी द्यावें मना ॥ १ ॥ हुकूम सुरेख तुमचा यथार्थ ॥ जगालागीं हित सांगावया ॥ २ ॥ तेथें नको विघ्न येऊं देऊं बापा ॥ असों द्यावी कृपा बाळावरी ॥ ३ ॥ रंगदेवतेची करावी योजना ॥ भजनासी मनालागीं माझ्या ॥ ४ ॥ आनंद म्हणे बापा स्वामी हो समर्था ॥ बोलवा यथार्था तुमचे तुम्ही ॥ ५ ॥

॥ अभंग ८ ॥

प्रेमें नमो तुमच्या पायां ॥ निर्गुणरूप श्रीगुरुराया ॥ १ ॥
सिद्धीबुद्धीचा दातार ॥ विश्वव्यापक दिगंबर ॥ २ ॥
चौदा विद्या चौसष्ट कळा ॥ ज्याच्या द्वारींचा धुरोळा ॥३॥
तोचि बुद्धीचा दातार ॥ विश्वव्यापक दिगंबर ॥ ४ ॥
अनंत मुक्तीची पायरी ॥ सहज झुले त्याचे द्वारीं ॥ ५ ॥
हरिहर ब्रह्म झालें ॥ ज्याच्या रूपीं हो निर्मिलें ॥ ६ ॥

अनंत ब्रह्मांची ही खूण ॥ एकरूपी आठवण ॥ ७ ॥
आनंद म्हणे दीनानाथ ॥ ऐसा नमिला समर्थ ॥ ८ ॥

॥ अभंग ९ ॥

आधीं नमूं स्वामी तुज ॥ तुझे चरणीं माझीं काज ॥ १ ॥
तूंचि बुद्धीचा हो दाता ॥ चरणीं ठेविलासे माथा ॥ २ ॥
सर्व विघ्न निवारीता ॥ तूंचि माझा माता पिता ॥ ३ ॥
बुद्धी देईं आपुल्या बाळा ॥ तुझी बोलावया लीला ॥ ४ ॥
चादा विद्या चौसष्ट कळा ॥ तुझे पायींचा धुरळा ॥ ५ ॥
माझा रंग तुझे गुणीं ॥ येऊनि रहावें अंतःकरणीं ॥ ६ ॥
स्वामीसुता करीं दंग ॥ बापा भरोनियां रंग ॥ ७ ॥

॥ अभंग १० ॥

मागणें हें माझें स्वामी तुजपासीं ॥
विघ्न भजनासी येऊं नये ॥ १ ॥
तुझाचि निरोप सर्वांसी मी देतों ॥
तुझें नाम गातों आवडीनें ॥ २ ॥
या येथेंही उपाधी न बाधो सर्वथा ॥
बापा दीनानाथा सांभाळावें ॥ ३ ॥
स्वामीसुत म्हणे तूंची बापधनी ॥
सांभाळीं भजनीं बालकासी ॥ ४ ॥

॥ अभंग ११ ॥

आवड मोठी स्वामीराया ॥ तुझें भजन कराया ॥ १ ॥
तुजपुढें नाचावया ॥ इच्छा माजी असे राया ॥ २ ॥
पूर्ण करावया दीन ॥ मागें आतां कृपादान ॥ ३ ॥
सुत म्हणे एसें व्हावें ॥ पोटीं धरूनियां रहावें ॥ ४ ॥

॥ पद ४ ॥

अत्रिसुता श्रीदत्ता नमितों पदा स्मरा रे विधिहरिहरा ॥
अलख निरंजन मायातीता, श्रीगुरुदत्ता कृपा करा ॥ १ ॥
अगणित योनीं फिरलों शिणलों, शेवटिं भुललों संसारा ॥
जन्म मरण हें पुन्हां नको मज, येरझार जी बंद करा ॥ २ ॥
जरि घालिसी पुनरपि जन्मा, द्यावा मज सत्संग वरा ॥
नाम स्मरण हें सदा हो तुमचें, भक्तीभावें ताप हरा ॥ ३ ॥
विसर आपुला कधिं न पडो मज ध्याया, निजपदकिंकरा ॥
सकरुण प्रार्थी दास तुम्हां हा, कैवारी मज नच दुसरा ॥ ४ ॥

॥ चौरी अभंग १२ ॥

चौरी वारूं तुजवरी ॥ प्रेम धरुनि अंतरीं ॥ १ ॥
देहभाव हातीं धरिला ॥ झोंक कुशल फिरविला ॥ २ ॥
दया चौरी हातीं धरिली ॥ भक्तिप्रेमें ही वारीली ॥ ३ ॥
शोभ शोभविला ढाळ ॥ हातीं उडवुनि ढाळ ॥ ४ ॥

वारूं भवभय सारा ॥ तुज आळवूं दातारा ॥ ५ ॥
आनंद म्हणे चौरी केली ॥ देह कुरवंडी वाहीली ॥ ६ ॥

॥ मोर्चेल अभंग १३ ॥

मोर्चेल धरुनियां करीं ॥ शिव वारी तुजवरी ॥ १ ॥
चौरी धरी शार्ङ्गधर ॥ इंद्र झाला छडीदार ॥ २ ॥
ब्रह्मा पादुका संभाळी ॥ ऐसें झालें तुझ्या मेळीं ॥ ३ ॥
देव जोडुनियां कर ॥ करिती नामाचा उच्चार ॥ ४ ॥
मुनि वाजविती टाळी ॥ करिती प्रेमाची आरोळी ॥ ५ ॥
आनंद म्हणे करुणाकरा ॥ गुरुराया तूं दातारा ॥ ६ ॥

ॐकारस्वरूपा सद्गुरु समर्था ॥ अनाथांच्या नाथा तुज नमो ॥ गुरुराव स्वामी आतां स्वप्रकाश ॥ ज्यापुढें उदास चंद्र रवी ॥ १ ॥ वेदां पडलें मौन शास्त्रें वेडावलीं ॥ वाचा हे निमाली ते श्रीगुरू ॥ श्रीगुरु ज्यांसी पाहे कृपादृष्टी ॥ तयांसी हे सृष्टी पांडुरंग ॥ २ ॥ प्रभुराज माझा स्वामी गुरुराय ॥ देतो मज भाव शुद्ध भूमी ॥ भूमी शुद्ध करी ज्ञान बीज पेरी ॥ अद्वैत हे धरी मी तूं नेणें ॥ ३ ॥ मजलागीं माझी सद्गुरु माउली ॥ कृपा करी साउली वर्णूं काय ॥ एकाजनार्दनीं गुरु परब्रह्म ॥ तयांचें पैं नाम सदा मुखीं ॥ ४ ॥

भजनारंभ

श्रीगुरु स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॥
श्रीगुरु स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ॥ महाराज

समाप्तिदिन

आरती नं. १ ते ५ पर्यंत म्हणाव्या

॥ नैवेद्यारती ॥

जयदेव जयदेव जय श्रीस्वामी समर्था ॥ पक्वान्नादि सिद्धि जगीं तूंच कर्ता ॥ ध्रु० ॥ षड्रस पक्वान्नेंही अर्पित तुज मायीं ॥ कृपा करुनि तीं तूं मान्य करुनि घेई ॥ तृप्त सर्व जीवां जेवितां तूं आई ॥ जीवन सर्वांचें हें असे तव पायीं ॥ १ ॥ आनंदें भोजन करावें ताता ॥ यथेच्छ जेवूनी उच्छिष्ट उरतां ॥ तो प्रसाद देईं आपुल्या सुता ॥ हेंचि मागें ठेवुनि तव चरणीं माथा ॥ २ ॥

॥ अष्टक ॥

दत्तात्रया तव शरणं ॥ दत्तनाथा तव शरणं ॥ त्रिगुणात्मका त्रिगुणातीता ॥ पुराणपुरुषा तव शरणं ॥ १ ॥ शाश्वतमूर्ते तव शरणं ॥ श्यामसुंदरा तव शरणं ॥ शेषाभरणा शेषभूषणा ॥ शेषशायि गुरु तव शरणं ॥ २ ॥ षड्भुज-

मूर्ते तव शरणं ॥ षड्भुजयतिवर तव शरणं ॥ दंडकमंडलु-गदापद्मधर ॥ शंखचक्रधर तव शरणं ॥ ३ ॥ करुणानिधे तव शरणं ॥ करुणासागर तव शरणं ॥ श्रीपादश्रीवल्लभ गुरुवर ॥ नृसिंहसरस्वती तव शरणं ॥ ४ ॥ श्रीगुरुनाथा तव शरणं ॥ सद्गुरुनाथा तव शरणं ॥ कृष्णासंगमतरुवर-वासी ॥ भक्तवत्सला तव शरणं ॥ ५ ॥ कृपामूर्ते तव शरणं ॥ कृपासागरा तव शरणं ॥ कृपाकटाक्षा कृपावलोकन ॥ कृपानिधे तव शरणं ॥ ६ ॥ कालांतका तव शरणं ॥ काल-नाशका तव शरणं ॥ पूर्णानंदा पूर्णपरेशा ॥ पुराणपुरुषा तव शरणं ॥ ७ ॥ जगदीशा तव शरणं ॥ जगन्नाथा तव शरणं ॥ जगत्पालका जगदीशा ॥ जगदोद्धारा तव शरणं ॥ ॥ ८ ॥ अखिलांतका तव शरणं ॥ अखिलैश्वर्या तव शरणं ॥ भक्तप्रिया वज्रपंजरा ॥ प्रसन्नवदना तव शरणं ॥ ९ ॥


दिगंबरा तव शरणं ॥ दीनदयाघन तव शरणं ॥ दीनानाथा दीनदयाळा ॥ दीनोद्धारा तव शरणं ॥ १० ॥ तपोमूर्ते तव शरणं ॥ तेजोराशी तव शरणं ॥ ब्रह्मानंदा ब्रह्मसनातन ॥ ब्रह्ममोहना तव शरणं ॥ ११ ॥ विश्वात्मका तव शरणं ॥ विश्वरक्षका तव शरणं। विश्वंभरा विश्वजीवना ॥ विश्वपरात्पर तव शरणं ॥ १२ ॥ विघ्नांतका तव शरणं ॥ विघ्ननाशना

तव शरणं ॥ प्रणवानीता प्रेमवर्धना ॥ प्रकाशमूर्ते तव शरणं ॥ १३ ॥ निजानंदा तव शरणं ॥ निजपददायक तव शरणं ॥ नित्यनिरंजना निराकारा ॥ निराधारा तव शरणं ॥ १४ ॥ चिद्घनमूर्ते तव शरणं ॥ चिदाकारा तव शरणं ॥ चिदात्मरूपा चिदानंदा ॥ चित्सुखकंदा तव शरणं ॥ १५ ॥ अनादिमूर्ते तव शरणं ॥ अखिलावतारा तव शरणं ॥ अनंतकोटिब्रह्मांडनायका ॥ अघटितघटना तव शरणं ॥ १६ ॥ भक्तोद्धारा तव शरणं ॥ भक्तरक्षका तव शरणं ॥ भक्तानुग्रह भक्तप्रिया ॥ पतितोद्धारा तव शरणं ॥ १७ ॥

टेंब्येस्वामीकृत

॥ करुणात्रिपदी ॥

शांत हो श्रीगुरुदत्ता मम चित्ता शमवीं आतां ॥ ध्रु० ॥ तूं केवळ माता जनिता सर्वथा तूंचि हितकर्ता ॥ तूं आप्त स्वजन भ्राता सर्वथा तूंचि त्राता ॥ चाल ॥ भयकर्ता तूं भयहर्ता ॥ दंडधर्ता तूं परिपाता ॥ तुजवांचुनि न दुजी वार्ता ॥ तूं आर्ता आश्रय दत्ता ॥ १ ॥ अपराधास्तव गुरुनाथा जरि दंडा धरिसि यथार्था ॥ तरि आम्ही गाउनि गाथा तव चरणीं नमवूं माथा ॥ चाल ॥ तूं तथापि दंडिसि देवा ॥ कोणाचा मग करुं धांवा ॥ सोडविता दुसरा



श्रीदत्तमूर्ति (आत्मारामबुवांचे राममंदिराशेजारीं दत्तमंदिर)

तेव्हां ॥ कोण दत्ता आम्हां त्राता ॥ २ ॥ तूं नटसा होउनि कोपी दंडितांहि आम्ही पापी ॥ पुनरपिहि चुकतां तथापि आम्हांवरि नच संतापी ॥ चाल ॥ गच्छतः स्खलनं क्वापि ॥ असें मानुनि नच हो कोपी ॥ निज कृपालेशा ओपीं ॥ आम्हांवरि तूं भगवंता ॥ ३ ॥ तव पदरीं असतां ताता आड मार्गीं पाउल पडतां ॥ सांभाळुनि मार्गावरता आणिता न दुजा त्राता ॥ चाल ॥ निज ब्रीदा आणुनि चित्ता ॥ तूं पतीतपावन दत्ता ॥ वळें आतां आम्हांवरता ॥ करुणाघन तूं गुरुनाथा ॥ ४ ॥ सहकुटुंब सहपरिवार दास आम्ही हें घरदार ॥ तव पदीं अर्पूं असार संसाराहित हा भार ॥ चाल ॥ परिहरिसी करुणासिंधो ॥ तूं दीनानाथ सुबंधो ॥ आम्हां अघलेश न बाधो ॥ वासुदेव प्रार्थित दत्ता ॥ शांत हो० ॥ ५ ॥

॥ पद ५ ॥

श्रीगुरुदत्ता जय भगवंता ॥ तें मन निष्ठुर न करीं आतां ॥ ध्रु० ॥ चोरें द्विजासी मारितां मन जें ॥ कळवळलें तें कळवळो आतां ॥ श्री० ॥ १ ॥ पोटशुळानें द्विज तडफडतां ॥ कळवळलें तें कळवळो आतां ॥ श्री० ॥ ॥ २ ॥ द्विजसुत मरतां वळलें तें मन ॥ हो किं उदासिन

न वळे आतां ॥ श्री० ॥ ३ ॥ सतिपति मरतां काकुळती येतां ॥ वळलें तें मन न वळे कीं आतां ॥ श्री० ॥ ४ ॥ श्रीगुरुदत्ता त्यजिं निष्ठुरता ॥ कोमल चित्ता वळवीं आतां ॥ श्रीगुरु० ॥ ५ ॥

॥ पद ६ ॥

जय करुणाघन निजजनजीवन ॥ अनसूयानंदन पाहि जनार्दन ॥ ध्रु० ॥ निज अपराधें उफराटि दृष्टी ॥ होउनि पोटीं भय धरुं पावन ॥ जय० ॥ १ ॥ तूं करुणाकर कधिं आम्हांवर ॥ रुससि न किंकरवरद कृपाघन ॥ जय० ॥ ॥ २ ॥ वारिं अपराध तूं मायबाप ॥ तव मनिं कोपलेश न वामन ॥ जय० ॥ ३ ॥ बाळकापराधां गणे जरी माता ॥ तरी कोण त्राता देईल जीवन ॥ जय० ॥ ४ ॥ प्रार्थी वासुदेव पदीं ठेवि भाव ॥ पदीं देवो ठाव देव अत्रिनंदन ॥ जय० ॥ ५ ॥

(मंत्रपुष्पांजलि, विडा, हुक्का, यांसाठीं पृ. १३–१४ पहा)

॥ शेवट ॥

शेवट गोड करीं ॥ दत्ता शेवट गोड करीं ॥ ध्रु० ॥ तन, मन, धन आशा अर्पिली चरणीं ॥ कर्तृत्वा नाहीं उरी ॥१॥

नलगे भक्ति, न लगे मुक्ति ॥ भजनीं प्रीति भरी ॥ २ ॥
सच्चिदानंदा तूं स्वामी दत्ता ॥ घरिं मज प्रेमें करीं ॥ दत्ता० ॥

(सायंकाळीं शेजारती १-२ पृ. १५, अष्टक १ पृ. १६, प्रार्थनेचा अभंग पृ. १८, पद ३ पृ. १९, धांवा १ पृ. २०)

नामसप्ताहाचा कार्यक्रम समाप्त

॥ आरती ६ ॥

कृष्णापंचगंगासंगम निजस्थान ॥ चरित्र दाउन केलें गाणगापुरगमन ॥ तेथें भक्तश्रेष्ठ त्रिविक्रमयति जाण ॥ विश्वरूपें तया दिधलें दर्शन ॥ जयदेव जयदेव जय सद्गुरु दत्ता ॥ नरसिंहसरस्वती जय विश्वंभरिता ॥ जयदेव० ॥ १ ॥ वंध्या साठी वर्षें पुत्रनिधान ॥ मृत ब्राह्मण उठवीला तीर्थें शिंपून ॥ वांझे म्हैसी काढवि दुग्ध दोहोन ॥ अंत्यजाचे मुखीं निगम संपूर्ण ॥ जयदेव० ॥ २ ॥ शुष्क काष्ठीं पल्लव दावुनि लवलाहीं ॥ कुष्ठी ब्राह्मण केला साधू निजदेहीं ॥ अभिनवलीला त्याची वर्णूं मी काई ॥ म्लेंछ राजा येउनि वंदी तव पायीं ॥ जयदेव० ॥ ३ ॥ दिपवाळीचे दिवशीं भक्त येऊनी ॥ आठहि जन मस्तक ठेविति तव चरणीं ॥

आठही ग्रामीं भिक्षा केली ते दीनीं ॥ निमिषार्धें तंतुक नेला शिवस्थानीं ॥ जयदेव० ॥ ४ ॥ ऐसें चरित्र दावुनि जडमुढ उद्धरिले ॥ भक्तवत्सल ऐसें ब्रीद मिरवीलें ॥ अगाध महिमा म्हणउनि वेदश्रुति बोले ॥ गंगाधरतनय वंदी पाऊलें ॥ जयदेव० ॥ ५ ॥

॥ आरती ७ ॥

स्वामी नरसिंहसरस्वती गे गुरुमूर्ति गे यतिवर्या गे मांगल ॥ कामितकामफलतृप्ती गे मांगल ॥ १ ॥ निरुपम नित्य माया गे मांगल ॥ निर्वाण अव्यक्त यतिराया गे मांगल ॥ स्वामी नर० ॥२॥ भक्तनर कल्पवृक्षा गे मांगल ॥ भक्तेंदुभजसुरमोक्षा गे मांगल ॥ स्वामी नर० ॥ ३ ॥ भीमागंधर्वपुरवासा गे मांगल ॥ भीमाशंकर गुरुवेशा गे मांगल ॥ स्वामी नर० ॥ ४ ॥

॥ आरती ८ ॥

श्रीपाद श्रीवल्लभ यतिवर भगवन् गुरुकीर्ते ॥ नाना नरसुरवरगणसंस्तुत करुणामयमूर्ते ॥ नित्यानंद समाधि-समाहित मानसपरिपूर्ते ॥ मुनिजनमानसहंसपरात्पर जय जय गुरुमूर्ते ॥ श्रीपाद० ॥ १ ॥ सर्गस्थितिलयकारण-

शंकरपरिपूरितस्फूर्ते ॥ चरणयुगे भूसुरगणपालकदारित-आवर्ते ॥ दुरितनिवारिणिकृष्णातटमठविहरणपरिपूर्ते ॥ कल्प-तरू औदुंबरछाये निविसिष्टापूर्ते ॥ श्रीपाद० ॥ २ ॥ मामतिकृपणमनाथं जीवय भुवनव्यावर्ते ॥ करुणाकलया चोद्धर पतितं गुरुमायागर्ते ॥ त्वत्पदशेखरतीर्थनतं कुरु त्वत्पदव्यावर्ते ॥ आरतीनाथयतिं प्रतिपालय भवभयपाशार्ते ॥ श्रीपाद० ॥ ३ ॥

॥ पालखीच्या वेळचीं पदें ॥

दत्तात्रय अवधूत जनार्दनस्वामी एकनाथ ॥ हीं नामें जे जपती त्यांसी साधे निजस्वार्थ ॥ ध्रु० ॥ अनन्यभावें अखंड जे कां भजती निजभक्त ॥ भक्ति देउनी दत्त तयांसी करी सहज मुक्त ॥ द० ॥ १ ॥ शुद्धभाव पाहुनियां प्रगटे स्वयें जनार्दन ॥ तत्क्षणीं तो करितो अहंभावाचें मर्दन ॥ द० ॥ २ ॥ ठाकुरदासा अनाथ जाणुनि करितो सनाथ ॥ एकपणेंविण एक दावी सद्गुरु एकनाथ ॥ द० ॥ ३ ॥

॥ पद ७ ॥

श्रीगुरु यतिवर भवभय दुर्धर निस्तर सत्वर श्रीस्वामी ॥ भक्तकृपाकर ध्यानरुचिर सुरवंद्य पदांबुज प्रणतों मी ॥ध्रु०॥ ब्रह्मा, विष्णु, शिव, गणपतिही अंबा, दुर्गा, तूं स्वामी ॥

श्रीपाद, श्रीवल्लभ, नरहरि दत्ता तुझीं रूपें नामी ॥
भक्तरक्षका नमो नमस्ते राहो प्रीती तव नामीं ॥ श्रीस्वामी
श्रीस्वामि जपा हो हेंच निदानीं ये कामीं ॥ श्रीगुरु० ॥ १ ॥
रामकृष्ण अवतार तुझेची झाले सदया जाणें मी ॥
पुराणपुरुषा मनुज मानिती तुज जे गढले गाढतमीं ॥
परब्रह्म साक्षात् श्रीगुरु श्रुति यापरि बोले निगमीं ॥
कल्पवृक्ष श्रीअक्कलकोटीं स्वामि विराजे मठधामीं॥श्रीगुरु०॥
॥ २ ॥ भाग्यवान् तो घडलें ज्यातें स्वामी दर्शन सप्रेमें ॥
अलभ्य लाभा तोचि लाधला स्वामिभजन जो करि नेमें ॥
धर्मसार हें तत्त्व मानवा जतन करीं तूं निष्कामें ॥
दास गणेशा आस स्वामिची त्याविण न दुजें कांहिं गमे ॥
श्रीगुरु० ॥ ३ ॥

॥ पद ८ ॥

शुभकर श्रीस्वामिराज गावुं सद्यशाला ॥ निशिदिनिं जो श्रवन करी वारि भवभयाला ॥ ध्रु० ॥ अक्कलकोटासि पहा ॥ गुरुप्रतिपदेसि महा ॥ श्रीनरसिंहोत्सव हा ॥ होत श्रुत जनाला ॥ शुभकर० ॥ १ ॥ एक वेळ घडत कसें ॥ उत्सव तो होत असे ॥ जल परि त्या ग्रामिं नसे ॥

विपुल प्राशनाला ॥ शुभकर० ॥ २ ॥ चिंतातुर लोक होती ॥ कष्टें जल आणविती ॥ नरोटिही न बुडे किती । त्रास सज्जनाला ॥ शुभकर० ॥ ३ ॥ जंगम कूपाभिधानी ॥ तत्तीरीं श्री बसुनी ॥ खेळति शिशुसंमेलनीं ॥ इटीदांडू खेळा ॥ शुभकर० ॥ ४ ॥ खेळाचें मिष धरोनी ॥ खोदिति यतिराज अवनि ॥ लघुशंका तींत करुनि ॥ करि चमत्कृतीला ॥ शुभकर० ॥ ५ ॥ जल न मिळे यास्तव ते ॥ प्रार्थिति जन श्रीगुरुतें ॥ रक्षा प्रभु आम्हांतें ॥ जिव व्याकुल झाला ॥ शुभकर० ॥ ६ ॥ हास्य येत यतिवरा ॥ म्हणती त्वरा करा ॥ वदतां अनृतगिरा ॥ कूप जलें भरला ॥ शुभकर० ॥ ७ ॥ अज्ञ लोक उपहासिति ॥ कैंवि घडे हेंचि वदति ॥ जाउन यापरि देखति ॥ त्वरित वापिकेला ॥ शुभकर० ॥ ८ ॥ तों जल तें कूपांतरिं ॥ विपुल दिसे हर्षभरीं ॥ भक्त स्तविति बद्ध करीं ॥ रक्षिं तव सख्यांला ॥ शुभकर० ॥ ९ ॥

॥ पद ९ ॥

भक्तकाजकल्पद्रुम स्वामिराज माझा ॥ लेंकुरासि माय जैसि शिणे भक्तकाजा ॥ ध्रु० ॥ पाहुनि स्वजना कष्टी मनीं

कळवळे ॥ सुमंगल शुभ कल्याण पीक फळफळे ॥ कल्पवृक्ष दीनानाथ ध्या रे भावबळें ॥ नको अन्य देवभक्ति व्रतोपवास पूजा ॥ भक्तकाज० ॥ १ ॥

॥ पद १० ॥

अक्कलकोटनिवासी स्वामी यश गातों मी ॥ अक्कलकोट० ॥ ध्रु० ॥ भव्य रुचिर तनु ध्यान विराजे ॥ गौरवर्ण कटिं मेखल साजे ॥ कस्तुरीटिळक कपाळीं ॥ वाली भक्तजनांचा ॥ अक्कल० ॥ १ ॥ भगवी छाटी कौपिनधारी ॥ हास्यवदन कंजनयन मुरारी ॥ नासिक जणुं चांफेकळी ॥ पाळी सोहे वाळा ॥ अक्कल० ॥ २ ॥ मस्तकिं टोपी माळ गळां नी ॥ रुद्राक्षांचे कुंडल डुलनी ॥ बाहु दीर्घ अवतारी ॥ स्वामी भवभयहारी ॥ अक्कल० ॥ ३ ॥

॥ पद ११ ॥

भक्तजना रक्षि स्वामिराज माउली ॥ प्रेमपान्हा पाजीं कृपा जशि गाउली ॥ ध्रु० ॥ अज आम्हां नकोले नव वैभव मुळीं ॥ शक्तिमान तूं समर्थ बद्ध अंजुळीं ॥ प्रार्थितों दयार्णवा दर्शन तूं वळीं ॥ क्षमा करीं दास तुझा लागे पाउलीं ॥ भक्तजना० ॥ १ ॥ चातुर्यें सृष्टि तुवां निर्मिली

पहा ॥ मनुज, पशु, पक्षि, वृक्ष, कीटकां अहा ॥ नक्षत्रें चंद्र सूर्य तेज ज्या महा ॥ सृष्टयुद्भवलयपालनिं मूर्ति शीणली ॥ भक्तजना० ॥ २ ॥ जलबुद्बुदापरीस आयु हें नरा ॥ येत कुठुनि जात जीव कोणत्या थरा ॥ मायबाप बंधु पुत्र मित्र तूं खरा ॥ व्यर्थ इतर मायिक मति चरणिं रंगली ॥ भक्तजना० ॥ ३ ॥

॥ पद ६२ ॥

अनन्यभावें शरण रिघा श्रीस्वामी गुरुराया ॥ भक्तजनोद्धारार्थ धरी जो सगुणा रूपा या ॥ ध्रु० ॥ सद्भावें पाहतांच ही श्रीसद्गुरूची मूर्ती ॥ परमानंदीं वृत्ति जडोनी दे नयना शांती ॥ जडाभाग्य हा निरसुनि अवघा येत मना स्फूर्ती ॥ अति सुलभ हा नृपपथ देखा भवाब्धि उतराया ॥ अनन्य० ॥ १ ॥ पूर्ण सनातन आदिरूप जें चिद्रूपें सजलें ॥ भक्तजनांच्या दयार्द्र वचनीं अंतरिं कळवळलें ॥ निर्गुणरूपा त्यागुनि सगुणत्वें जें अवतरलें ॥ भक्तकाजकल्पद्रुम तो हा तारक लोकीं या ॥ अनन्य० ॥ २ ॥ दत्तदिगंबरमूर्ति विराजे भव्याकृति तेजें ॥ सरळ नेटकें नासिक बाहू अजानु शोभति जे ॥ रूप मनोहर सुंदर शोभे इच्छित पुरवी जे ॥ ते श्रीचरणांबुज नतसेवक वंदितसे सखया ॥ अनन्य० ॥ ३ ॥

॥ पद १३ ॥

दीनदयाळा श्रीगुरुराया अर्जी ही ऐका ॥ जोडुनि कर हे विनवितसें तुज न मागें पैका ॥ ध्रु० ॥ आत्मस्वरूपीं ध्यान निरंतर हें द्यावें मजला ॥ प्रेमानंदें करुन खरा हा देह अर्पिला तुजला ॥ १ ॥ विश्वारंगीं रंग खरा हा एकचि मजला भासो ॥ सदया सदय हृदय निरंतर तुजला बा आसो ॥ २ ॥ देहादेहीं देह विरावा मग जीरावा पर पाहें ॥ आत्मस्वरूपीं रूप निरंतर रंगुनियां राहे ॥ ३ ॥ अनंत भुवनीं भरा भरली अवघी तव सत्ता ॥ नाम वाणिनें घेतां जगिं हे हरली भवव्यथा ॥ ४ ॥ आनंदानें अर्जी केली ध्या पायांपाशीं ॥ नाम तुझें बा खरें बळें हें तारी जगतासी ॥ ५ ॥

॥ पद १४ ॥

आतां मी नाहीं मी नाहीं ॥ नरहरिवांचुनि कांहीं ॥ आतां० ॥ ध्रु० ॥ विकल्प अवघा सरला ॥ दोहीं डोळां नरहरि भरला ॥ आतां० ॥ १ ॥ अनुभव पाउलिं वाटे ॥ जिविंचें जीवन नरहरि भेटे ॥ आतां० ॥ २ ॥ सच्चित्सुख-घनसारा ॥ नरहरिविरहित व्यर्थ पसारा ॥ आतां० ॥ ३ ॥

सांडुनि साधन क्षुद्रा ॥ सबाह्य अंतारें नरहरि मुद्रा ॥ आतां० ॥ ४ ॥ शिवदिन जिवपण नेलें ॥ केसरिगुरुनें नरहरि केलें ॥ आतां० ॥ ५ ॥

॥ पद १५ ॥

सद्गुरुजी कोठवरी वाट तुझी पाहूं ॥ नरहरिजी कोठवरी वाट तुझी पाहूं ॥ जिवलगा केविं तुझा वियोग मी साहूं ॥ स० ॥ ध्रु० ॥ पतित म्हणुनि काय मला न भेटसी देवा ॥ पतितपावन नाम कां रे वागविसी हेवा ॥ स० ॥ १ ॥ व्यापक तूं जनीं वनीं नोळखिसी मातें ॥ ऐक्यपदीं जीवशिवा नसे भेद नातें ॥ स० ॥ २ ॥ सैंधवाचा खडा पडे जरी सागरांत ॥ अल्प म्हणुनि त्यागितसे काय जलधि त्यातें ॥ स० ॥ ३ ॥ श्रीनृसिंहसरस्वती जगद्गुरुराया ॥ श्रीधरविभु पाव आतां नमन तुझ्या पायां ॥ स० ॥ ४ ॥

॥ पद १६ ॥

इतुकें दे मजला दे मजला ॥ मागतसें हरि तुजला ॥ इतुकें० ॥ ध्रु० ॥ संतसमागम अर्चा ॥ सारासार ज्ञानचर्चा ॥ इतुकें० ॥ १ ॥ संत घराप्रति येती ॥ भक्तिभावें शरण तयांप्रति ॥ इतुकें० ॥ २ ॥ भगवद्भजनीं जागे ॥ तुझिया

स्वरुपीं मन हें लागे ॥ इतुकें० ॥ ३ ॥ ऐसेंचि वैभव देईं ॥ अखंड केशव सद्गुरुपायीं ॥ इतुकें० ॥ ४ ॥

॥ पद १७ ॥

तो नर गति चुकला गति चुकला ॥ गुरुभजनातें मुकला ॥ ध्रु० ॥ शास्त्रें पाहुनि वक्ता ॥ बोलत फार अनुभव नसतां ॥ तो० ॥ १ ॥ धर्मवासना कांहीं ॥ ज्याचे मानासिं तिळभर नाहीं ॥ तो० ॥ २ ॥ संतसमागम हरिभक्ति ॥ क्षणभर न ये मनांत विरक्ति ॥ तो० ॥ ३ ॥ दास म्हणे धरि भाव ॥ भावावांचुनि कैसा देव ॥ तो०॥४॥

॥ पद १८ ॥

दत्तात्रेय अवधूता जनार्दनस्वामी एकनाथा ॥ गुरु-दत्तात्रेय० ॥ ध्रु० ॥ दत्त अवधूत ॥ अवधूत निराकार ॥ स्मरणें पावे सत्वर ॥ शुद्ध अविनाश ॥ अविनाश सुंदर ॥ स्वरुप हें दिसे मनोहर ॥ पतित मी पापी ॥ पापी दुर्धर ॥ ने तूं भवसिंधुपार ॥ मागणें हेंची ॥ हेंची सत्वर ॥ मस्तकीं ठेविं अभयकर ॥ सगुण हें रूप ॥ रूप दावीं आतां ॥ जनार्दन० ॥ १ ॥ मुख्य निवास ॥ निवास मेरूशिखरीं ॥ समाधिनिद्रा माहूरीं ॥ स्नान सारीलें ॥ सारीलें

गंगातीरीं ॥ टिळक रेखीला पंढरी ॥ माध्यान्हीं भिक्षा करवीरीं ॥ भोजन केलें कावेरीं ॥ सायंसंध्या ॥ संध्या सागरीं ॥ मुख्य तें आसन केदारीं ॥ जाउनी चरणीं ॥ चरणीं ठेऊं माथा ॥ जनार्दन० ॥ २ ॥ भस्मभूषित ॥ भूषित दिव्यकांती ॥ माळा त्रिशूळ डमरु हातीं ॥ गळां वनमाळा ॥ वनमाळा वैजयंती ॥ कर्णी कुंडलें सूर्यदीप्ती ॥ माथां मुकूट ॥ मुकुट चंद्रज्योती ॥ पाहतां वेधली मनोवृत्ती ॥ आकर्ण नयन ॥ नयन मदनमूर्ती ॥ वर्णितां मौनावल्या श्रुती ॥ तेथें मी पामर ॥ काय वर्णू आतां ॥ जनार्दन० ॥ ३ ॥ अत्रि अनसूया ॥ अनसूयात्मज दत्त ॥ त्रिगुण अवतार मूर्तिमंत ॥ कटीं मेखला ॥ मेखला रत्नजडित ॥ चरणीं नूपुरें रुणझुणत ॥ प्रसन्न हें वदन ॥ वदन हर्षयुक्त ॥ तारिले पतित असंख्यात ॥ अखंड हें नाम ॥ नाम वदनांत ॥ मूर्ति मम बिंबली हृदयांत ॥ अभय वर देई ॥ देई गुरुनाथा ॥ जनार्दन० ॥ ४ ॥ लक्षचौऱ्यांयशीं ॥ चौऱ्यांयशीं जन्म वायां ॥ म्यां भोगिले गुरुराया ॥ भक्त-वत्सला ॥ वत्सला दत्तराया ॥ करावी कृपेची छाया ॥ मागणें हेंचि ॥ गुरुसखया ॥ न्यावें मातें निज ठाया ॥ कृष्णात्मजासी ॥ आत्मजासी तारिं आतां ॥ जनार्दन० ॥ ५ ॥

॥ पद १९ ॥

श्रीविधिहरिहर मूर्ति सांवळी कृष्णातिरिं राहे ॥ दत्त-दिगंबर म्हणाति जयाला औदुंबरछाये ॥ ध्रु० ॥ कृष्णातिरिंचा अगाध महिमा दुर्लभ देवांसी ॥ ईचे तीरीं वास जयाचा अखंड हो काशी ॥ प्रातःकाळीं सुरगण मुनिजन येती स्नानासी ॥ पवित्र होउनि शुद्ध भक्तिनें साधन मोक्षासी ॥ शुष्क पातकें गणती नाहीं जाती विलयासी ॥ महापातकें स्नानें करितां जाती मोक्षासी ॥ चला जाउंया करा तयारी सत्वर लवलाहें ॥ दत्त० ॥ १ ॥ ध्यान पाहतां भगवीं वस्त्रें परिकर लंगोटी ॥ सर्वांगीं चर्चुनी बैसले भस्माची ऊटी ॥ दंडकमंडलु करीं घेउनी उपवस्त्रें छाटी ॥ रुद्राक्षांचे हार प्रफुल्लित शोभति बहु कंठीं ॥ शमीपत्र किति बिल्व तुलसिदल सुमनांची दाटी ॥ प्रेमानंदें भक्त वाहती आवड बहु मोठी ॥ हास्यमुखानें कृपाकटाक्षें दासांकडे पाहे ॥ दत्त० ॥ २ ॥ औदुंबराची पूजा करितां कोटी पापांची ॥ राखरांगोळी होउनि जाते साक्षी अंबेची ॥ अशा वृक्षातळिं स्वारी बसली दत्ताची ॥ तीन त्रिकाळीं पूजा होतसे श्रीगुरुरायाची ॥ सायंकाळीं असें वाटतें

शोभा स्वर्गाची ॥ पत्रपुष्पें अति घोष गर्जना चर्चा वेदांची ॥ सीतारामा आला प्रेमा आनंद न समाये ॥ दत्त० ॥ ३ ॥

॥ पद २० ॥

सांगावें ॥ कवण्या ठाया जावें ॥ कवणातें स्मरावें ॥ कैसें काय करावें ॥ कवण्यापरि मीं रहावें ॥ कवण येउनी कुरुंदवाडीं स्वामीतें मिळवावें ॥ या हारीं ॥ जेवावें व्यवहारीं ॥ बोलावें संसारीं ॥ घालुनि अंगीकारीं ॥ प्रतिपाळिसि जो निर्धारीं ॥ केला जो निजनिश्चय स्वामी कोठें तो अवधारीं ॥ या रानीं ॥ माझी करुणावाणी ॥ काया कष्टी प्राणी ॥ ऐकुनि घेशिल कानीं ॥ देशिल सौख्य निदानीं ॥ संकट होउनि मूर्च्छित असतां पाजिल कवण पाणी ॥ त्या वेळां ॥ सत्पुरुषांचा मेळा ॥ पाहतसे निज डोळां ॥ लाविसि भस्म कपाळा ॥ सांडीं भय तूं बाळा ॥ श्रीपाद श्रीवल्लभ म्हणती अभय तुज गोपाळा ॥ सां० ॥१॥

॥ अष्टक ४ ॥

ज्या संगतीनेंच विराग झाला ॥ मनोदरींचा जडभास गेला ॥ साक्षात्परात्मा मज भेटवीला ॥ विसरूं कसा मी

गुरुपादुकांला ॥ १ ॥ सद्योगपंथें घरिं आणियेलें ॥ अंगेंच मातें परब्रह्म केलें ॥ प्रचंड तो बोधरवी उदेला ॥ विसरूं० ॥ २ ॥ चराचरीं व्यापकता जयाची ॥ अखंड भेटी मजला तयाची ॥ परंपदीं संगम पूर्ण झाला ॥ विसरूं० ॥ ३ ॥ जो सर्वदा गुप्त जनांत वागे ॥ प्रपन्न भक्तां निजबोध सांगे ॥ सद्भक्तिभावाकरितां भुकेला ॥ विसरूं० ॥४॥ अनंत माझ्या अपराधकोटी ॥ नाणीं मनीं घालुनि सर्व पोटीं ॥ प्रबोध करितां श्रम फार झाला ॥ विसरूं० ॥ ५ ॥ कांहीं मला सेवनही न झालें ॥ तथापि तेणें मज उद्धरीलें ॥ आतां तरी अर्पिन प्राण त्याला ॥ विसरूं० ॥ ६ ॥ माझा अहंभाव असे शरीरीं ॥ तथापि तो सद्गुरु अंगिकारी ॥ नाहीं मनीं अल्प विकार ज्याला ॥ विसरूं० ॥ ७ ॥ आतां कसा हा उपकार फेडूं ॥ हा देह ओंवाळुनि दूर सांडूं ॥ म्यां एकभावें प्रणिपात केला ॥ विसरूं० ॥ ८ ॥ जया वानितां वानितां वेदवाणी ॥ म्हणे 'नेति नेती'ति लाजे दुरूनी ॥ नव्हे अंत ना पार ज्याच्या रुपाला ॥ विसरूं० ॥ ९ ॥ जो साधुचा अंकित जीव झाला ॥ त्याचा असे भार निरंजनाला ॥ नारायणाचा श्रम दूर केला ॥ विसरूं० ॥१०॥



श्रीपाद श्रीवल्लभ दत्तात्रेय

श्रीक्षेत्र गाणगापूर

॥ अष्टक ५ ॥

सदा प्रार्थितों श्रीगुरूच्या पदासी ॥ धरीतों शिरीं वंदितों आदरेंसीं ॥ धरोनी करीं तारिं या बाळकासी ॥ नमस्कार माझा गुरुदत्तात्रयासी ॥ १ ॥ मतीहीन मी दीन आहें खरा हो ॥ परी दास तूझा करीं पारखा हो ॥ जसें लेंकरूं पाळितें माय कूशी ॥ नमस्कार० ॥ २ ॥ लडीवाळ मी बाळ अज्ञान तूझा ॥ गुरूवांचुनी पांग फेडील माझा ॥ दुजा कोण आहे तुजवीण आम्हांसी ॥ नमस्कार० ॥ ३ ॥ माय बाप बंधू सखा तूंच देवा ॥ पुत्र मित्र सारे सोयरे व्यर्थ हेवा ॥ कळोनी असे सर्व भ्रांति आम्हांसी ॥ नमस्कार० ॥ ४ ॥ औदुंबरासंनिध सर्वकाळ ॥ जनीं वनीं क्रमितसे नित्य काळ ॥ सद्गुरूचें नाम सज्ञानराशी ॥ नमस्कार० ॥ ५ ॥ रजकास राज्य देउनी थोर केला ॥ घटस्पोट तो रोग जळोनि गेला ॥ तसें पाळीं कृपा करोनि आम्हांसी ॥ नमस्कार० ॥ ६ ॥ सत्त्वधीर अनसूया सती आदिमाता ॥ त्रैमूर्ति ध्यानीं मनीं नित्य गातां ॥ हरे रोग व्याधी दरिद्रासि नाशी ॥ नमस्कार० ॥ ७ ॥ गुरूचीं चरित्रें करी नित्य पाठ ॥ पदीं भक्त लागेल जो एकनिष्ठ ॥

तयाचे कुळीं दीप सज्ञानराशी ॥ नमस्कार० ॥ ८ ॥ करोनी मनीं निश्चय अष्टकाचा ॥ करा हो जनीं पाठ दत्तात्रयाचा ॥ करी माधवसुत दासानुदासी ॥ नमस्कार० ॥ ९ ॥

॥ अष्टक ६ ॥

भक्तास्तव प्रगट होउनि शुष्ककाष्ठीं ॥ केली तयावरि कृपामृतपूर्णदृष्टी ॥ तेणेंपरीच चुकवीं मम जन्मफेरे ॥ अद्यापि कां नरहरी करुणा न ये रे ॥ १ ॥ विश्वासलों दृढमनें तुझिया पदासी ॥ कीं वारिसील म्हणुनी मम आपदांसी ॥ तें दाविशील नयनीं कधिं सांग बा रे ॥ अद्यापि० ॥ २ ॥ देवा तुझें हृदय कोमल फार आहे ॥ ऐशापरी निगमशास्त्रहि आण वाहे ॥ तें काय वाक्य लटिकें करितोसि बा रे ॥ अद्यापि० ॥ ३ ॥ मी दीन हीन कुमती तुज वर्म ठावें ॥ ऐशापरी त्यजुनि कोप उदार व्हावें ॥ गाती तुझें पतितपावन नाम सारे ॥ अद्यापि० ॥ ४ ॥ माझें अपार तम पातकसंघजाळीं ॥ क्रोधाग्निनें हरि तुझ्या सहमूळ जाळीं ॥ तैसा करीं दृढ जसा भवबंध बा रे ॥ अद्यापि ०॥ ५ ॥ श्रीपद्महस्त मम मस्तकिं ठेविं बापा ॥ दृष्टीस दाखविं बरें

निज चित्स्वरूपा ॥ हें दान दे वचन अन्य न मी वदें रे ॥ अद्यापि० ॥ ६ ॥ आयुष्य घालुनि अधीक मृत द्विजाला ॥ त्वां वांचवोनि जनिं वाढविली स्वलीला ॥ होसी समर्थ मज चाळविसी वृथा रे ॥ अद्यापि० ॥ ७ ॥ वंचावयासि करुणाधन लोभ वाटे ॥ टाकून दे विरुद लावि मला अवाटे ॥ नाहीं तरी झडकरीं मज भेट दे रे ॥ अद्यापि० ॥ ८ ॥ पाप्यासि तारुनि बळें जन सोकवीलें ॥ तूझेंच कृत्य तुज मुख्य फळासि आलें ॥ हें सोडिसी अतां सुटेल तुला कसें रे ॥ अद्यापि० ॥ ९ ॥ ही श्रीधरें रचुनियां नवरत्नमाला ॥ प्रेमेंचि अर्पिलि बरी पुरुषोत्तमाला ॥ हें वर्णितां नरहरी संकट सर्व वारी ॥ श्रीपाद सद्गुरु यतीश्वर चिद्विहारी ॥ १० ॥

॥ अष्टक ७ ॥

स्वयंभू मुखांभोरुहा दिव्यकांती ॥ विराजीत जे शुद्ध चैतन्य ज्योती ॥ स्वदासां सदा सार निःसार दावी ॥ महाराज श्री स्वामिमूर्ती नमावी ॥ १ ॥ निराकार साकार झाले पहा हो ॥ विदेही सुदेहाकृतीतें वरी हो ॥ चिदानंद आनंद कैवल्य दावी ॥ महाराज० ॥ २ ॥ शिरीं टोपि भाळीं टिळा गंध रेखा ॥ सुकंठीं दिसे मुक्तमाला सुरेखा ॥

सुमुक्ता हृदीं वास सर्वांस दावी ॥ महाराज० ॥ ३ ॥ दिसे अंगुली मुद्रिकायुक्त जी ती ॥ नखाग्रीं वसे कोटि-कंदर्पदीप्ती ॥ स्वभक्तां खुणा व्यक्त अव्यक्त दावी ॥ महाराज० ॥ ४ ॥ दिसे साजिरें गोजिरें रूप कैसें ॥ करी दर्शनें शांत नेत्रां अपैसें ॥ अभोगीपणें भोग संभोग दावी ॥ महाराज० ॥ ५ ॥ सुदेहावरी वृत्ति देहा वरीना ॥ कृती ते करी प्रकृती स्वीकरीना ॥ असंभाव्य रूपांतरीं भक्ति दावी ॥ महाराज० ॥ ६ ॥ जगदोद्धारणीं कारणीभूत व्हावें ॥ अजानूकरा स्वीकरीलें स्वभावें ॥ असाधारणें धारणाशक्ति दावी ॥ महाराज० ॥ ७ ॥ स्वयें दत्त हा सांडुनी स्वात्मतेला ॥ करी भक्तकार्जीं अनातर्क्य लीला ॥ भला लाभला लाभ भक्ता सुदैवी ॥ महाराज० ॥ ८ ॥ सदा स्वांतरीं भ्रांति संमोहवीते ॥ वदा अष्टका नित्य मृत्युंजयातें ॥ न बाधेल ती ही सखा खूण दावी ॥ महाराज० ॥ ९ ॥

॥ अष्टक ८ ॥

लोपोनि भास्कर जयद्रथ मारियेला ॥ लज्जानलांतुनि धनंजय वांचवीला ॥ लाक्षागृहीं विवरिं पांडव रक्षियेले ॥ माझेविशींच मन निष्ठुर केविं केलें ॥ १ ॥ दुग्धामिषें

द्विजसुतें स्तविला मुरारी ॥ दुग्धार्णवीं अचल ठेविसि पूतनारी ॥ कुब्जेचि भक्ति तरि देखुनि क्षेम दीलें ॥ माझे-विशींच० ॥ २ ॥ आणोनि राजतनया अधमें सभेला ॥ दुष्टोत्तरें करवि नग्न जरी सतीला ॥ तीकारणें स्वकरिं अंबर नेसवीलें ॥ माझेविशींच० ॥ ३ ॥ उत्तानपाद नृप केवळ पुण्यराशी ॥ तत्सूत तो ध्रुव तपोधन योगराशी ॥ त्याकारणें अचल धाम करून दीलें ॥ माझेविशींच० ॥ ४ ॥ नक्रें जळांत चरणीं धरिलें गजेंद्रा ॥ म्लानोत्तरेंकरुनियां स्तवि देवइंद्रा ॥ तैं दीनबंधु ब्रिद सत्वर रक्षियेलें ॥ माझे-विशींच० ॥ ५ ॥ वृत्रारि कोपुनि शिळाघन वर्षवीला ॥ तेव्हां भयप्रलय कंप गमे जनाला ॥ घेवोनि त्या गिरि करीं व्रज रक्षियेलें ॥ माझेविशींच० ॥ ६ ॥ सिंधूजळांत कनकापुर दूर गांवें ॥ तेथूनि शीघ्रगति मोक्षपुरीस यावें ॥ काष्ठाग्नि घे भरत दर्शन त्यासि दीलें ॥ माझेविशींच० ॥ ७ ॥ जे शापदग्ध पडली बहुतां दिसांची ॥ लावोनि पाय हरिली जडता तियेची ॥ त्या भक्तवत्सलपणाप्रति काय झालें ॥ माझेविशींच० ॥ ८ ॥ दुर्योधनें ऋषिंस धाडियलें वनातें ॥ धर्मा छळूनि मुनि मागति भोजनातें ॥ त्याकारणें परम अन्न निशींत दीलें ॥ माझेविशींच० ॥ ९ ॥ दारिद्र्यतेकरुनि

पीडित तो सुदामा ॥ मुष्टी भरूनि पृथु आणित कृष्णधामा ॥ देवोनि कांचनपुरी द्विजराज केलें ॥ माझेविशींच० ॥ १० ॥ त्रिकाळीं करा घोष या अष्टकाचा ॥ मनींचा पुरे अर्थ तेव्हांच साचा ॥ विनंती असे भक्त हो वामनाची ॥ उपेक्षा न कीजे यया अष्टकाची ॥ ११ ॥

॥ अष्टक २ ॥

दत्ताचा अवतार मूर्ति बरवी भासे जनातें पहा ॥ वांछा पूर्ण करावया प्रगटवी संन्यासदीक्षा महा ॥ स्वांगें रक्षुनि भक्त सर्व अपुले मोक्षासि दे जो करीं ॥ स्वामीराज दिगंबराख्य वसती सुक्षेत्र प्रज्ञापुरी ॥ १ ॥ श्रीपादाख्य यती पुन्हां नरहरीरूपासि जो कां धरी ॥ दीक्षा घेउन काशिकापुरिं आला तेथूनि भीमातिरीं ॥ हर्षें राहुनि गाणगापुरिं जनां रक्षी सुताचे परी ॥ स्वामीराज० ॥ २ ॥ भक्तांच्या मनकामना पुरवुनी श्रीशैल्यभूमी धरी ॥ झाला गुप्त स्वयेंचि कर्दळिवनीं जो सर्वसाक्षी हरी ॥ आला मागुति तोचि प्रस्तुत पहा प्रत्यक्ष या भूवरी ॥ स्वामीराज० ॥ ३ ॥ स्वेच्छाचारि यती सदा विचरती धामीं वनीं जाणिजे ॥ भावें जे भजती तयां सकल दे ऐसे न

कोणी दुजे ॥ नेत्रानें अवलोकिलें नच कदा कल्पद्रुमाचे परी ॥ स्वामीराज० ॥ ४ ॥ टोळाचे सदनीं स्वयें उठविल्या ज्यानें पहा पादुका ॥ मालोजी नृप भोसल्यास दिधला मोक्षार्थ जाणा निका ॥ चोळप्पात्मज रोगयुक्त असतां पीडा तयाची हरी ॥ स्वामीराज० ॥ ५ ॥ दैन्यें त्रासुनि फार दुःखित असे तेली बसाप्पा पहा ॥ त्याचा पाहुनि भाव सद्गद मनें दे कांचनातें महा ॥ कन्या पुत्र कुणासि होति वरदा श्रीदत्तमूर्ती खरी ॥ स्वामीराज० ॥ ६ ॥ बापू ठाकुरदासपुत्र पिडला कुष्ठें महा साच हो ॥ झाले त्रस्त सदा मनीं वानिं जनीं वाटे तया जाच हो ॥ तोषें देउनि खोड एक हरिलें ख्याती असे भूवरी ॥ स्वामीराज० ॥ ७ ॥ वाडीं गाणगापुरवासि जन जे सेवेकरी राहती ॥ त्यांतें स्वप्निं वदे सदा मजकडे काम्यार्थना निश्चिती ॥ मद्रूपीं यतिराज राजभुवनीं जातां भवातें हरी ॥ स्वामी-राज० ॥ ८ ॥ भावें अष्टक पाठ नित्य करितां तोषे सदा श्रीहरी ॥ प्रज्ञास्त्रीसुतदारधाम अवघें देऊनि तापा हरी ॥ स्वामी सेवक बाळकृष्णसुत हा नामें सखाराम हो ॥ गातां गीत गमे मला बहु बरा जाणा सुखाराम हो ॥ ९ ॥

॥ अष्टक १० ॥

होता ब्राह्मण भार्ययासह पुरा आला तिच्या ऊदरा ॥ मौनत्वें करितो विचित्र मग जे नाना विलासें हरा ॥ मौंजीबंधन जाहल्या तदुपरी काशीपुरा चालिला ॥ तो हा सद्गुरुराज श्रीनरहरी औदुंबरीं राहिला ॥ १ ॥ गंगास्नान निरंतरा करितसे कालत्रया साधुनी ॥ चिन्मुद्रा करितो दृढासनिं बसे काशीस ध्यातो मुनी ॥ येती थोर यती नमूनि म्हणती आम्हांसि तो आगळा ॥ तो हा सद्गुरु० ॥ ॥ २ ॥ वृद्ध कृष्णसरस्वती यतिवरा सर्वांसि मान्यो भला ॥ त्यातें वंदुनि बोलती निजगुजें संन्यास देणें मला ॥ चातुर्थाश्रम घेउनी गुरुचिये आज्ञें स्वयें घेतला ॥ तो हा सद्गुरु० ॥ ३ ॥ काषायांबर दंड हस्तकमळीं कमंडलु मेखला ॥ भस्मोद्धूलित केवळा शशिकला रुद्राक्षमाळा गळां ॥ तीर्थाला करुनी पुनीत सकळां पृथ्वीवरी चालिला ॥ तो हा सद्गुरु० ॥ ४ ॥ मेरु सव्य करूनियां मनोगती जातो कसा निर्गुणी ॥ मायामोह त्यजूनि निर्मळ मनीं तीर्थें बहू वंदुनी ॥ सुक्षेत्रीं पुरगाणगाप्रति गुरू तात्काळ जो पावला ॥ तो हा सद्गुरु० ॥ ५ ॥ स्थानें उत्तम शोधुनी त्रिभुवनीं नाहीं असें पाहुनी ॥ आला सत्वर पातला कुरुपुरीं एकांत

राहे वनीं ॥ रजकें जाउनि वंदितां प्रतिदिनीं राज्यासनीं स्थापिला ॥ तो हा सद्गुरु० ॥ ६ ॥ हांनी ब्राह्मणि साठ वर्षं तिजसी कन्या कुमारे दिला ॥ वंध्या म्हैशिसि दोहुनी फुलविलें काष्ठा किडे खादला ॥ अंत्यजा मुखीं वेदही वदविला त्रिविक्रमा भेटला ॥ तो हा सद्गुरु० ॥ ७ ॥ त्रैमूर्ती अवतार हा यतिवरा वेषें धरी मानसा ॥ त्यासी जे नर लोक मूढ म्हणती होई यमा बांधवा ॥ ज्यानें कुंभजवंशि तो गुरुपदीं कृष्णातटीं पाहिला ॥ तो हा सद्गुरु० ॥ ८ ॥ एवं हें गुरुअष्टक प्रतिदिनीं त्रीकाळ जे पाठती ॥ पापें नासति पुण्य पावति अती कीर्ती बहू वाढती ॥ विद्या गोधन संतती दृढमती सत्त्वें गुणें राहती ॥ एवं नित्य करीत जे गुरुस्तुती अंतीं गती पावती ॥ ९ ॥

॥ अथ श्रीपादभूषणप्रारंभः ॥

॥ अध्याय १ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीमातापितृभ्यां नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ ॐनमोजी गणनायका ॥ अखिल सुखाच्या दायका ॥ जगद्वंद्या विघ्नांतका ॥ शिवबालका जगदीशा ॥ १ ॥ चतुर्भुजा शूर्पकर्णा ॥ वक्रतुंडा दयाघना ॥ लंबोदरा गजानना ॥ मूळारंभा तुज नमो ॥ २ ॥ तुझें नामस्मरण करितां ॥ न बाधे कदा दुःखवार्ता ॥ तूंचि सर्व कर्ता हर्ता ॥ सुरवर तुज वंदिती ॥ ३ ॥ माझे पुरवावे मनोरथ ॥ जेणें साधे परमार्थ ॥ तैसा लाभे महान् अर्थ ॥ ऐसें करीं कृपाळुवा ॥ ४ ॥ श्रीदत्ताचा अवतार ॥ दिगंबराचार्यवर ॥ यतिराज वरदकर ॥ त्याचे गुण वर्णावया ॥ ५ ॥ स्फूर्ति देईं दासासी ॥ जेणें गाईन चरित्रासी ॥ तयाचा पवाडा जगासी ॥ सांगेन ऐसें करीं बा ॥ ६ ॥ आतां वंदूं ब्रह्म-कुमारी ॥ जी वाचेची ईश्वरी ॥ वीणा पुस्तक धरी करीं ॥ हंसवाहिनी अंबिका ॥ ७ ॥ माते पाहसी तूं जिकडे ॥ पद्मराग होती खडे तिकडे ॥ माझें निवारीं सांकडें ॥

बोल बोबडे मान्य करीं ॥ ८ ॥ जिव्हाग्रीं तूं करूनि वास ॥ दिगंबरचरित्र वर्णवीं सुरस ॥ गातां होईल त्रितापनाश ॥ ऐसें करीं जगदंबे ॥ ९ ॥ तुझे चरणीं करूनि नमन ॥ करूं आरंभिलें कवन ॥ मी तों असें मतिहीन ॥ करीं पावन तूं मातें ॥ १० ॥ आतां वंदूं आराध्य दैवत ॥ गोपालकृष्ण वसुदेवसुत ॥ अनंतकोटिब्रह्मांडें त्वरित ॥ घडामोड करी क्षणार्धें ॥ ११ ॥ कर्ता करविता नारायण ॥ तोचि सांगे कर्णीं येऊन ॥ यतिरायाचें गुणवर्णन ॥ करीं आतां आनंदें ॥ १२ ॥ तीच आज्ञा करूनि मान्य ॥ करूं आरंभिलें गुणवर्णन ॥ सिद्धीस नेईल मधुसूदन ॥ साभिमानी दासाचा ॥ १३ ॥ भक्त रक्षावयालागून ॥ स्तंभीं प्रगटला सिंहवदन ॥ हिरण्यकशिपूचा घेऊनि प्राण ॥ प्रल्हाद सगुण संबोखिला ॥ १४ ॥ नानानाटकसूत्रधारी ॥ स्मरे ज्याला त्रिपुरारी ॥ ब्रह्मादि देव वृत्रारी ॥ वंदिती चरण सद्भावें ॥ १५ ॥ प्रथम वंदूं कवीश्वर ॥ व्यास वाल्मीकि पराशर ॥ गौतम कश्यप मुनिवर ॥ सद्भावेंकरोनि वंदिले ॥ १६ ॥ भावें वंदूं गुरुचरण ॥ जे भवभय करिती हरण ॥ अनन्यभावें जावोनि शरण ॥ कालक्षेप करावा ॥ १७ ॥ श्लोक ॥ गुरु-

ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ टीका ॥ ब्रह्मा विष्णु शंकर ॥ हे जगद्गुरु साचार ॥ परब्रह्मरूप निर्धार ॥ गुणातीत जाण पां ॥ १८ ॥ जनक जननी गुरु जाण ॥ तयांचे वंदोनियां चरण ॥ सखाराम करी वर्णन ॥ हर्षेंकरूनि स्वामींचें ॥ १९॥ श्रोता वक्ता नारायण ॥ तोचि करवितो लेखन ॥ त्याचें नाम श्रीपादभूषण ॥ तयानेंचि ठेविलें ॥ २० ॥ आहे निमित्ताचा धनी ॥ नोहे माझी ही करणी ॥ हृदयीं प्रकटुनी लेखनीं ॥ प्रवृत्त झाला जगदात्मा ॥ २१ ॥ जैसा कागद कोरपाट ॥ त्यावरी मुद्रा करी नृपश्रेष्ठ ॥ तोचि सर्वांसी होय वरिष्ठ ॥ ज्ञाते स्पष्ट बोलती ॥ २२ ॥ तेवीं मंदभाग्य मी पामर ॥ परी झालों हरीचा वेत्रधर ॥ त्रिभुवनीं मान्य साचार ॥ तयायोगें जाण पां ॥ २३ ॥ आतां असो भाषण ॥ श्रोते परिसा श्रीपादभूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ तयामाजीं पूर्ण कीं ॥ २४ ॥ ब्रह्मवैवर्त पुराण गहन ॥ तयामाजीं असे कथन ॥ वटपत्रशायी नारायण ॥ बालरूपें निद्रिस्थ पैं ॥ २५ ॥ जागृत झाला मुरारी ॥ इच्छा केली अंतरीं ॥ सृष्टि निर्माण परोपरी ॥ निमिषार्धें करावी ॥ २६ ॥ मग उत्पन्न केला बाळ ॥ वेदमुख विधी सुढाळ ॥ तो शोधी

कमलनाळ ॥ सहस्त्रवर्षेंपर्यंत ॥ २७ ॥ मग स्तवन करीत विधी ॥ कृपाकरा पावें आधीं ॥ उपदेश करी दयानिधि ॥ हंसरूपें जगदात्मा ॥ २८ ॥ श्रीहरिआज्ञेंकरूनि जाण ॥ विधीनें विश्व केलें निर्माण ॥ वृक्ष आणिक पाषाण ॥ पशु-पक्ष्यादि मानव ॥ २९ ॥ तयांमाजी मानसकुमर ॥ वसिष्ठादि ऋषीश्वर ॥ माजीं अत्रि नामक मुनिवर ॥ त्याची भार्या अनसूया ॥ ३० ॥ महासाध्वी पतिव्रता ॥ जाणे पतीच्या मनोगता ॥ ऐसी ऐकोनियां वार्ता ॥ त्रिमूर्ति छलना पातले ॥ ३१ ॥ ब्रह्मा विष्णु गिरिजापती ॥ झाले भिक्षार्थी अतिथी ॥ अत्रिआश्रमा येऊनि निगुती ॥ भिक्षा मागती कापट्यें ॥ ३२ ॥ अनसूयेसीं करिती भाषण ॥ भिक्षा घालीं नग्न होऊन ॥ सती म्हणे कराया छलन ॥ आले देव वाटतें ॥ ३३ ॥ स्नान संध्या करावयास ॥ ऋषि गेले गंगातीरास ॥ पश्चात् प्रसंग अनसूयेस ॥ येणेंपरी पडिलासे ॥ ३४ ॥ पतीचे स्मरोनियां चरण ॥ बाळ अतिथी माझे जाण ॥ तयांचे संनिध होतां नग्न ॥ काय दोष मज असे ॥ ३५ ॥ ऐसें म्हणोनि आली सती ॥ भिक्षा द्यावयास निगुती ॥ पुढें देखोनियां अतिथी ॥ घाली भिक्षा आनंदें ॥ ३६ ॥ अतिथी ते बाळ झाले ॥ तिघे रुदन करूं लागले ॥ पालखां

आणोनि निजविले ॥ जो जो म्हणोनि हालवीत ॥ ३७ ॥ लक्ष्मी सावित्री गिरिजेसी ॥ नारदमुखें कळलें वृत्तासी ॥ परिसोनि आल्या आश्रमासी ॥ अत्रिऋषीच्या तेधवां ॥ ३८ ॥ त्यांहीं विनवूनियां सतीसी ॥ ओळखूनि घेतलें पतीसी ॥ प्रकट होऊनि साध्वीसी ॥ प्रसन्नवदनें बोलती ॥ ३९ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ म्हणती आम्ही तुझे कुमार ॥ एकरूपी होवोनि सत्वर ॥ मनोगत पूर्ण करूं ॥ ४० ॥ वर देऊनि त्रिमूर्ति ॥ पातले आपुल्या लोकांप्रती ॥ पुढें झाली गरोदर सती ॥ सुदिनीं पुत्र जाहला ॥ ४१ ॥ त्रिमूर्तीचा अवतारू ॥ तेणें केला जगदोद्धारू ॥ तोचि दत्तात्रेय योगेश्वरू ॥ परात्पर जगदात्मा ॥ ४२ ॥ कलियुगीं भक्तजनतारणार्थ ॥ श्रीपादरूपें प्रकटले समर्थ ॥ दासाचे पूर्ण वांछार्थ ॥ करूनि अवतार संपविला ॥ ४३ ॥ पुढें कांहीं दिवस गेले ॥ मागुती नरहरीरूप धरिलें ॥ काशिकापुरीं जावोनि राहिले ॥ कृष्णसरस्वती गुरु केला ॥ ४४ ॥ त्यापासोनि घेतला आश्रम ॥ नृसिंहसरस्वती पावले नाम ॥ भीमातीरीं करूनि आश्रम ॥ जगदोद्धार केलासे ॥ ४५ ॥ त्याचा सकळ विस्तार ॥ गुरुचरित्रामाजिं साचार ॥ सरस्वतीगंगाधरें परिकर ॥ इत्थंभूत केलासे ॥ ४६ ॥ तेंचि भाविकें

आणोनि ध्यानीं ॥ कथा परिसावी सिंहावलोकनीं ॥ श्रीगुरु जावोनि मल्लिकार्जुनीं ॥ कर्दळीवनीं गुप्त झाले ॥ ४७ ॥ तयास दिवस गत झाले ॥ कलियुग घोर वाढलें ॥ सद्धर्माचरण राहिलें ॥ नास्तिकवाद प्रवर्तला ॥ ४८ ॥ ऐसें जाणोनियां मुरारी ॥ धाता आणि त्रिपुरारी ॥ दिगंबराचार्यरूप धरी ॥ जगदोद्धार करावया ॥ ४९ ॥ परमहंस दीक्षाधारी ॥ स्वामिराज स्वेच्छाचारी ॥ भ्रमण करोनि एके अवसरीं ॥ मंगळवेढिया पातले ॥ ५० ॥ प्रकट झाले अकस्मात ॥ चरित्रें केलीं अत्यद्भुत ॥ श्रोते होवोनि सावधचित्त ॥ भक्तियोगें परिसावें ॥ ५१ ॥ इति श्री श्रीपादभूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखाराम करी वर्णन ॥ प्रथमाध्याय गोड हा ॥ ५२ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ ॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

॥ अध्याय २ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रोते परिसा सावधचित्त ॥ श्रीपादभूषण भक्तियुक्त ॥ दत्तात्रेय यति समर्थ ॥ मंगळवेढिया पातले ॥ १ ॥ दक्षिणदेशीं भीमातीर ॥ श्रीक्षेत्र नामें पंढरपुर ॥ तेथें

वसे रुक्मिणीवर ॥ जगदोद्धार करावया ॥ २ ॥ तेथोनि
तीन कोसांवर ॥ मंगळवेढें नामें नगर ॥ दामाजी तेथें
साचार ॥ भक्त पूर्वीं हरीचा ॥ ३ ॥ ऐसिये सुस्थळीं
अकस्मात ॥ श्रीमत्परमहंस श्रीदत्त ॥ दिगंबराचार्यरूपें
त्वरित ॥ प्रकट झाले तेधवां ॥ ४ ॥ तये नगरीं करूनि
वास ॥ नानापरी चरित्रें जनास ॥ दाखविलीं तींच सुरस ॥
भाविकीं सर्व परिसावीं ॥ ५ ॥ जगाचा करावा उद्धार ॥
हा मनीं हेतु धरूनि साचार ॥ दिगंबराचार्य करीत संचार ॥
सोलापुरीं पातले ॥ ६ ॥ तेथें श्रीदत्तमंदिर ॥ असे एक
मनोहर ॥ पल सोप्यांत यतिवर ॥ जाऊनि बैसले स्वस्थ
पैं ॥ ७ ॥ अस्तमान होतां जाण ॥ देवदर्शना येती जन ॥
नारीनर भाव धरून ॥ ग्रामवासी अखिल ते ॥ ८ ॥
कित्येक गृहस्थ संभावित ॥ भिक्षुक वैदिकही समस्त ॥
दर्शन घेवोनियां त्वरित ॥ गृहीं जाती आपुले ॥ ९ ॥
त्यांत चिंतो सखाराम ॥ टोळ तयांचें उपनाम ॥
पूर्वीं मामलतीचें काम ॥ केलें होतें इंग्लिशांचें ॥ १० ॥
सदय होवोनि धरणीपती ॥ वेतन दिधलें तयांप्रती ॥
निर्वाह करीत योग्य रीती ॥ सोलापुरीं राहूनि ॥ ११ ॥
त्यांनीं येवोनि देवळांत ॥ दर्शन घेतलें आनंदभरित ॥



श्रीस्वामीसमर्थ व श्रीकृष्ण ठाकुरदासबुवा

तों पैल बाजूचे सोप्यांत ॥ दिगंबराचार्य देखिले ॥ १२ ॥ आजानुबाहु दिगंबर ॥ प्रत्यक्ष भासले शंकर ॥ ऐसें रूप पाहोनि मनोहर ॥ चिंतोपंत वेधले ॥ १३ ॥ मानसीं ऐसें आणिलें ॥ हे सत्पुरुष असती भले ॥ आधीं जाऊनि पाउलें ॥ वंदन करावीं तयांचीं ॥ १४ ॥ ऐसें आणोनि मनांत ॥ धर्म-शाळेचे सोप्यांत ॥ त्वरें येवोनि चिंतोपंत ॥ यतिदर्शन घेतलें ॥ १५ ॥ पंतांसी पाहोनि सत्वर ॥ काय बोलती यतीश्वर ॥ सत्पुरुष असो वा इतर ॥ कारण काय तुजलागीं ॥ १६ ॥ ऐसी ऐकूनियां मात ॥ मानसीं आणिती चिंतोपंत ॥ हे मनकवडे असती सत्य ॥ म्हणोनि बोल जाणती ॥ १७ ॥ उपरी बोलती स्वामी ॥ सत्पुरुष वा मनकवडे आम्ही ॥ असो कांहीं जावें धामीं ॥ मार्ग आपुला लक्षुनी ॥ १८ ॥ आम्हांसवें काय काज ॥ नाहीं चाड तुझी आज ॥ ऐसें बोलती महाराज ॥ पंतांकारणें तेधवां ॥ १९ ॥ ऐसी परिसोनियां मात ॥ मनीं समजले चिंतोपंत ॥ सिद्धपुरुष हे सर्वज्ञात ॥ आहेत यती निर्धारें ॥ २० ॥ मग होऊनि शुद्धांतःकरणी ॥ पंतीं मस्तक ठेविलें चरणीं ॥ तारावें या पतितालागुनी ॥ म्हणोनि करुणा भाकीतसे ॥ २१ ॥ कृपा करोनियां स्वामी ॥ अगत्य येणें माझे धामीं ॥ हेतु असे

अंतर्यामीं ॥ पूर्ण कीजे दयाळा ॥ २२ ॥ पंतांचा तो पाहोनि भाव ॥ प्रसन्न झाले स्वामिराव ॥ शुद्ध जाणोनि तयाचा ठाव ॥ कांहीं दिवस राहिले ॥ २३ ॥ इकडे अक्कलकोटा-माजीं ॥ नृपमहाराज शहाजी ॥ भोंसले उपनामक गाजी ॥ सर्व जगतीं विख्यात जे ॥ २४ ॥ तयांनीं योजोनियां काम ॥ दिवाण चिंतो सखाराम ॥ संस्थानीं ह्या असावे परम ॥ म्हणोनि रात्र श्रम करी ॥ २५ ॥ इंग्लिश नृपाचा सरदार ॥ नेक नामदार गव्हर्नर ॥ मुंबापुरीमाजीं रहाणार ॥ तयासी विनंति कळविली ॥ २६ ॥ त्यालगत काम चाललें ॥ कलेक्टरासी पत्र आलें ॥ सोलापुरामाजीं वहिलें ॥ सारांश त्याचा परिसा हो ॥ २७ ॥ संस्थान अक्कलकोटांतुन ॥ चिंतोपंतासी मिळावें वेतन ॥ रौप्यमुद्रिका देणें तीन ॥ प्रतिदिनीं ही म्हणून नृपाज्ञा ॥ २८ ॥ नृपनियमाला अनुसरून ॥ करावें कार्याचें अवलोकन ॥ ऐसें पंतांसी कळवून ॥ जावयासी सांगीतलें ॥ २९ ॥ ऐसें इंग्रजांचें ऐकून वचन ॥ विचार करी पंत पूर्ण ॥ जातेसमयीं यति-दर्शन ॥ घेऊन जाणें पुढारी ॥ ३० ॥ सद्भावें जोडोनियां कर ॥ साष्टांगीं नमिले यतीश्वर ॥ म्हणे दयाळा आजि सत्वर ॥ अक्कलकोटीं चलावें ॥ ३१ ॥ ऐसें एकोनियां

उत्तर ॥ काय बोले यतीश्वर ॥ अक्कलकोटीं उष्ण फार ॥ म्हणऊनि येणें न घडेचि ॥ ३२ ॥ उष्ण झालिया शमन ॥ पुढती करूं तेथें आगमन ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ वंदिले चरण सद्भावें ॥ ३३ ॥ यतीची आज्ञा करूनि मान्य ॥ पंत क्रमिती पंथ गहन ॥ अक्कलकोटामाजीं येऊन ॥ राजसदनीं प्रवेशले ॥ ३४ ॥ तैं सत्राशें अठ्याहत्तर ॥ शके शालिवाहन निर्धार ॥ माघमास झालियावर ॥ पाहती संस्थान टोळ ते ॥ ३५ ॥ काळाची विपरीत गति ॥ रोगग्रस्त झाले भूपती ॥ शहाजी भोंसले दिनांतीं ॥ परत्र पावती निर्धारें ॥ ३६ ॥ झाला एकचि हाहाःकार ॥ शोक करिती नारीनर ॥ मालोजी नामें राजकुमर ॥ सिंहासनीं बैसला ॥ ३७ ॥ तैं शक सत्राशें एकुणऐशीं ॥ श्रावण शुक्ल पंचमीचे दिवशीं ॥ मालोजी नृप सौख्यराशी ॥ राज्य करी आनंदें ॥ ३८ ॥ दिवाणगिरीचें तें काम ॥ नृपाज्ञे चिंतो सखाराम ॥ पाहती तेव्हां सौख्यधाम ॥ सकल प्रजेसी भासलें ॥ ३९ ॥ प्रजा वागवीत न्यायरीति ॥ मालोजी झाला मेदिनीपती ॥ जगामाजीं ही कीर्ती ॥ वृद्धिंगत होतसे ॥ ४० ॥ पुढती कांहीं दिवस गेले ॥ सोलापुरीं प्रकट झाले ॥ स्वामिमहाराज सौख्यझेले ॥ एकाएकीं तेधवां ॥ ४१ ॥ ऐसें ऐकोनि

वर्तमान ॥ पंतांसी झालें समाधान ॥ म्हणे घेईन आजि दर्शन ॥ यतिरायाचें सद्भावें ॥ ४२ ॥ ऐसा करोनियां विचार ॥ त्यांहीं सोलापुरीं सत्वर ॥ येवोनि नमिले यतिवर ॥ अनन्यभावेंकरूनियां ॥ ४३ ॥ प्रार्थना करोनियां जाण ॥ अक्कलकोटीं करावें आगमन ॥ माझा आश्रम होईल पावन ॥ तेणेंकरूनि यतिवर्या ॥ ४४ ॥ ऐसें ऐकोनियां उत्तर ॥ पाहिलें पंतांचें शुद्धांतर ॥ तयांचे बोलण्यासी रुकार ॥ क्षण न लागतां दीधला ॥ ४५ ॥ संचारयोगेंकरूनि जाण ॥ करावें जगासी पावन ॥ ऐसा मानसीं हेतु धरून ॥ अक्कलकोटीं पातले ॥ ४६ ॥ तें शक सत्राशें एकुणऐशीं ॥ संवत्सर असतां सौख्यराशी ॥ स्वामी आले अक्कलकोटासी ॥ जगदोद्धार करावया ॥ ४७ ॥ पंचक्रोशांतील ग्रामीं ॥ स्वेच्छें संचार करिती स्वामी ॥ भक्त असती सकामनिष्कामी ॥ तयां तारिती कृपाळू ते ॥ ४८ ॥ तयांचा हेतु करूनि पूर्ण ॥ वाढविलें त्यांचें महिमान ॥ उद्धरिले पतित अज्ञान ॥ दर्शनमात्रेंकरूनियां ॥ ४९ ॥ सत्राशें एकुणऐशींपासून ॥ चरित्रें झालीं जीं जीं गहन ॥ तीं ब्याण्णवापर्यंत श्रवण ॥ श्रोतेजनीं करावीं ॥ ५० ॥ आणिक असती कथानक ॥ लेखा नसे तयांचा देख ॥

त्यांतूनि स्मरण देईल रमानायक ॥ तींचि चरित्रें लिहीतसें ॥ ५१ ॥ इतिश्री श्रीपादभूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखाराम करी वर्णन ॥ द्वितीयाध्याय गोड हा ॥ ५२ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीदत्तात्रेयाय नमः ॥

॥ अध्याय ३ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ भक्तजन तारावयासी ॥ अवतरले हृषीकेशी ॥ विरिंची आणि व्योमकेशी ॥ यतिरूपें जाण पां ॥ १ ॥ जयाची लीला गातां ॥ न बाधे संसार-वार्ता ॥ अंतीं लाधूनि पुरुषार्था ॥ इहपरत्र सौख्य पावती ॥ २ ॥ मंगळवेढियामाजीं समर्थ ॥ प्रकट झाले अकस्मात ॥ अरण्यामाजीं होती स्थित ॥ स्वइच्छेंकरूनि सर्वदा ॥ ३ ॥ एक दोन दिवसांनंतर ॥ स्वेच्छें करावें ग्रामांतर ॥ बिदोबिदीं करूनि संचार ॥ कालक्रमणा करावी ॥ ४ ॥ भक्षणार्थ आणिती कोणी ॥ पदार्थ फळें भाव धरूनी ॥ ग्रहण करणें त्यांचा क्षणीं ॥ नातरी त्याग करावा ॥ ५ ॥ दीक्षाधारी ऐसे यती ॥ मंगळवेढियाचे प्रांतीं ॥ द्वादश वरुषें राहिले निगुती ॥ स्वइच्छेंकरूनि यतिवर्य ॥ ६ ॥ तेथील नागरिक जन ॥

समर्थांसी म्हणती विक्षिप्त पूर्ण ॥ पुढें जहालें चरित्र गहन ॥ तेंचि भाविकीं परिसावें ॥ ७ ॥ शके सत्राशें सत्तावन ॥ संवत्सर मास श्रावण ॥ तेव्हां जहालें आगमन ॥ एकाएकीं यतींचें ॥ ८ ॥ कोठूनि आले ठिकाण नाहीं ॥ करिती प्रश्न कोणी पाहीं ॥ तयासी बोलणें कांहीं बाहीं ॥ तोंड वांकडें करिती पुढें ॥ ९ ॥ कित्येक दिवस अन्नग्रहण ॥ केलें याचा नाहीं ठिकाण ॥ काननांत अथवा ग्रामीं येऊन ॥ गलिच्छ स्थलीं रहावें ॥ १० ॥ ऐसें पाहूनि आचरण ॥ काय बोलती नागरिक जन ॥ सिद्धपुरुष आहेत जाण ॥ करितील पावन जगातें ॥ ११ ॥ तेथील एक तेली जाण ॥ बसाप्पा तयाचें अभिधान ॥ तो बाहेर ग्रामीं जाऊन ॥ येत होता स्वगृहीं ॥ १२ ॥ तो करीत असतां पथक्रमण ॥ अकस्मात वनीं झालें दर्शन ॥ यतिरायाचें करितों कथन ॥ तेंचि साग्र परिसावें ॥ १३ ॥ कंटकाची शय्या मानून ॥ स्वामिराजें केलें शयन ॥ हें करोनि अवलोकन ॥ सदय जाहला बसाप्पा ॥ १४ ॥ सद्भाव धरूनि मनांत ॥ केलें साष्टांग दंडवत ॥ कृपाघना आदिनाथ ॥ हा पतित उद्धरा ॥ १५ ॥ दैन्यें पीडिलें मजला जाण ॥ म्हणोनि करितों भिक्षाटण ॥ तेणें कुटुंबाचें उदरपोषण ॥ होत असे

समर्थां ॥ १६ ॥ आतां उबगलों संसारास ॥ आला सर्व-स्वाचा त्रास ॥ हा देह अर्पिला आपणांस ॥ सेवा करीन सद्भावें ॥ १७ ॥ ऐसें आणोनि मनांत ॥ समागमें राहिला सेवा करीत ॥ दारकलत्राचा त्याग निश्चित ॥ करूनि राहिला यतीसवें ॥ १८ ॥ जिकडे जाती यतिवर ॥ तिकडे तयानें करावा संचार ॥ यती बैसतां तेथें साचार ॥ जाऊनि शीघ्र बैसावें ॥ १९ ॥ रजनीमाजीं जाण ॥ जेथें स्वामी करितील शयन ॥ तये स्थानीं सौख्य मानून ॥ विश्रांति पावे बसाप्पा ॥ २० ॥ दहा संवत्सर येणेंपरी ॥ काल-क्रमण तेली करी ॥ इकडे त्याची कांता घरीं ॥ मोलमजुरी करीतसे ॥ २१ ॥ अन्य सेवा करूनि जाण ॥ मुलें लेंकुरें करीत जतन ॥ पतिचरण मनीं आणून ॥ सदाचारीं वर्ततसे ॥ २२ ॥ त्या दहा वर्षांमाजीं जाण ॥ ब्रह्मचर्य घडलें बसाप्पालागुन ॥ पुढें परिसा सावधान ॥ समर्थलीला सद्भावें ॥ २३ ॥ कोणे एके दिवशीं जाण ॥ बसाप्पाची सेवा पाहून ॥ स्वामीमहाराज झाले प्रसन्न ॥ तयाकारणें अवधारा ॥ २४ ॥ चार घटिका राहतां दिन ॥ महाराज करिती भ्रमण ॥ संगें बसाप्पा घेऊन ॥ वनामाजीं विच-रती ॥ २५ ॥ काटवण या नामेंकरून ॥ एक ग्राम असे

जाण ॥ तयाचें पाहती कानन ॥ अस्तमानपर्यंत ॥ २६ ॥ त्या वनीं अकस्मात ॥ सर्प निघाले अगणित ॥ महाराज मागें पाहती त्वरित ॥ तों येत असे बसाप्पा ॥ २७ ॥ तयासी अग्रभागीं आणून ॥ महाराज सांगती वर्तमान ॥ तुझी वांछा होईल पूर्ण ॥ तोंवरी यांतून घेईजे ॥ २८ ॥ ऐसें ऐकोनि वर्तमान ॥ बसाप्पा म्हणे आज्ञा प्रमाण ॥ फाटकें वस्त्र वरी टाकून ॥ एक सर्प धरिलासे ॥ २९ ॥ निर्भय होऊनि अंतरीं ॥ दीड हात लांब आपुले करीं ॥ सर्प वेष्टोनि वस्त्रांतरीं ॥ कक्षेमाजीं सूदला ॥ ३० ॥ दिगंबराचार्य नंतर ॥ मागुती ग्रामानिकट सत्वर ॥ आले तेथें बाग सुंदर ॥ पाहूनि हर्षें बैसले ॥ ३१ ॥ बसाप्पासी बोलावून ॥ आज्ञा करिती महाराज जाण ॥ तूं आपुले गृहीं जाऊन ॥ कलत्रदारीं रमावें ॥ ३२ ॥ वस्त्रांतरीं ठेविलें वेष्टून ॥ कक्षेमाजीं जें कां धन ॥ आहे तें देई नेऊन ॥ कांतेलागीं जाण पां ॥ ३३ ॥ आजिचे रजनीमाजीं निश्चित ॥ गृहीं राहें लोभभरित ॥ उदयीक होतां प्रभात ॥ मम निकट पैं यावें ॥ ३४ ॥ आज्ञा होतां ऐसी जाण ॥ मानसीं आनंदला पूर्ण ॥ वंदूनि समर्थांचे चरण ॥ पंथ क्रमण करीतसे ॥ ३५ ॥ चार पांच घटिका होतां रजनी ॥

बसाप्पा आला आपुले सदनीं ॥ सुशील असे तयाची गृहिणी ॥ पाहूनि पति आनंदे ॥ ३६ ॥ सन्निध येऊनि धरिला हस्त ॥ गृहामाजीं नेऊनि निश्चित ॥ कांतेनें केलें आदरातिथ्य ॥ बसावया पाट दीधला ॥ ३७ ॥ नंतर कक्षेंतील वसन ॥ काढूनि करीतसे अवलोकन ॥ तों तयाचें झालें सुवर्ण ॥ यतिमहिमान कळेना ॥ ३८ ॥ बावनकसी लगड झाली ॥ पहातां स्त्रीपुरुषें धालीं ॥ उत्तम भोजन सारूनि केली ॥ निद्रा तयांनीं आनंदें ॥ ३९ ॥ सुवर्णप्राप्तीचा वृत्तांत ॥ कांतेसी सांगितला निश्चित ॥ परिसोनि सौख्यें डुल्लत ॥ धन्य मानीत आपणातें ॥ ४० ॥ दुसरे दिवशीं होतां प्रभात ॥ स्त्रीपुरुषें निघालीं काननांत ॥ स्वामीराज पाहूनि दंडवत ॥ घातलासे सद्भावें ॥ ४१ ॥ अवधूत बोलिले तयासी ॥ धरिला होता हेतु मानसीं ॥ तो पूर्ण झाला जा गृहासी ॥ वनीं किंनिमित्त आलासी ॥ ४२ ॥ ऐसें ऐकोनि भाषण ॥ बसप्पा बोलिला नम्र होऊन ॥ नाशिवंत कामना केली पूर्ण ॥ आपुले कृपेंकरून समजलें- ॥ ४३ ॥ कृपाघना द्यावें मजला ॥ अविनाशवस्तु सौख्याभेला ॥ तेणें पावेन पैलथडीला ॥ क्षण एक न लागतां ॥ ४४ ॥ येहि सुनके बात ॥ यती कहे बसाप्पा सात ॥

अजतलग तेरा मनोरथ ॥ पुरन भया है नही ॥ ४५ ॥ उसका भोग भोगले ॥ सब विचार समजले ॥ क्या है सो फेर देखले ॥ अविनाश पद मिलेगा ॥ ४६ ॥ येणेंपरी तेलीयास ॥ सांगितला हितोपदेश ॥ लाविला प्रपंचकाजास ॥ यतिरायें जाण पां ॥ ४७ ॥ बसाप्पा वंदूनि चरण ॥ कांतेसह पावला सदन ॥ उदीम धंदा करून ॥ कालक्रमणा करीतसे ॥ ४८ ॥ प्रस्तुत तेली मंगळवेढ्यांतून ॥ येऊनि प्रतिवर्षी घेतसे दर्शन ॥ यतिरायाचें आणि विप्रभोजन ॥ यथाशक्ति घालीतसे ॥ ४९ ॥ शके सत्राशें सासष्ट संवत्सरीं ॥ प्रसाद लाधला वनांतरीं ॥ बसाप्पा तेलीयास निर्धारीं ॥ यतिरायाचा निश्चयें ॥ ५० ॥ त्या कथेची करूनि माळा ॥ घातली समर्थांचे गळां ॥ तेथील सुखाचा सोहळा ॥ भक्तजन जाणती ॥ ५१ ॥ इतिश्री श्रीपादभूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखारामकवि करीतसे वर्णन ॥ तृतीयाध्याय गोड हा ॥ ५२ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ४ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ तृतीयाध्यायीं जाण ॥

केलें बसाप्पाचें कथन ॥ आतां परिसा सावधान ॥ पुढती चरित्र स्वामींचें ॥ १ ॥ मंगळवेढ्याचा राहणार ॥ एक शूद्र जातीचा नर ॥ साठ वर्षांचें वय सुमार ॥ असे त्याचें जाण पां ॥ २ ॥ बावन वरुषांची त्याची कांता ॥ भाविक असे पतिव्रता ॥ संतान नसे म्हणोनि तत्त्वतां ॥ करी खेद मानसीं ॥ ३ ॥ कांहीं दिवस गेल्यावर ॥ बसाप्पाची भेट सत्वर ॥ झाली तिजला मनोहर ॥ कळवी वृत्त तयातें ॥ ४ ॥ पुत्र नाहीं माझे वंशीं ॥ म्हणोनि खेद वाटे मानसीं ॥ पंचावन वरुषें वयासी ॥ झालीं असती निश्चयें ॥ ५ ॥ त्यासी उपाय करावा कवण ॥ जेणें होती मनोरथ पूर्ण ॥ ऐसें ऐकोनियां भाषण ॥ बोले बसाप्पा तिजलागीं ॥ ६ ॥ या गांवचे अरण्यांत ॥ दिगंबराचार्य दयावंत ॥ पिशाच्च अवस्थेंत निश्चित ॥ निमग्न असती सर्वदा ॥ ७ ॥ स्वइच्छें करिती भ्रमण ॥ त्यांचें मीं घेतलें दर्शन ॥ तेणें दरिद्र झालें दहन ॥ सत्य वचन असे हें ॥ ८ ॥ तरी नियम धरीं आजिपासून ॥ अन्न न भक्षीं दर्शनाविण ॥ ऐसें घडतां कामना पूर्ण ॥ होतील जाण मानसीं ॥ ९ ॥ ऐसें ऐकोनियां उत्तर ॥ शूद्री आली गृहीं सत्वर ॥ भ्रतारासी सांगूनि समाचार ॥ अनुमोदन त्याचें घेतलें ॥ १० ॥ त्या दिवसा-

पासूनि नित्य ॥ ती बाई अरण्यांत ॥ जाऊनि करी दंडवत ॥ सद्भावयुक्त स्वामींतें ॥ ११ ॥ वनींहूनि आलि-यावरी ॥ भोजन सारीतसे घरीं ॥ ऐसा नियम निर्धारीं ॥ दोन संवत्सर चालिला ॥ १२ ॥ एके समयीं बाई ॥ काननीं पातली पाहीं ॥ वंदन समर्थांचे पायीं ॥ भक्तिभावें केलेंसे ॥ १३ ॥ सप्रेम पाहूनि अंतर ॥ प्रसन्न झाला दत्तावतार ॥ हास्य करूनि बोलती मधुर ॥ पैल वृक्ष पाहें तो ॥ १४ ॥ त्याचा डिंक काढोनि सत्वर ॥ त्यांत मिश्रण करीं साखर ॥ भक्षण करितां निर्धार ॥ पूर्ण हेतु होतील कीं ॥ १५ ॥ ऐसी आज्ञा करूनि मान्य ॥ करीत बाई अवलोकन ॥ वृक्ष सिरसाचा तयालागून ॥ डिंक शुभ्र आलासे ॥ १६ ॥ तो डिंक घेतला काढून ॥ माजी शर्करा केली मिश्रण ॥ यतिआज्ञा मानूनि प्रमाण ॥ करी भक्षण ती बाई ॥ १७ ॥ दयाघनाचे कृपेंकरून ॥ ते दिनीं जाहाली गर्भिण ॥ पूर्ण मास होतां सुलक्षण ॥ पुत्र जाहला तिजलागीं ॥ १८ ॥ यतिमहिमा अगणित ॥ त्याचें कोण करील गणित ॥ स्वयें महाराज अनंत ॥ लीला अनंत जयाची ॥ १९ ॥ आणिक नवल झालें जाण ॥ तें परिसावें सावधान ॥ बाबाजी भट्ट या नामेंकरून ॥ वैदिक ब्राह्मण

सत्वस्थ ॥ २० ॥ तो मंगळवेढियांत ॥ कुटुंबासहित वास्त करीत ॥ त्याचे सदनीं यती समर्थ ॥ येऊनि बैसती स्वच्छंदें ॥ २१ ॥ मास-पक्षांनीं यती ॥ बाबाजीचे गृहीं निश्चिती ॥ दोन घटिका घेऊनि विश्रांती ॥ निघोनि जाती लवलाहें ॥ २२ ॥ ऐसें असतां एके दिवशीं ॥ तृतीय प्रहरीं सौख्यराशी ॥ भ्रमण करीत स्वइच्छेसीं ॥ विप्रगेहीं पातले ॥ २३ ॥ तों नाहीं गृहामाजी ॥ भूदेव सात्विक बाबाजी ॥ त्याची स्त्री वंदूनि पूजी ॥ चरण यतिराजांचे ॥ २४ ॥ महाराज म्हणती तिजलागून ॥ उदक देईं मज आणून ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ काय बोले पतिव्रता ॥ २५ ॥ द्यावयासारिखें उदक नाहीं ॥ यास्तव जाऊनि आणितें पाहीं ॥ ऐसें म्हणोनि लवलाहीं ॥ निघे बाहेर जावया ॥ २६ ॥ हें पाहूनि सौख्यमूर्ति ॥ काय बोलिले तिजप्रती ॥ गृहीं उदक असतां निश्चिती ॥ जासी बाहेरी कासया ॥ २७ ॥ परिसूनि विनंती करी सती ॥ गृहांत कूप आहे निगुती ॥ उष्णकाळीं ऱ्हास निश्चिती ॥ होत असे उदकाचा ॥ २८ ॥ यास्तव बाहेर जाऊन ॥ निर्वाह करीतसें उदक आणून ॥ ऐसें भाषण ऐकून ॥ काय समर्थ बोलती ॥ २९ ॥ कूपांतरीं उदक बहुत ॥ आहे

दाखवितों चाल निश्चित ॥ ऐसें बोलूनि अवधूत ॥ परसामाजीं पातले ॥ ३० ॥ कूपाचे संनिध देखा ॥ यतीनें केली लघुशंका ॥ साध्वीसी बोलिले वचन ऐका ॥ काय तेंचि अवधारा ॥ ३१ ॥ घडा डारो कुवे बीच ॥ बाहेर निकलेगा पानी साच ॥ ऐसी आज्ञा होतांच ॥ कुंभ आणी ती सती ॥ ३२ ॥ रज्जु कुंभासी बांधोनि त्वरित ॥ सोडिला कूपांत उदकार्थ ॥ अवलोकितां उदक बहुत ॥ दिसतें झालें सतीतें ॥ ३३ ॥ इतुक्यांत भट्ट बाबाजी ॥ पातला तेव्हां गृहामाजी ॥ प्रकार कळतांचि नावाजी ॥ आश्चर्ययुक्त तेधवां ॥ ३४ ॥ करूनि साष्टांग वंदन ॥ म्हणे स्वामिया दयाघन ॥ प्रत्यक्ष मूर्ति नारायण ॥ मजलागीं भासतसे ॥ ३५ ॥ उद्धरावया जगासी ॥ त्रिमूर्ति अवतरले महीसी ॥ यतिरूपें निश्चयेंसीं ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ ३६ ॥ मजवरी कृपा केली गहन ॥ कूपासी आणिलें उदक पूर्ण ॥ ऐसें आपुलें महिमान ॥ न कळे कवणा समर्था ॥ ३७ ॥ ऐसें ऐकोनि यती ॥ शीघ्र गेले वनाप्रती ॥ उदक त्यागिलें निश्चिती ॥ ऐसे स्वच्छंदी दत्तात्रेय ॥ ३८ ॥ ते बाबाजी भट्ट पंढरपुरीं ॥ प्रस्तुत वसती निर्धारीं ॥ ऐसी यतीची थोरी ॥

साच भाविकें पहावी ॥ ३९ ॥ इतिश्री श्रीपादभूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखारामकवि करी वर्णन ॥ चतुर्थाध्याय गोड हा ॥ ४० ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ मागिले अध्यायीं कथन ॥ बाबाजी भट्टांचें आख्यान ॥ दिगंबरकृपें केलें लेखन ॥ तेंचि भाविकीं ऐकिलें ॥ १ ॥ आतां परिसा साचार ॥ मंगळवेढ्याचा राहणार ॥ तो यातीचा तंतुकार ॥ दरिद्रें करुनि पीडलासे ॥ २ ॥ सद्भाव धरूनि जाण ॥ करीतसे स्वामींचें सेवन ॥ ग्रामांत करूनि भिक्षाटन ॥ उदरनिर्वाह करीतसे ॥ ३ ॥ तेणें एकनिष्ठपणें सेवन ॥ तीन मास केलें पूर्ण ॥ मनीं द्रवले कृपाघन ॥ दत्तात्रेय जगदात्मा ॥ ४ ॥ एके दिवशीं यतिवर ॥ रजनींत निद्रिस्थ झालियावर ॥ सन्निध तंतुकारही सत्वर ॥ निद्रागत जाहला ॥ ५ ॥ ऐसें असतां दृष्टांत ॥ जाहला त्यातें अकस्मात ॥ प्रत्यक्ष स्वामी येऊनि बोलत ॥ तंतुकारा अवधारीं ॥ ६ ॥ सदय होऊनि सौख्यराशी ॥ काय बोलिले कोष्टियासी ॥ तुझा बाप

व्यापारी परियेसीं ॥ पूर्वीं होता निश्चयें ॥ ७ ॥ तो क्षेत्र पंढरपुरास ॥ गेला होता यात्रेस ॥ तेथें कृतांतें घालूनि पाश ॥ निजपुरा नेलें त्या ॥ ८ ॥ तुझी माता अगोदर ॥ मरण पावली साचार ॥ तुझे जनकें द्रव्य अपार ॥ मागल्या द्वारीं ठेविलें ॥ ९ ॥ तेथें एक तुळसीवृंदावन ॥ माजी गुप्त असे धन ॥ तें घेईं तूं काढून ॥ तेणें सौख्य पावसी ॥ १० ॥ ऐसा पाहूनि चमत्कार ॥ जागृत जाहला तंतुकार ॥ सुषुप्तींतील प्रकार ॥ यतिराया कथियेला ॥ ११ ॥ आज्ञा करून मान्य ॥ सदनीं येऊनि केलें खनन ॥ वृंदावनाचे माजीं धन ॥ लाधलें पूर्ण तयासी ॥ १२ ॥ यतिकृपेंकरूनि जाण ॥ गृहीं प्रपंच करी अनुदिन ॥ प्रस्तुत मोहळगांवीं राहून ॥ कालक्षेप करीतसे ॥ १३ ॥ ऐसे दिगंबराचार्य ॥ करिती भक्तांचें कार्य ॥ जे अखिलामाजीं आर्य ॥ सौख्यपरें जगद्गुरु ॥ १४ ॥ परोपकार करावयासी ॥ योगीराज प्रकटले मेदिनीसी ॥ पुढें कथा झाली कैसी ॥ तेंचि भाविकीं परिसिजे ॥ १५ ॥ मंगळवेढियांत यतिवर ॥ असतां घडला चमत्कार ॥ ग्रामानिकट पर्वतशिखर ॥ असे एक जाण पां ॥ १६ ॥ तेथें असे स्थळ निवांत ॥ वृक्षच्छाया सौख्यभरित ॥ एके समयीं यती समर्थ ॥ सरितातटाकीं बैसले ॥ १७ ॥

ऐसी विश्रांति घेतां देख ॥ पातले दोन सत्पुरुष ॥ पैल-
तीराहूनि निश्चित ॥ पाहूनि चित्तीं आनंदले ॥ १८ ॥
समर्थें पाहूनियां जाण ॥ तयांचें घेतलें दर्शन ॥ त्रिवर्ग
मिळूनि करिती गमन ॥ पर्वतशिखरीं जाण पां ॥ १९ ॥
परस्परांचें झालें भाषण ॥ त्याची कवणा न कळे खूण ॥
एक म्हणती करिती रुदन ॥ हांका मारितो द्वितीय म्हणे
॥ २० ॥ ऐसेच रीती तृतीय म्हणती ॥ सत्पुरुष गेले
आपुले पंथीं ॥ स्वामिराज आले ग्रामाप्रती ॥ सुखानंदें
जाण पां ॥ २१ ॥ शके सतराशें एकुणसाठांत ॥ स्वामी-
महाराज निघाले त्वरित ॥ श्रीक्षेत्र पंढरपुरीं अकस्मात ॥
क्वचित्काल राहिले ॥ २२ ॥ पर्जन्य पडला फार ॥
भीमेसी आला महापूर ॥ ऐसें असतां पैलपार ॥ व्हावें
इच्छिती श्रीयती ॥ २३ ॥ दक्षिणतीरासी आले सत्वर ॥
स्वेच्छाचारी यतिवर ॥ भीमेसी आला महापूर ॥ नौका
बंद राहिल्या ॥ २४ ॥ पैल तटाकीं जात्रया नौका ॥ कांहीं
विलंब असे देखा ॥ केलें कौतुक साग्र ऐका ॥ स्वस्थ
चित्तंकरूनि ॥ २५ ॥ नौकेपासूनि अंतरावर ॥ शीघ्र गेले
यतिवर ॥ सरितेमाजीं फेंकूनि प्रस्तर ॥ दिधला तेव्हां
सदयानें ॥ २६ ॥ चरणसंपुष्टासहित ॥ उदकावरूनि पंथ

क्रमीत ॥ पैलतीरा पावले समर्थ ॥ क्षण एक न लागतां ॥ २७ ॥ पायांतील जोड्याचा तळ ॥ भिजला नाहीं अळुमाळ ॥ चमत्कार पाहती सकळ ॥ उभयतीरवासी ते ॥ २८ ॥ सद्गुरु कृपेचें माहेर ॥ भक्तासी दाविती चमत्कार ॥ श्रवणपठनें संहार ॥ होय कलिमल दोषांचा ॥ २९ ॥ अक्कलकोटीं चिंतोपंतांचें ॥ बिऱ्हाड गणपतराव जोशांचे ॥ सदनीं सोप्यांत असे साचें ॥ वसती तेथें सर्वदा ॥ ३० ॥ चिंतोपंतांचे भक्तीस्तव ॥ सदनीं राहिले स्वामीराव ॥ पुढें जाहला तो नवलाव ॥ सांग भाविकें परिसावा ॥ ३१ ॥ स्वामीचरणीं तुळसीदळ ॥ वाहणें कोटिसंख्या निश्चळ ॥ चिंतोपंतें भाव निर्मळ ॥ येणेंपरी धरिलासे ॥ ३२ ॥ स्वामीसी बैसवूनि पाटावर ॥ पूजन करीत षोडशोपचार ॥ सहस्रनामेंकरूनि साचार ॥ तुळसी वाहात नियमानें ॥ ३३ ॥ एके दिवशीं स्वामी ॥ करीत होते भ्रमण ग्रामीं ॥ चिंतोपंत आपुले धामीं ॥ पूजा करूनि बैसले ॥ ३४ ॥ मार्गप्रतीक्षा करिती फार ॥ कोठें गेले यतीश्वर ॥ हातीं पंचपात्र घेऊनि सत्वर ॥ सोंवळ्यांतुनी शोधिती ॥ ३५ ॥ तुळसीअर्पणासी उशीर ॥ जाहला म्हणोनि सखेद अंतर ॥ म्हणती दयाळा धांवें

सत्वर ॥ दर्शन द्यावें मजलागीं ॥ ३६ ॥ पंत भ्रमण करिती फार ॥ तों नवे विहिरीचे कट्टयावर ॥ बैसले पाहोनि दिगंबर ॥ भावें वंदन मग केलें ॥ ३७ ॥ चलावें तुळसीग्रहणार्थ ॥ माझे पुरवावे मनोरथ ॥ विनंति ऐकूनि समर्थ ॥ पंतगृहीं पातले ॥ ३८ ॥ नित्यक्रम यापरी ॥ पाटावर बैसोनि नरहरी ॥ पूजन घेती सर्वोपचारीं ॥ ते दिनीं उभे ठाकले ॥ ३९ ॥ पंतांसी बोलती वचन ॥ तुळसी कराव्या अर्पण ॥ ऐसें ऐकूनि करीत मान्य ॥ वाहे पंत तुळसीतें ॥ ४० ॥ दुसरे दिवशीं प्रातःकाळीं ॥ तुळसी वाहण्याचे वेळीं ॥ स्वेच्छेंकरूनि चंद्रमौळी ॥ बैसले असतां आनंदें ॥ ४१ ॥ शेख नूरुद्दिनाचे दर्ग्यांत ॥ बैसले असती अकस्मात ॥ गणपतराव जोशी शोधार्थ ॥ लगबगीनें पातले ॥ ४२ ॥ विनंती करितां पायांसी ॥ तों दत्तात्रेय वदती त्यांसी ॥ पंतांस तुळसी वाहावयासी ॥ काय योजना केलीसे ॥ ४३ ॥ पाटावरी मीं आपुले चरण ॥ केले असती कीं स्थापन ॥ त्यांचें करावें पूजन ॥ नसे कारण यावया ॥ ४४ ॥ ऐसें बोलूनि साचार ॥ गालिप्रदान करिती फार ॥ भावें वंदूनि यतिवर ॥ जोशी गृहीं पातले ॥ ४५ ॥ पूजेचा पाट पाहती समस्त ॥ तों त्यावरी पादुका चिन्हांकित ॥

पंतांसी कळतांचि वृत्तांत ॥ हर्षभरित जाहले ॥ ४६ ॥ नित्यक्रमापरी जाण ॥ त्या पादुकांचें करिती पूजन ॥ उपरी तुळसीसमर्पण ॥ भावयुक्त आचरती ॥ ४७ ॥ त्या पादुका प्रस्तुत ॥ अक्कलकोटीं आहेत निश्चित ॥ गणपतराव जोश्यांचे निकट ॥ देवालयीं स्थित हो ॥ ४८ ॥ आगम-निगम स्तविती जयासी ॥ ते भक्तकैवारी सौख्यराशी ॥ दिगंबराचार्य जगासी ॥ लीला दाविती बहुविध ॥ ४९ ॥ इतिश्री श्रीपादभूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखारामकवि करीतसे वर्णन ॥ पंचमाध्याय गोड हा ॥५०॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

॥ अध्याय ६ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ पंचामाध्यायीं जाण ॥ पाटावरी पादुका स्थापन ॥ झाल्या पंतें केलें पूजन ॥ तेंचि कथन निरोपिलें ॥ १ ॥ अक्कलकोटामाजीं जाण ॥ बाळाजी बापुजी ब्राह्मण ॥ राहातसे लक्ष्मीवान ॥ प्रस्तुत इंदुरामाजीं असे ॥ २ ॥ त्यासी नाहीं पुत्र सुगुण ॥ या-कारणें दुःखित मन ॥ हें पूर्वकर्म त्याचें गहन ॥ उपाय

कांहीं चालेना ॥ ३ ॥ नाग-नारायणबली केला जाऊन ॥ त्याची कांता झाली गर्भिण ॥ प्रसवे पुत्र सगुण ॥ पूर्ण दिन होतांची ॥ ४ ॥ समारंभ करूनि बहुत ॥ गांवांत शर्करा वांटीत ॥ नानाविध वाद्यें वाजवीत ॥ बरोबरीं जातसे ॥ ५ ॥ ऐसा चाले मंगल गजर ॥ पावला जोशी-बोवाचें घर ॥ तेथें बैसले ओट्यावर ॥ दिगंबराचार्य आनंदें ॥ ६ ॥ त्यांसी करूनि नमस्कार ॥ पुढें ठेविली साखर ॥ नंतर गृहांत जाऊनि सत्वर ॥ लहानथोरां देतसे ॥ ७ ॥ मागें बोलिले यतिवर ॥ कासया खर्च करितो नर ॥ शंखवाद्याची मुद्रा साचार ॥ लीलेंकरूनि दाविली ॥ ८ ॥ ऐसा होतांच प्रकार ॥ काय झाला चमत्कार ॥ बाळाजीचा पुत्र यमनगर ॥ अवलोकिता जाहला ॥ ९ ॥ अंतरसाक्ष दिगंबर ॥ भक्तकैवारी दत्तावतार ॥ त्याचें यश गाऊनि निरंतर ॥ सखाराम धाला बहु ॥ १० ॥ चिंतोपंतांचा नंदन ॥ दाजीबा तयाचें अभिधान ॥ तो कुटुंबासहित जाण ॥ सोलापुरीं राहातसे ॥ ११ ॥ अक्कलकोटीं चिंतोपंत ॥ भार्येसहित विचार करीत ॥ दाजीबाच्या पुत्राचें सुख-भरित ॥ उपनयन करावें ॥ १२ ॥ तों झाला चमत्कार ॥ बैसले होते ओसरीवर ॥ महाराज तेव्हां सौख्यअंतर ॥

काय वचन बोलिले ॥ १३ ॥ आगे करो पिंडदान ॥ फेर करना च्याहे सो मन ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ पंत दुश्चित अंतरीं ॥ १४ ॥ दरबारीं जाऊनियां काम ॥ त्वरें चिंतो सखाराम ॥ करूनियां पावले धाम ॥ यतिपद वंदूं लागले ॥ १५ ॥ पंत देखके समर्थ ॥ कहने लगे दूरसे बात ॥ करो अब छीना मत ॥ व्हासे आकर हमसे तूं ॥ १६ ॥ ऐसी एकोनियां मात ॥ दुःखित मानसीं पंत ॥ गृहीं येतां अकस्मात ॥ नवल तोंचि जाहालें ॥ १७ ॥ सोलापुराहूनि आलें लेखन ॥ कीं दाजीपत्नी पावली मरण ॥ ऐसें ऐकोनि वर्तमान ॥ यतिस्मरण करिती हो ॥ १८ ॥ आणिक एक परिसा व्रत ॥ विश्वासराव माने रोगग्रस्त ॥ रहिमतपुरामाजीं वास ॥ नित्य असे जाण तयाचा ॥ १९ ॥ ऐशा संकटांत जाण ॥ त्यासी वाटलें यतिदर्शन ॥ व्हावें मजला न लागतां क्षण ॥ म्हणोनि छंद घेतलासे ॥ २० ॥ यानीं बैसोनि त्वरित ॥ माने आले सेवकांसहित ॥ अक्कलकोटीं पातले तों समर्थ ॥ नव्हते तेथें जाण पां ॥ २१ ॥ सिरवळ वागदरीचे लगत ॥ होते महाराज भ्रमण करीत ॥ सन्निध असल्या जनासी बोलत ॥ काय वचन अवधारा ॥ २२ ॥ गालिप्रदानें देऊनि बहुत ॥ म्हणती कासया आलां व्यर्थ ॥ अक्कलकोटीं गेलें पाहिजे त्वरित ॥ ऐसें समर्थ

बोलिले ॥ २३ ॥ दुसरे दिवशीं यतिवर ॥ प्रज्ञापुरीं पातले सत्वर ॥ गणपतीचें पाहूनि मंदिर ॥ राहिले माने तेथें हो ॥ २४ ॥ ते स्थळीं जावोनि अकस्मात ॥ उभे ठाकले समर्थ ॥ तों माने ज्वरेंकरूनि त्रस्त ॥ झाले शुद्धि नसे तयां ॥ २५ ॥ ऐसी अवस्था पाहातां जाण ॥ कृपेनें द्रवले नारायण ॥ तीन वेळ पद फिरवून ॥ बैसती जाऊन स्वच्छंदें ॥ २६ ॥ देवालयाचे मागें देख ॥ विश्रांती घेती यतिनायक ॥ दोन घटिका जातां कौतुक ॥ वर्तलें तेंचि अवधारा ॥ २७ ॥ आराम पडिला मानेयांस ॥ जाहला ज्वराचा नाश ॥ सावध होऊनि यतिरायांस ॥ वंदन केलें सद्भावें ॥ २८ ॥ उभे राहिले जोडोनि हात ॥ नंतर महाराज त्यांसीं बोलत ॥ गृहीं जाऊन त्वरित ॥ निजकर्म सांग संपादीं ॥ २९ ॥ आज्ञा होतांचि ऐसी ॥ उल्हास झाला मानेयांसी ॥ वंदोनियां चरणकमलासी ॥ निजगृहीं ते गेले ॥ ३० ॥ ऐसा चमत्कार जाण ॥ प्रत्यक्ष करिती नारायण ॥ तयाचे गुणांचें गायन ॥ बंदीजन होऊनि करीतसे ॥ ३१ ॥ इतिश्री श्रीपादभूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखारामकवि करीतसे लेखन ॥ षष्ठाध्याय गोड हा ॥ ३२ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः॥

॥ अध्याय ७ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ षष्ठाध्यायीं निरूपण ॥ विश्वासरावाचें आख्यान ॥ झालें पुढें परिसा सावधान ॥ चरित्रें पावन यतीचीं ॥ १ ॥ भावें रामचंद्र भास्कर ॥ अक्कलकोटींचा राहाणार ॥ त्यासी संतती नाहीं साचार ॥ म्हणोनि अंतरीं खिन्न असे ॥ २ ॥ विचार करूनि मानसांत ॥ गणेशमंदिरीं अनुष्ठान करीत ॥ त्यासी दिवस झाले बहुत ॥ नवल तोंचि जाहलें ॥ ३ ॥ एके समयीं ती बाई ॥ यति-दर्शना आली पाहीं ॥ महाराज म्हणती लवलाहीं ॥ अनुष्ठान पुढती न करावें ॥ ४ ॥ आज रात्रौ पोटभर ॥ घेई इतुकें वदती अक्षर ॥ ऐसें ऐकतां उत्तर ॥ पालवीं ग्रंथिका बांधिली ॥ ५ ॥ वंदन करूनि सत्वरी ॥ साध्वी पावे आपुले घरीं ॥ तेंचि रजनीमाझारीं ॥ गर्भ राहिला तिजलागीं ॥ ६ ॥ पूर्ण होतांचि दिवस ॥ पुत्र प्रसवली सुरस ॥ सद्भावें भजती यतिरायास ॥ स्त्रीपुरुषें ज़ाण पां ॥ ७ ॥ एक प्रसिद्ध साहुकार ॥ गणपतभाई बऱ्हाणपुरकर ॥ पुण्यामाजीं राहूनि साचार ॥ व्यवहार संपादी ॥ ८ ॥ तयास संतती होतसे जाण ॥ परि दहा दिवसांत पावे मरण ॥

ऐसें पाहूनि प्रारब्ध हीन ॥ अक्कलकोटीं पातले ॥ ९ ॥ स्त्रीपुरुषें येऊनि जाण ॥ सद्भावें घेती यतिदर्शन ॥ निकट बैसती स्थिर होऊन ॥ नवल तोंचि जाहलें ॥ १० ॥ मनोमय जाणूनि सकळ ॥ यतीनें घेऊनि नारळ ॥ तिचे ओटींत तात्काळ ॥ एकसरें घातला ॥ ११ ॥ आज्ञा घेऊनि सत्वरीं ॥ पुण्यासी आले लौकरी ॥ नंतर एक वर्षांतरीं ॥ पुत्र एक जाहला ॥ १२ ॥ तो दीड वर्षांचा झालियावर ॥ त्यासहित सावुकार ॥ अक्कलकोटीं येऊनि सत्वर ॥ यतिदर्शन घेतलें ॥ १३ ॥ मानसीं जो कां नवस केला ॥ तो पाहिजे पूर्ण झाला ॥ पन्नास रौप्यमुद्रिकांला ॥ करूं व्यय म्हणतसे ॥ १४ ॥ तयाच्या पादुका करून ॥ चोळाप्पाचे गृहीं स्थापन ॥ कराव्या सत्वर म्हणोन ॥ यतिराज वदती तें ॥ १५ ॥ आज्ञा करूनि मान्य ॥ पादुका आणिल्या करवून ॥ चोळाप्पाशीं दिधल्या नेऊन ॥ नंतर गृहीं तो गेला ॥ १६ ॥ पुरुषोत्तम जयराम सुमंत ॥ अक्कलकोटीं राहणार निश्चित ॥ त्याचे कनिष्ठ पुत्रास निशींत ॥ दिसेनासें जाहलें ॥ १७ ॥ औषध उपाय केले बहुत ॥ परी नाहीं गुण किंचित ॥ तो मुलगा एके दिवशीं अवचित ॥ यतिसन्निध बैसला ॥ १८ ॥ स्वामींचे करींची

मालिका ॥ दूर पडली होती देखा ॥ ऐसें पाहोनि त्या बालका ॥ म्हणती माळ आण तूं ॥ १९ ॥ आज्ञा परिसोनि बाळ ॥ चाचपोनि पाहे ती माळ ॥ हें पाहोनि दयाळ ॥ गालिप्रदान ओपिती ॥ २० ॥ त्यानें चरण वंदून ॥ सांगितलें सकल वर्तमान ॥ परी म्हणती दयाघन ॥ ऐक वचन बालका ॥ २१ ॥ काळीं मिरीं दुधांत ॥ उगाळूनि घालीं नेत्रांत ॥ तेणें होईल रोग शांत ॥ ऐसें यतिवर बोलिले ॥ २२ ॥ आज्ञेप्रमाणें करितां जाण ॥ पूर्ववत् झाले त्याचे नयन ॥ प्रत्यक्ष पाहती सकळ जन ॥ यतिमहिमान कळेना ॥ २३ ॥ अक्कलकोटींच्या राजवाड्यांत ॥ देवघराच्या सन्निध समर्थ ॥ झोपाळ्यावरी बैसोनि निश्चित ॥ झोंके घेत आनंदें ॥ २४ ॥ देवगृहांत उगाळीत चंदन ॥ अप्पा सलबत्या ब्राह्मण ॥ बैसला होता तेव्हां जाण ॥ नवल एक वर्तलें ॥ २५ ॥ एक मूषक येऊन ॥ फुलवाती करीतसे भक्षण ॥ ऐसें पाहूनि कोपायमान ॥ अप्पा सलबत्या जाहला ॥२६॥ हातीं खोड घेऊनि सत्वर ॥ उंदिरासी केला प्रहार ॥ तेणें निर्जीव होऊनि कलेवर ॥ धरणीवरी पडिलासे ॥ २७ ॥ मूषक टाकावया बाहेर ॥ सलबत्या चालिला सत्वर ॥ ऐसें पाहूनि यतिवर ॥ आखुकलेवर मागती ॥ २८ ॥

आज्ञा करूनि मान्य ॥ मूषकप्रेत दिधलें आणोन ॥ तें स्वामिरायें मस्तकीं घेवोन ॥ काय कौतुक केलें हो ॥ २९ ॥ झोपाळ्याच्या कड्यांतून ॥ मृत मूषकासी काढिलें ओढून ॥ तीनचार वेळां घालून ॥ पुनरपि ओढून काढिला ॥ ३० ॥ मग घेवोनि हातीं ॥ संबोखिती तयाप्रती ॥ तों सजीव होऊनि अवचितीं ॥ पळूनि गेला तेधवां ॥ ३१ ॥ ऐसे यतीचे सद्गुण ॥ भावें करितां श्रवण पठण ॥ त्याचें वांछित होईल पूर्ण ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ ३२ ॥ पुढें परिसा प्रेमयुक्त ॥ अक्कलकोटीं समर्थ ॥ मालोजी राजे नृपअंगणांत ॥ भ्रमण करिती स्वच्छंदें ॥ ३३ ॥ हुजऱ्याचे करीं चौफुला ॥ सुवर्णाचा होता भला ॥ तो स्वामिरायें अवलोकिला ॥ हिरूनि घेतला तात्काळ ॥ ३४ ॥ तेथेंचि एक अंगणांत ॥ विहीर होती खोल बहुत ॥ चौफुला टाकूं ऐसें म्हणत ॥ यतिराज नृपातें ॥ ३५ ॥ राव बोले उपरी वचन ॥ चौफुला आपुला आहे जाण ॥ इच्छेसी येईल तैसें पालन ॥ त्याग त्याचा करावा ॥ ३६ ॥ ऐसी ऐकतांचि मात ॥ चौफुल्याचा त्याग करीत ॥ विहिरीमाजीं अकस्मात ॥ तटस्थ पाहती सकळिक ॥ ३७ ॥ दुसरे दिवशीं प्रभात ॥ होतां त्याच अंगणांत ॥ महाराज भ्रमती नृपासहित ॥ सहज लीलें-

करूनियां ॥ ३८ ॥ पोहरा आणावा त्वरित ॥ म्हणोनि नृपासी आज्ञा करीत ॥ वचन ऐकूनि मेदिनीनाथ ॥ रज्जुपात्र आणविलें ॥ ३९ ॥ विहिरींत सोडूनि सत्वर ॥ पोहरा पाहती येतां वर ॥ माजी चौफुला ये मावार ॥ जलविरहित अवलोकिला ॥ ४० ॥ त्यांतील वेललवंगा साचार ॥ जल-विरहित निर्लेप फार ॥ समर्थे ऐसा चमत्कार ॥ नृपालागीं दाखविला ॥ ४१ ॥ इतिश्री श्रीपादभूषण ॥ दिगंबरा-चार्यांचे सद्गुण ॥ सखारामकवि करीतसे वर्णन ॥ सप्तमा-ध्याय गोड हा ॥ ४२ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ सप्तमाध्यायीं साचार ॥ नृपासी दाखविला चमत्कार ॥ सुवर्ण-चौफुला विहिरी-बाहेर ॥ जलविरहित काढिला ॥ १ ॥ पुढें परिसा चरित्र ॥ ऐकतां पावन होती श्रोत्र ॥ तनु होय रोमांचित ॥ भावबळेंकरूनियां ॥ २ ॥ शेख नूरुद्दिन नामें यवन ॥ अक्कलकोटीं राहातसे जाण ॥ तयाचें माळानजीक स्थान ॥ असे तेथें एकदां ॥ ३ ॥ थिल्लरोदकाचे तीरीं ॥ बसले होते

स्वेच्छाचारी ॥ दिगंबराचार्य अवतारी ॥ कोणे एके सम-
यासी ॥ ४ ॥ तेव्हां सन्निध मंडळी बहुत ॥ बैसली होती
जाणा निश्चित ॥ त्यामाजीं ठाकुरदाससुत ॥ श्रीकृष्णबावा
तें होते ॥ ५ ॥ इतुक्यांत एक बाई ॥ यति नमाया आली
पाहीं ॥ उत्तमान्नें ताटीं कांहीं ॥ घेऊनि येत सद्भावें ॥ ६ ॥
त्या अन्नाचे ताटांत ॥ दोन वाट्या असती निश्चित ॥ दूध
तूप घालून आणीत ॥ यतिरायांकारणें ॥ ७ ॥ ताट सन्निध
ठेवूनि जाण ॥ उभी राहिली विनंति करून ॥ यतिरायें तें
घेऊन ॥ सरोवरीं टाकिलें ॥ ८ ॥ तेथें असे पुरुष एक ॥
सखोल सराचें उदक ॥ माजी ताट बुडालें देख ॥
यतिरायें लवलाहें ॥ ९ ॥ ताटामाजील अन्न ॥ भक्षणार्थ
मिळाले संपूर्ण ॥ लहान थोर अवघे मीन ॥ क्षण एक न
लागतां ॥ १० ॥ हें पाहोनि निश्चिती ॥ संतुष्ट झाले
श्रीयती ॥ बाईसी म्हणती झाली तृप्ती ॥ नैवेद्य आम्हां
पावला ॥ ११ ॥ तूं आपुलें घेऊनि ताट ॥ धरीं सुखें
गृहाची वाट ॥ ऐसी आज्ञा ऐकूनि स्पष्ट ॥ करी तद्वत ती
बाई ॥ १२ ॥ सरोवरामाजी जाऊन ॥ बाई करीतसे
अवलोकन ॥ ताट आणि वाट्या दोन ॥ अल्पोदकीं असती
पैं ॥ १३ ॥ पाद न भिजवितां जलांत ॥ ताटवाट्या

काढूनि घेत ॥ सद्भावें वंदूनि समर्थ ॥ निजगृहीं ती गेली ॥ १४ ॥ ऐसें चरित्र अद्भुत ॥ आबालवृद्ध जाणती समस्त ॥ पुढें परिसा सावचित्त ॥ एकनिष्ठें-करूनियां ॥ १५ ॥ सन अठराशें सत्तावनांत ॥ धोंडो बाजीराव बंड करीत ॥ पेशवे उपनाम विख्यात ॥ राज्यकर्ते पूर्वींचे ॥ १६ ॥ त्याचे प्रसिद्ध सरदार ॥ अण्णा पटवर्धन जमाखिंडीकर ॥ बंडाचा दोष अनिवार ॥ तयांवर आलासे ॥ १७ ॥ इंग्लिश नृपानें जाण ॥ जप्त केलें संस्थान ॥ घाडेंकोडें अखिल धन ॥ नेलें वाहून बेळगांवीं ॥ १८ ॥ जमाखिंडीकरांचे आश्रित ॥ गोपाळ जोशी सत्त्वस्थ ॥ हिरळीकर उपनाम निश्चित ॥ तयांकारणें असे हो ॥ १९ ॥ ते अक्कलकोटींचे राहाणार ॥ त्यांनीं ऐकिला हा प्रकार ॥ यजमानासी संकट दुर्धर ॥ पडिलें तें मागें निवेदिलें ॥ २० ॥ ते समयीं जोशी जाण ॥ अक्कलकोटीं रजा घेऊन ॥ आले होते कांहीं दिन ॥ तों त्यांसी वृत्त समजलें ॥ २१ ॥ खेदयुक्त होऊनि बहुत ॥ जोशी समागमें घेऊनि सुमंत ॥ उभयतां मिळूनि समर्थ ॥ दर्शना-कारणें पातले ॥ २२ ॥ ते समयीं दत्तावतार ॥ धाकटे वेशीचे बाहेर ॥ फाटकांत बैसले असती साचार ॥ तों

जोशी सुमंत पातले ॥ २३ ॥ आणिक होते इतर जन ॥ तैं जोशी सुमंतें करूनि वंदन ॥ परस्परें करिती संभाषण ॥ पटवर्धनांविषयीं जाण पां ॥ २४ ॥ ऐसें असतां यती ॥ त्यांजकडे अवलोकिती ॥ जमखिंडीकडे मुख निश्चिती ॥ करूनि झांकिती नयनांतें ॥ २५ ॥ कांहीं वेळ स्तब्ध होऊन ॥ नंतर समर्थ नेत्र उघडून ॥ गोपाळ जोशांकडे वळून ॥ काय वदले तें ऐका ॥ २६ ॥ निर्दोषी आहेत जमखिंडीकर ॥ संस्थान मोकळें साचार ॥ इंग्लिश सदय होऊनि फार ॥ कृपेचें माहेर केलें त्यां ॥ २७ ॥ आतां कांहीं नसे सांकडें ॥ तुजला जावयाचें तिकडे ॥ असल्यास जावें रोकडें ॥ झाले निवाडे ब्राह्मणा ॥ २८ ॥ ऐसें ऐकोनि भाषण ॥ पाल्वीं ग्रंथिका बांधिती ब्राह्मण ॥ तीन दिवस होतां पूर्ण ॥ नवल तेंचि जाहलें ॥ २९ ॥ जमखिंडीहूनि लेखन ॥ त्याचें तात्पर्य परिसा जाण ॥ मुक्त होऊनि संस्थान ॥ गृहीं यजमान पातले ॥ ३० ॥ सद्गदित होऊनि मानसीं ॥ साष्टांग वंदूनि स्वामींसी ॥ पुढती जातसे कार्यासी ॥ निजगृहासी जाण पां ॥ ३१ ॥ आतां परिसावें कथेसी ॥ एकदां स्वामींचे नेत्रासी ॥ रोगें पीडिलें निश्चयेंसीं ॥ म्हणोनि वार्ता विस्तारे ॥ ३२ ॥ मुंबापुरींचा

राहणार ॥ आत्मारामपंत डॉक्टर ॥ तेणें ऐकोनि समाचार ॥ अक्कलकोटीं येतसे ॥ ३३ ॥ दर्शन घेऊनि निश्चित ॥ बैसला तेथें निवांत ॥ यतिरायांच्या नेत्रांसी करीत ॥ नानाविध उपचार ॥ ३४ ॥ तेथें गोविंद नामें जाण ॥ खत्री जातीचें जन्मस्थान ॥ तो आला करावयासी दर्शन ॥ यतिरायाचें सद्भावें ॥ ३५ ॥ दर्शन घेऊनि सत्वर ॥ सुखें पहावें गाणगापुर ॥ यात्रेसी जावें निर्धार ॥ म्हणोनि दर्शना पातला ॥ ३६ ॥ गोविंदें वंदितांचि चरण ॥ महाराज बोलती वचन ॥ डॉक्टरासी ओळखे खूण ॥ याची प्रकृति अवलोकिजे ॥ ३७ ॥ ऐसी आज्ञा करूनि मान्य ॥ पंत करीतसे अवलोकन ॥ तों प्रकृति बिघडल्याचें लक्षण ॥ कांहींच त्यासी आतुडेना ॥ ३८ ॥ हस्त जोडूनि डॉक्टर ॥ स्वामींसी विनवी भाष्य मधुर ॥ उपरी वदती यतिवर ॥ हास्यवदनेंकरूनियां ॥ ३९ ॥ तुज परीक्षा झाली नाहीं ॥ ऐसें समर्थ बोलती पाहीं ॥ चरण वंदूनि लवलाहीं ॥ गोविंद जाय श्रीक्षेत्रीं ॥ ४० ॥ गोविंद गाणगापुरीं पावला ॥ तीन दिवस वास केला ॥ तेथोनि पुढें चालिला ॥ नळदुर्गासी तेधवां ॥ ४१ ॥ ग्रामीं पावतांचि सत्वर ॥ महारोगाची व्यथा थोर ॥ त्यासी जाहले मास चार ॥ माजी



श्रीअक्कलकोटनिवासी स्वामीसमर्थमहाराज, ठाकुरद्वार.

मरण तो पावे ॥ ४२ ॥ दिगंबर मूर्ति दयाघन ॥ जें कां भक्तांचें सौख्यसदन ॥ त्याचे वंदूनि चरण ॥ चरित्र कथन करीतसें ॥ ४३ ॥ विष्णु महादेव पुणेंकर ॥ पेंडसे उपनाम साचार ॥ तयासी व्यापिलें फार ॥ महारोगेंकरूनियां ॥ ४४ त्याचे हस्तपाद जाण ॥ अवघे जाहले छिन्नभिन्न ॥ अंतरीं होऊनियां खिन्न ॥ शरण जाय दत्तात्रया ॥ ४५ ॥ श्रीगुरुचरित्राचें पठण ॥ अष्टोत्तर वेळां झालें जाण ॥ ऐसें पाहूनि निर्वाण ॥ स्वामीराज कळवळले ॥ ४६ ॥ स्वप्ना-माजीं दर्शन ॥ देती सद्गुरु आपण ॥ त्यासी म्हणती करीं गमन ॥ अक्कलकोटीं झडकरीं ॥ ४७ ॥ तूं तेथें गेलिया-नंतर ॥ आरोग्य होसील साचार ॥ ऐसें सांगोनि अनसूया-कुमर ॥ गुप्त जहाले तेधवां ॥ ४८ ॥ जनकजननीसीं आज्ञा मागत ॥ विष्णु तेव्हां अकस्मात ॥ परंतु गृहीं दैन्य बहुत ॥ म्हणूनि अनमान ते करिती ॥ ४९ ॥ तैं विष्णूसी व्यथा फार ॥ होऊनि जर्जर झालें शरीर ॥ तरी त्याचा पूर्वक्रम साचार ॥ असे निर्धार ढळेना ॥ ५० ॥ त्याचे जनकास ते अवसरीं ॥ स्वप्नीं येऊनि सांगे नरहरी ॥ अक्कलकोटा-माझारीं ॥ दिगंबराचार्य मद्रूपी ॥ ५१ ॥ पुत्रासह करोनि गमन ॥ सद्भावें घेईं दर्शन ॥ तेणें तुझ्या कामना पूर्ण ॥

होतील साच निर्धार ॥ ५२ ॥ ऐसा पाहोनि चमत्कार ॥ तयांनीं केली सिद्धता सत्वर ॥ विष्णूसी घेऊनि बरोबर ॥ अक्कलकोटीं पातले ॥ ५३ ॥ शहाबागेंत यतिवर ॥ स्थिर होते घटिका चार ॥ तेथें जावोनि सत्वर ॥ पदवंदन करिती हो ॥ ५४ ॥ पुण्याहूनि पादुका फळावळ ॥ आणिल्या होत्या जिनसा सकळ ॥ त्या घेऊनियां सोज्वळ ॥ अर्पण केल्या यतिरायां ॥ ५५ ॥ तयासी वदती यतिवर ॥ गांवमें रहना जाकर ॥ ऐसी आज्ञा होतां सत्वर ॥ येऊनि ग्रामीं राहिले ॥ ५६ ॥ मुरलीधराचे मंदिरांत ॥ राहोनि काल-क्रमण करीत ॥ तों दिवसेंदिवस प्रकृति बहुत ॥ बिघडे अत्यंत विष्णूची ॥ ५७ ॥ तयाचे जनकें येऊनि जाण ॥ स्वामींसी कथिलें वर्तमान ॥ आपुली आज्ञा झाली म्हणोन ॥ घेऊनि आलों पुत्रातें ॥ ५८ ॥ तयाची प्रकृति बहुत ॥ आतां असे रोगग्रस्त ॥ उपाय चालेना किंचित ॥ कृपादान करावें ॥ ५९ ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ कृपेनें द्रवले करुणावन ॥ श्रीपाद दत्त सगुण ॥ काय वचन बोलतसे ॥ ६० ॥ गांज घसटके लगाना जरा ॥ इनें होयगा काम तेरा ॥ अब निकलके देखो डेरा ॥ ढोंग धतूरा ह्यां नहीं ॥ ६१ ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ गांजा वांटुनि

लाविती चूर्ण ॥ कांहीं एक जातां दिन ॥ आला गुण तयासी ॥ ६२ ॥ रोगाचा झाला संहार ॥ दिसों लागलें स्वच्छ शरीर ॥ मग जोडोनि उभय कर ॥ विष्णु आज्ञा मागतसे ॥ ६३ ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ महाराज म्हणती बंधन ॥ आहे तुजला म्हणोन ॥ गृहीं जाणें नसे कीं ॥ ६४ ॥ हें परिसोनि विष्णुपंत ॥ अक्कलकोटीं राहिला स्वस्थ ॥ दर्शन घेऊनि दिवसरात्र ॥ स्वामीचरण सेवीतसे ॥ ६५ ॥ ग्वाल्हेरचा जहागिरदार ॥ तो कीर्ति ऐकूनि आला सत्वर ॥ अक्कलकोटामाजीं साचार ॥ पत्नीसहित जाण पां ॥ ६६ ॥ तयासी नाहीं कुमार ॥ म्हणोनि त्याचें दुश्चित अंतर ॥ सेवकांसहित सोलापूर ॥ त्वरें करूनि तो पाहे ॥ ६७ ॥ येरीकडे काय झाला वृत्तांत ॥ मंडळी-सहित समर्थ ॥ बैसले होते तों अकस्मात ॥ काय वचन बोलिले ॥ ६८ ॥ इकडे पोरगी येऊन ॥ पोर मागती मज-लागून ॥ तिजला देऊं कोठून ॥ संकट आज ओढवलें ॥ ६९ ॥ ऐसें बोलत असतां ॥ दर्शनासी पातलीं उभ-यतां ॥ तों समर्थ म्हणती तत्त्वतां ॥ प्रारब्धीं पुत्र नसे कीं ॥ ७० ॥ अगे पोरी जाण खूण ॥ हीनप्राक्तनाचें लक्षण ॥ आतां देऊं मी कोठून ॥ तुजलागीं निश्चयें ॥ ७१ ॥ ऐसें

बोलिले तियेसी ॥ ऐकतां दुःख झालें मानसीं ॥ वंदन करूनि श्रीपादांसी ॥ विनंति काय करीतसे ॥ ७२ ॥ मी पूर्वजन्मांतरीं ॥ पुत्रफळ अर्पिलें असतें जरी ॥ तरीच पुत्र-लाधतें घरीं ॥ तैसें नाहीं म्हणऊन ॥ ७३ ॥ जाहागीर जातसे वायां ॥ पुत्रावांचुनी दत्तराया ॥ संतान देऊनि सौख्यठाया ॥ आम्हांलागीं बैसवावें ॥ ७४ ॥ ऐसें ऐकोनि उत्तर ॥ सदय झाले दिगंबर ॥ सत्यलोकीं जाऊनि सत्वर ॥ पुत्रासी मात विचारितों ॥ ७५ ॥ ऐसें बोलूनि सत्वर ॥ छाटीचें घोंगट अंगावर ॥ क्षण एक घेऊनि यतिवर ॥ स्तब्ध राहती तेधवां ॥ ७६ ॥ त्या कथेचा नवलाव ॥ श्रोतीं परिसावा धरूनि भाव ॥ कर्ता करविता स्वामिराव ॥ निमित्तमात्र मी असें ॥ ७७ ॥ इतिश्री श्रीपाद-भूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखाराम कवि करीतसे वर्णन ॥ अष्टमाध्याय गोड हा ॥ ७८ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु

॥ अध्याय ९ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ मागिल्या अध्यायीं निरूपण ॥ स्वामिरायें घोंगट घेतलें जाण ॥ पुढें काय झालें वर्तमान ॥ तेंचि भाविकीं

परिसावें ॥१॥ काषायांबर त्यागितांचि दूर ॥ त्रयमूर्ति झाले घर्मपूर ॥ शीतळ घालूनि समीर ॥ सावध केलें दत्तात्रेया ॥ २ ॥ सतीसी बोलिले यतिवर ॥ तुझे प्रारब्धीं नाहीं कुमर ॥ ऐसें ऐकोनि उत्तर ॥ साध्वी रुदन करीतसे ॥ ३ ॥ विचित्र माझें प्राक्तन ॥ माजी विघ्न आलें दारुण ॥ नाहीं संचित क्रियमाण ॥ देवा म्हणोन उपेक्षिसी ॥ ४ ॥ तुझ्या चरणावांचून ॥ मज आश्रय नाहीं जाण ॥ अनन्यभावें आलें शरण ॥ मज तारीं नृसिंहा ॥ ५ ॥ ऐसें बोलूनि सुंदरी ॥ अट्टहासें शोक करी ॥ श्रवण करितां नरनारी ॥ दुःखें-करूनि विव्हळ ॥ ६ ॥ ऐसें ऐकोनि रुदन ॥ सदय झालें अंतःकरण ॥ यतिरायाचें तेव्हां जाण ॥ काय वचन बोलिले ॥ ७ ॥ पोरी मनीं धरीं धीर ॥ करितों उपाय साचार ॥ सत्यलोकीं जाऊनि कुमर ॥ लवलाहें आणितों मी ॥ ८ ॥ ताडन चतुराननासी ॥ करोनि देतों तनयासी ॥ स्वस्थ राहें निश्चयेंसीं ॥ श्रमनिवारण करितों गे ॥ ९ ॥ कन्ये आतां शोक आवरीं ॥ ऐसें बोलूनि ते अवसरीं ॥ काषायांबर वस्त्र अंगावरी ॥ यतिरायें घेतलें ॥१०॥ घोंगट घेऊनि जाण ॥ काया केली आच्छादन ॥ पुढती तें त्यागि-तांचि वसन ॥ घर्मेंकरून व्याप्त यती ॥ ११ ॥ शीतळ

उपचार करून ॥ सावध केले दयाघन ॥ साध्वीसी बोलती वचन ॥ काय उपरी तें परिसा ॥ १२ ॥ पोरी ऐकशील जरी वचन ॥ तरी होईल कामना पूर्ण ॥ सती ऐकोनि करी मान्य ॥ क्षण एक न लागतां ॥ १३ ॥ यतिवरें निज-कक्षेंतून ॥ खर्जुरीफलें काढिलीं दोन ॥ सतीकरीं देऊन ॥ म्हणे भक्षण करीं गृहीं ॥ १४ ॥ भोजन झालियावरी ॥ पतिसंगें क्रीडा करीं ॥ यति आज्ञा वंदूनि सत्वरीं ॥ निजमंदिरीं जातसे ॥ १५ ॥ मार्गामाजीं झाली परी ॥ उच्छिष्ट पात्र आलें अंगावरी ॥ बाई सोवळी असे भारी ॥ कांक्षा तीतें उपजली ॥ १६ ॥ गेली स्नान करावयास ॥ तदा सरोवराच्या तीरास ॥ काकभयें खर्जुरीफलांस ॥ सिकतेमाजों ठेविलें ॥ १७ ॥ अस्तमानीं करितां स्नान ॥ तिजला वाजे शीत दारुण ॥ विस्मृति होऊनि करीतसे गमन ॥ निजगृहीं तेधवां ॥ १८ ॥ रात्रीं सारूनि भोजन ॥ मग गेली करावया शयन ॥ तों अकस्मात स्मरण ॥ खर्जुरीफलांचें जाहलें ॥ १९ ॥ आक्रोश करूनि भारी ॥ बोभाये तेव्हां निजांतरीं ॥ कृपाघना भक्त कैवारी ॥ विपरीत परी झालीसे ॥ २० ॥ सती बोले मज फार ॥ दुःख झालें अनिवार ॥ त्यासी नाहीं पारावार ॥ आज

साचार कथीतसे ॥ २१ ॥ दैवें दिधलें कर्मे नेलें ॥ मजला तैसें आजि घडलें ॥ काय पूर्वी कर्म केलें ॥ त्याचें फळ येतसे ॥ २२ ॥ ग्रामद्वार असे बंद ॥ केला कैसा स्वच्छंद ॥ पाहीन स्वामी सुखानंद ॥ गोविंद दत्त जगदात्मा ॥ २३ ॥ गोड न लागे मज धाम ॥ नाहीं आज सुखाराम ॥ कोठें माझा मेघश्याम ॥ पूर्णकाम करील तो ॥ २४ ॥ ऐसा शोक रजनींत ॥ करितां झाली प्रभात ॥ प्रातर्विधी करूनि त्वरित ॥ जाय पहाया फळद्रुया ॥ २५ ॥ बहु लगबगें नारी ॥ त्या सरोवराच्या तीरीं ॥ शोधीतसे मही सारी ॥ देऊनि लक्ष तेधवां ॥ २६ ॥ मही सारी शोधितां सकळ ॥ अवचित सांपडलें स्थळ ॥ उकरोनि पाहे तात्काळ ॥ फळांचीं अंडीं जाहलीं ॥ २७ ॥ ऐसें पाहूनि विपरीत ॥ सती झाली भयभीत ॥ तीं अंडीं पदरीं घेऊनि त्वरित ॥ यतिदर्शना जातसे ॥ २८ ॥ सद्भावें करूनि वंदन ॥ सांगितलें सर्व वर्तमान ॥ म्हणे दयाधना सौख्यसदन ॥ नारायण यतींद्रा ॥ २९ ॥ स्वामिराया मजपासून ॥ आज्ञा भंग झाली जाण ॥ क्षमा करोनि करीं पावन ॥ कन्येलागीं लवलाहें ॥ ३० ॥ ऐसें ऐकोनि उत्तर ॥ सदय होऊनि यतीश्वर ॥ वचन

बोलिले मनोहर ॥ तेंचि साम्र परिसावें ॥ ३१ ॥ सोसो बरसके छोरे दोन ॥ हमने दियेथे अभागी कोन ॥ है नहीं मालूम हैरान ॥ काहेकू अब रोती है ॥ ३२ ॥ हमारो पहो नहीं आदा ॥ आकर सताते क्यों जादा ॥ हासकर तुसे गारी ज्यादा ॥ देकर उसकू धमकाया ॥ ३३ ॥ अबी जाना घरकु ॥ गरज नहीं हमकू ॥ आकर सताते किसकू ॥ अब्बी निकलके ज्या वे ज्या ॥ ३४ ॥ ऐसें ऐकोनि भाषण ॥ साध्वी करीतसे रुदन ॥ म्हणे देवा करुणाघन ॥ क्षमा करीं सर्वस्वें ॥ ३५ ॥ परिसोनि तियेचें उत्तर ॥ महाराज करिती कृपेचें माहेर ॥ सतीलागीं साचार ॥ तेंचि भाविकीं परिसावें ॥ ३६ ॥ आतां तूं गृहीं जाऊन ॥ सुखें करीं कालक्रमण ॥ पुढें होईल संतान ॥ तुजकारणें निश्चयें ॥ ३७ ॥ आज्ञा वंदूनि निश्चितीं ॥ विन्हाडीं पातली तीं सती ॥ भोजन देऊनि विप्रांप्रती ॥ दक्षिणा देऊनि बोळविले ॥ ३८ ॥ पुनरपि आज्ञा घ्यावयासी ॥ सती आली सत्वरेंसी ॥ दयाघना कृपाराशी ॥ सदय होणें आदांना ॥ ३९ ॥ वंदन करोनि पायीं ॥ उभी राहे ती बाई ॥ कृपा करोनि लवलाहीं ॥ आज्ञा मज देइंजे ॥ ४० ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ यती बोले प्रसन्नवदन ॥ तुझें

कार्य होईल जाण ॥ सत्य वचन हें माझें ॥ ४१ ॥
श्रीफळ पेढे घेऊनि हातीं ॥ प्रसाद दिधला तिजप्रती ॥
उपरी वदले श्रीयती ॥ सुखानंदें नांद जा ॥ ४२ ॥
तो प्रसाद घेऊनि जाण ॥ सद्भावें केलें वंदन ॥ मग स्वामीतें
अवलोकून ॥ करूनि ध्यान निघाली ॥ ४३ ॥ पतीसवें
पतिव्रता ॥ गृहीं पावली अवचिता ॥ तों कांहीं काळ
जातां ॥ गर्भ राहिला तिजलागीं ॥ ४४ ॥ पूर्ण होतांचि
दिन ॥ प्रसवली सती पुत्र सुगुण ॥ मंगल वाद्यें वाजवून ॥
उत्साह पूर्ण मांडिला ॥ ४५ ॥ तेथोनि नानापरींचे ॥
फळें फळावळ वसनाचे ॥ धन-कणमिश्रित याचे ॥ नज-
राणे साचे पाठविले ॥ ४६ ॥ ऐसें गुरूचें चरित्र ॥ ऐकतां
पावन होती श्रोत्र ॥ लीला गाय सहस्त्रवक्र ॥ भक्तिपात्र
होऊनि ॥ ४७ ॥ श्रीधर नामें ब्राह्मण ॥ कर्नाटकीं त्याचें
स्थान ॥ राहावयाचें त्यासी दारुण ॥ उदरशूळ झालासे
॥ ४८ ॥ तेणें दुःखित झाला जाण ॥ व्हावया तयाचें
निवारण ॥ गाणगापुरीं श्रींचें दर्शन ॥ सेवा कराया
पातला ॥ ४९ ॥ सेवा करी तें प्रेमभरित ॥ यामिनी-
माजीं दृष्टांत ॥ यतिवेषें करूनि त्वरित ॥ दत्तात्रेय
आज्ञापिती ॥ ५० ॥ श्रीपुरीचा पर्णरस ॥ काढूनि घालीं

त्यांत सुरस ॥ सुंठ सैंधव औषधास ॥ मिश्रण करूनि घेइंजे ॥ ५१ ॥ म्हणजे रोग होईल शांत ॥ एकाएकीं होऊनि जागृत ॥ श्रीधर पाहे सावचित्त ॥ तंव प्रभात झालीसे ॥ ५२ ॥ दुसरे दिवशीं विचार करीत ॥ कवण्या वृक्षास म्हणतात ॥ श्रीपुरी नाम यथार्थ ॥ हें तयासी आकळेना ॥ ५३ ॥ पुनरपि नित्यकर्मेंकरून ॥ सारूनि सर्व अनुष्ठान ॥ देउळामाजीं केलें शयन ॥ दृष्टांत झाला तात्काळ ॥ ५४ ॥ दिगंबररूपेंकरून ॥ स्वप्नामाजीं दिधलें दर्शन ॥ उपरी करिती भाषण ॥ कां कष्ट घेशी ब्राह्मणा ॥ ५५ ॥ श्रीपुरी कोणत्या झाडास ॥ म्हणती जन परिसें त्यास ॥ अक्कलकोटीं परमहंस ॥ दर्शन घेतां समजेल ॥ ५६ ॥ ऐसें सांगूनियां त्वरित ॥ गुप्त झाले अनसूया-सुत ॥ श्रीक्षेत्र त्यजोनि सुखें जात ॥ अक्कलकोटीं पातले ॥ ५७ ॥ तों इकडे मंडळीसहित ॥ नवे विहिरीचे जवळ निश्चित ॥ मारुतीचे ओट्यावर समर्थ ॥ स्वेच्छेंकरूनि बैसले हो ॥ ५८ ॥ तों धाकटे वेशींतूनि शहरांत ॥ श्रीधर आला पथ क्रमीत ॥ स्वामीराज पाहूनि सुखभरित ॥ चरण वंदूं निघाला ॥ ५९ ॥ हस्त जोडूनि समोर ॥ उभा राहिला साचार ॥ श्रीपुरी म्हणजे निंबतरुवर ॥ सत्य जाण

ब्राह्मणा ॥ ६० ॥ श्रीपुरीचा रस काढून ॥ माजीं सुंठ सैंधव मिश्रण ॥ करूनि घेणें दिवस तीन ॥ उपरी आराम पावसी ॥ ६१ ॥ ऐसें बोलिले यतिवर ॥ तद्वत करी धरामर ॥ आठ दिवसांनंतर ॥ आराम त्यासी पडियेला ॥ ६२ ॥ ऐसे चमत्कार अद्भुत ॥ सदयहृदय दत्त करीत ॥ त्यांचें श्रवण पठण करितां त्वरित ॥ कुल पावन होतसे ॥ ६३ ॥ वांई निकट कृष्णातीर ॥ तारगांवचे राहणार ॥ ठाकुरदास बोवांचे कुमर ॥ श्रीकृष्ण बापु जाणिजे ॥ ६४ ॥ तयांसी लहानपणापासून ॥ असे गुरुभक्तीचा छंद जाण ॥ नृसिंह-वाडी पंढरपुरीं जाऊन ॥ घेणें दर्शन आवडे मना ॥ ६५ ॥ पंढरपुरामाजीं जाण ॥ अपराध थोर केल्यावरून ॥ श्वेत कुष्ठ मुखावर निर्माण ॥ जाहला पूर्ण पूर्वकर्मे ॥ ६६ ॥ विद्रूप जाहलें शरीर ॥ तेणें सखेद होय अंतर ॥ उपचार दोन संवत्सर ॥ केले परी गुण नाहीं ॥ ६७ ॥ मग पश्चात्ताप पावोनि मनीं ॥ विचार केला दृढ त्यांनीं ॥ सर्वस्वाचा त्याग करूनी ॥ काशीवास करावा ॥ ६८ ॥ काशीयात्रेसी जातां साचार ॥ नृसिंहवाडी गाणगापुर ॥ पंढरपुरीं रमावर ॥ पाहूनि विठ्ठल मग जावें ॥ ६९ ॥ अक्कलकोटीं निश्चिती ॥ दिगंबराचार्य नामें यती ॥ दत्तावतार

सौख्यमूर्ति ॥ वंदूनि पुढती रिघावें ॥ ७० ॥ मागुती गमन या देशांत ॥ करूं नये सर्वथा निश्चित ॥ ऐसा करूनियां बेत ॥ गाणगापुरीं पातले ॥ ७१ ॥ तेथें महापूजा वंदन ॥ करूनि केलें विप्रभोजन ॥ रसभरित करूनि कीर्तन ॥ निरोप घेत स्वामींचा ॥ ७२ ॥ तों यामिनीमाजीं साचार ॥ दत्तात्रेय पूर्णावतार ॥ येऊनि कथीतसे साचार ॥ श्रीकृष्णा साच परिसावें ॥ ७३ ॥ अक्कलकोटीं जाऊन ॥ घेईं स्वामीचें दर्शन ॥ तेणें होसील पावन ॥ सकळ रोगांपासूनी ॥ ७४ ॥ ऐसी आज्ञा जाहाल्यावर ॥ सुप्रभातीं सत्त्वधीर ॥ राउळामाजीं जाऊनि सत्वर ॥ पादुकादर्शन घेतसे ॥ ७५ ॥ पुढिले अध्यायीं कथन ॥ होईल बापूबावांचें आख्यान ॥ जें वदवील अनसूयानंदन ॥ तेंचि भाविकीं परिसावें ॥ ७६ ॥ इति श्री श्रीपादभूषण ॥ दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखाराम कवि करीतसे वर्णन ॥ नवमाध्याय गोड हा ॥ ७७ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १० ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ नवमाध्यायीं निरूपण ॥

श्रीकृष्णबापूंचें आख्यान ॥ त्याचें परिसा व्याख्यान ॥ भावबळेंकरूनियां ॥ १ ॥ गाणगापुरीं ठाकुरदाससुत ॥ पादुकांचें जाऊनि दर्शन घेत ॥ तों चमत्कार झाला बहुत ॥ केशर-मृगमदेंकरूनियां ॥ २ ॥ त्या निर्गुण पादुकांशीं लेपन ॥ यात्रेमाजी करिती जन ॥ तें श्रीकृष्णें अवलोकून ॥ मानसीं हेतु धरिलासे ॥ ३ ॥ केशर कस्तूरी आपणास ॥ मिळोनि करावें पुजनास ॥ ते पदार्थ श्रीक्षेत्रास ॥ दुर्लभ असती जाण पां ॥ ४ ॥ इतुकी ऊर्मि उत्पन्न ॥ तयाचे मानसीं झाली जाण ॥ कवणासीं न करितां भाषण ॥ केली सिद्धता गमनाची ॥ ५ ॥ कुटुंबासहित तेथोन ॥ तीन दिवस पंथ क्रमण ॥ करूनि पातले संस्थान ॥ अक्कलकोट लवलाहें ॥ ६ ॥ शोध करिती बहुत ॥ कोठें आतुडेतना समर्थ ॥ तों कोणी येऊनि वृत्तांत ॥ कथिती शीघ्र चलावें ॥ ७ ॥ बाहेर गांवींची गणिका येऊन ॥ अक्कलकोटीं राहिली जाण ॥ तियेचे सदनीं दयाघन ॥ स्वेच्छेंकरूनि बैसले हो ॥ ८ ॥ तेथें जाऊनि श्रीकृष्ण ॥ सद्भावें करीतसे वंदन ॥ तों महाराज बोलती वचन ॥ कस्तूरी लाव अबिके अबी ॥ ९ ॥ ती आज्ञा करूनि मान्य ॥ श्रीकृष्ण बोले देतों आणुन ॥ तात्काळ शहरांत जाऊन ॥ त्वरें मृगमद

आणिलासे ॥ १० ॥ अमृतफळें पुढती ठेवून ॥ केली कस्तुरी अर्पण ॥ ती समर्थं हस्तकीं घेऊन ॥ बैसले होते तेधवां ॥ ११ ॥ नंतर मंडळीसहवर्तमान ॥ बैसले सन्निध श्रीकृष्ण ॥ तयांनीं करितांचि पदवंदन ॥ दिगंबराचार्य बोलिले ॥ १२ ॥ ये लेव ऐसें यती ॥ बोलिले श्रीकृष्ण-बापूंप्रती ॥ काष्ठखोड सान आकृती ॥ मुळी वनस्पती एकसे ॥ १३ ॥ ऐसें ऐकतांचि उत्तर ॥ बापूनें पसरिला पदर ॥ सर्व करिती जयजयकार ॥ कार्य झालें म्हणोनियां ॥ १४ ॥ हें काष्ठमूळ उगाळून ॥ अंगासी करावें लेपन ॥ तेणें होईल कुष्ठहरण ॥ ऐसें अखिल बोलिले ॥ १५ ॥ मग यतिमुखांतूनि पाहें ॥ अक्षर निघालें लवलाहें ॥ परोपकारका है ॥ हमकू क्या करनेका ॥ १६ ॥ नंतर निरोप घेऊन ॥ बिऱ्हाडीं पातले श्रीकृष्ण ॥ दुसरे दिवशीं वर्तमान ॥ झालें तेंचि परिसावें ॥ १७ ॥ सौभाग्यवती राधाबाई ॥ श्रीकृष्णाची पत्नी पाहीं ॥ स्वामींचे दर्शनासी लवलाहीं ॥ भावयुक्त जातसे ॥ १८ ॥ सप्तमवार्षिक तनया एक ॥ विवाह झाला तिचा देख ॥ पुढती पुत्राचें सांग सुख ॥ सतीकारणें नसे कीं ॥ १९ ॥ तेणें दुःखित अंतर ॥ मानसीं प्रार्थी यतिवर ॥ म्हणे दत्तात्रेया कृपावर ॥ देऊनि कुमार

ओपिजे ॥ २० ॥ हा हेतु धरूनि मनांत ॥ सती पातली अकस्मात ॥ दर्शनाकारणें तों समर्थ ॥ लीला करिती अनुपम ॥ २१ ॥ यतींनीं टोपी काढून ॥ निजमस्तकाची दिधली झुगारून ॥ राधाबाईच्या ओटींत जाण ॥ महाप्रसाद म्हणऊनि ॥ २२ ॥ चरण वंदूनि राधिका ॥ गृहीं पावली शीघ्र देखा ॥ पुढती कौतुक झालें ऐका ॥ श्रोते शुद्ध सुमनानें ॥ २३ ॥ द्वादश मासांचे अंत ॥ सतीसी झाला पुत्र प्राप्त ॥ अभिधान त्याचें गुरुनाथ ॥ आज्ञेकरूनि ठेविलेंसे ॥ २४ ॥ प्रस्तुत तो गुरुनाथ ॥ सप्त वर्षांचा आहे सत्य ॥ यतिआज्ञेकरूनि निश्चित ॥ सन्निध उपनयन जाहलें ॥ २५ ॥ त्या गुरुनाथासी जाण ॥ प्रसन्न होऊनि दयाघन ॥ आपुली टोपी काढून ॥ जरी भर्जरी दीधली ॥ २६ ॥ गुरुनाथाचे पांचवे वर्षीं जाण ॥ समर्थें केलें दान ॥ कीर्तनामाजीं वाहून ॥ मस्तकीं टोपी घातली ॥ २७ ॥ शके सत्राशें ब्याण्णवांत ॥ माघमासीं पर्व शिवरात्र ॥ श्रीकृष्णबावा कीर्तन करीत ॥ यतीसन्निध प्रज्ञापुरीं ॥ २८ ॥ तेव्हां हें वृत्त जाहलें ॥ श्रीकृष्णासी कुष्ठें पीडिलें ॥ त्याचे निवारणार्थ दीधलें ॥ काष्ठ खोड यतिरायें ॥ २९ ॥ तें प्रतिदिवशीं जाण ॥ उगाळूनि करिती

चर्चन ॥ सर्वांगासीं माजी मिश्रण ॥ भस्म गाणगापुरींचें हो ॥ ३० ॥ ऐसा क्रम चालिला साभार ॥ त्यासी कांहीं दिवस झाल्यावर ॥ कुष्ठाचा होय परिहार ॥ यतिकृपें-करूनियां ॥ ३१ ॥ आणिक एक झाला प्रकार ॥ प्रतिवर्षीं ठाकुरदास सत्वर ॥ अक्कलकोटीं करिती येरझार ॥ अनुग्रह व्हावा म्हणोनियां ॥ ३२ ॥ समर्थांचे वंदूनि चरण ॥ प्रार्थना करी श्रीकृष्ण ॥ सदयहृदया पूर्ण ब्रह्म ॥ करणें पावन अनाथा ॥ ३३ ॥ ऐसें आणितांचि मनांत ॥ गालि-प्रदानें देती समर्थ ॥ अनुग्रहाचा वाच्यार्थ ॥ मनीं आणिती बापुबावा ॥ ३४ ॥ क्रोध आणोनि कांहीं ॥ समर्थ बोलती लवलाहीं ॥ पंतोजीपन हम करते नहीं ॥ क्यौंरे सताते आकर ॥ ३५ ॥ गाटके गुरु बाटके चेले ॥ हम करते नहीं ये देखले ॥ ऐसें भाषण ऐकिलें ॥ यतिरायांचें बाबांनीं ॥ ३६ ॥ एके वर्षीं निग्रह करून ॥ श्रीकृष्णें केलें समर्थांसी वंदन ॥ जरी मजला आलें मरण ॥ तरी ही स्मृति राहील कीं ॥ ३७ ॥ ऐसें मनांत आणिल्यावर ॥ काय बोलती यतिवर ॥ ज्यूता मारिंगे ज्याकर ॥ पुढती श्रीकृष्ण आणिती मनीं ॥ ३८ ॥ पूर्वीं काशीमाजीं जाण ॥ रामानंद यति दयाघन ॥ तयांचा अनुग्रह व्हावा म्हणोन ॥ कबीर

प्रयत्न करीतसे ॥ ३९ ॥ शोध करितां कबीर भक्त ॥ मणिकर्णिकेच्या घाटीं समर्थ ॥ रामानंद पाहूनि अकस्मात ॥ मानसीं बहुत संतोषला ॥ ४० ॥ मग अनुग्रह व्हावा म्हणून ॥ केली प्रार्थना विनवून ॥ ऐसें ऐकोनियां भाषण ॥ कोपायमान झाले यती ॥ ४१ ॥ निजपदींच्या पादुका घेऊन ॥ कबीरासी केलें ताडण ॥ तोचि तयांनीं अनुग्रह मानून ॥ करी भजन रामाचें ॥ ४२ ॥ ऐसें मनीं आणिल्या-वर ॥ महाराज करिती उत्तर ॥ झक मारता है कबीर ॥ पर्वा नहीं रखतेजी ॥ ४३ ॥ या कृत्यासी साचार ॥ लोटला एक संवत्सर ॥ काय झाला पुढती प्रकार ॥ तोचि भाविकीं परिसावा ॥ ४४ ॥ घडे एकदां चमत्कार ॥ प्रज्ञापुरीं यतिवर ॥ पाहूनि विप्राचें मंदिर ॥ बैसले होते टेंकुनियां ॥ ४५ ॥ ते समयीं अकस्मात ॥ आले ठाकुरदाससुत ॥ वंदन करितांचि समर्थ ॥ वदती हरिकथा करता है ? ॥ ४६ ॥ ऐसें ऐकोनियां भाषण ॥ मानसीं बोलिले श्रीकृष्ण ॥ नारद शुकयोगी कीर्तन ॥ करिती तैसें अवधारा ॥ ४७ ॥ ज्ञानदेव नामदेव ॥ तुकारामबावा स्वयमेव ॥ यांनीं कीर्तन करूनि घेतला ठाव ॥ हरिसन्निध जाण पां ॥ ४८ ॥ आम्ही करितों उदरकथा ॥ नेणों आणिकांच्या पंथा ॥ धारण केली

प्रपंचकथा ॥ कुटुंबरक्षणार्थी निश्चयें ॥ ४९ ॥ हें मनोमय उत्तर ॥ ऐकोनि बोलिले यतिवर ॥ हमकु तुमकु है गुलजार ॥ हरिकीर्तन करनेका ॥ ५० ॥ त्या दिवसापासून ॥ गुरुप्रतिपदेसी जाण ॥ महाराजांसन्निध येऊन ॥ श्रीकृष्ण करिती कीर्तन पैं ॥ ५१ ॥ समर्थें अनुग्रह केला ॥ तो प्रकार पुढें ठेविला ॥ पूर्वार्ध येथोनि संपला ॥ उत्तरार्ध होणें असे ॥ ५२ ॥ स्वामिराजकृपेंकरून ॥ पूर्वार्ध केला निरूपण ॥ श्रोतावक्ता होऊनि आपण ॥ श्रीपादभूषण वदविलें ॥ ५३ ॥ सद्भाव मानसीं धरून ॥ जे नर करिती आवर्तन ॥ त्यांची मनकामना पूर्ण ॥ यतिराज करितील कीं ॥ ५४ ॥ श्रवण मनन निदिध्यास ॥ करितां साक्षात्कार होय त्यास ॥ चतुर्वर्ग मोक्षास ॥ स्वामिराज देणार पैं ॥ ५५ ॥ हा ग्रंथसंग्रह ज्याचे घरीं ॥ तया न्यून नसे संसारीं ॥ पुत्र कन्या धन सत्वरीं ॥ लाधोनि मान्य होईल तो ॥ ५६ ॥ या वचनीं धरा विश्वास ॥ पारायणाचा अभ्यास ॥ करितां दिगंबराचार्यास ॥ दया निपजेल अखिलांची ॥ ५७ ॥ दक्षिण देशीं पुणें प्रांत ॥ करेपठार विख्यात ॥ ब्रह्मकमंडलु कऱ्हाड तीर्थ ॥ तया सन्निध एक असे ॥ ५८ ॥ चरणावतीचे तीरीं जाण ॥ चांबळी ग्राम वस्ती जन ॥ तये ठायीं

वास करून ॥ कुटुंबभरण करीतसे ॥ ५९ ॥ ऋग्वेद आश्वलायन शाखेचे ॥ गणेश सखाराम वदती साचे ॥ चार- पुत्र असती त्यांचे ॥ नामें साग्र परिसावीं ॥ ६० ॥ वामन ज्येष्ठ गंगाधर ॥ बालकृष्ण आणि शंकर ॥ सरनाईक उपनाम साचार ॥ तयांकारणें असे कीं ॥ ६१ ॥ तयांमाजीं बालकृष्णाचा ॥ ज्येष्ठ पुत्र मी साचा ॥ सखाराम दास स्वामींचा ॥ वदती वाचा अखिल हो ॥ ६२ ॥ पितामहाचा प्रकार ॥ श्रवण केला साचार ॥ आतां मातामहाचा विस्तार ॥ सावधानें परिसावा ॥ ६३ ॥ सांख्यायन गोत्रीं उत्पन्न ॥ गंगुकाका झाले जाण ॥ क्षीरसागर उपनाम ॥ तयांकारणें असे कीं ॥ ६४ ॥ सर्व म्हणती शिरवळकर ॥ प्रसिद्ध जगीं साचार ॥ भूवैकुंठ पंढरपूर ॥ जाणूनि वास केलासे ॥ ६५ ॥ आषाढी - कार्तिकीची वारी ॥ उदास होऊनि संसारीं ॥ करिती कीर्तन महाद्वारीं ॥ भक्तिभावें- करूनियां ॥ ६६ ॥ शके सत्राशें ब्याण्णवांत ॥ उत्तम कार्तिक मासांत ॥ श्रीक्षेत्र पंढरपुरीं सत्य ॥ देह तयांनीं ठेविला ॥ ६७ ॥ सांप्रदाय केला फार ॥ देशोदेशींचे नारीनर ॥ उपासनामार्ग विस्तार ॥ तयांनीं पूर्ण वाढविला ॥ ६८ ॥ तयांचे ज्येष्ठ सहोदर ॥ बापूदादा शिरवळकर ॥

तयांची कन्या सुंदर ॥ वेणूबाई अभिधान ॥ ६९ ॥
सत्यभामाबाई अभिधान ॥ सासुऱ्याकडे असे पूर्ण ॥
तियेचे उदरीं माझें जनन ॥ झालें साच श्रोते हो ॥ ७० ॥
बालकृष्ण नामें पिता ॥ सत्यभामा नामें माझी माता ॥
सद्भावें वंदूनि उभयतां ॥ पूर्वार्ध साग्र संपविला ॥ ७१ ॥
कथेची करूनि माळा ॥ घातली स्वामींच्या गळां ॥ तेथील
सुखाचा सोहळा ॥ भक्तजन जाणती ॥ ७२ ॥ शके सत्राशें
ऱ्याण्णव ॥ प्रजापति संवत्सराचें नांव ॥ वैशाखमास वसंत
पूर्व ॥ ते दिनीं पुण्यग्रामीं हो ॥ ७३ ॥ श्रीपादभूषणपूर्वार्ध ॥
समास झालासे यथार्थ ॥ पुढती वदवितील उत्तरार्ध ॥
स्वामीराज तें पहा ॥ ७४ ॥ इतिश्री श्रीपादभूषण ॥
दिगंबराचार्यांचे सद्गुण ॥ सखाराम कवि करीतसे वर्णन ॥
दशमाध्याय गोड हा ॥ ७५ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

॥ इतिश्री श्रीपादभूषण समाप्त ॥

॥ श्रीस्वामीचरित्रस्तोत्र ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीस्वामीचरित्रस्तोत्रप्रारंभः ॥

आधीं नमूं श्रीसद्गुरुनाथा ॥ भक्तवत्सल कृपावंता ॥ तुजवांचूनि या जगीं त्राता ॥ अन्य आतां नसेचि ॥ १ ॥ अवतार घेतला समर्थ ॥ नाम शोभे कृपावंत ॥ पाप जाळूनियां सत्य ॥ भार उतरिला जगतींचा ॥ २ ॥ मूळ स्वरूप निर्गुण ॥ निराकार नित्य ध्यान ॥ अघटित लीला करूनि जाण ॥ तारिलें जनां कौतुकें ॥ ३ ॥ म्हणूनि नमन तुझे पायीं ॥ तुजवीण अन्य दाता नाहीं ॥ विश्वव्यापक तूंचि पाहीं ॥ ध्याती हृदयीं साधुजन ॥ ४ ॥ रूपारूपासी वेगळा ॥ गुणागुणाच्या निराळा ॥ परी अघटित जगीं कळा ॥ सूत्र हातीं वागवीत ॥ ५ ॥ स्वस्वरूपीं निपुण ॥ सादर करावया जगती पालन ॥ स्वामी नाम सगुण ॥ उद्धाराकारणें धरियेलें ॥ ६ ॥ तो दिगंबरवेष द्वैतरहित ॥ दत्तदिगंबर हाचि सत्य ॥ भार उतरावया यथार्थ ॥ कलियुगीं समर्थ अवतरला ॥ ७ ॥ दीनजनांचिया पोटीं ॥ पाप जाळूनि तारी संकटीं ॥ नाम जयाचें धरितां कंठीं ॥ मग सृष्टीं भय नाहीं ॥ ८ ॥ ॐआदिस्वरूपरूपा ॥ ओंकारा निर्गुणरूपा ॥ जगव्याप्यव्यापककौतुका ॥ दाखविता सखा

तूंचि खरा ॥ ९ ॥ कोण करील तुझी स्तुती ॥ शेष शिणला निश्चितीं ॥ तेथें मानव बापुडे किती ॥ अल्पमती निर्धारें ॥ १० ॥ भक्तसुखकरा स्वामिराया ॥ भक्तवत्सला करुणालया ॥ जगतारका तुझ्या पायां ॥ नमन माझें सर्वदा ॥ ११ ॥ मी अन्यायी थोर ॥ परी तूं कृपेचा सागर ॥ जग तारावया निर्धार ॥ सगुण अवतार धरियेला ॥ १२ ॥ जयजयाजी गुरुनाथा ॥ भक्तवत्सला समर्था ॥ तुजवांचूनि अन्य त्राता ॥ मज आतां पाहतां नसेचि ॥ १३ ॥ सर्व सुख सगुण ॥ अवतार हाचि पूर्ण ब्रह्म जाण ॥ जग तारावया-कारण ॥ अवतार जाण धरियेला ॥ १४ ॥ अनंत ब्रह्मांडांचा नायक ॥ तूंचि सखा माझा देख ॥ तुजवांचूनि अन्य कौतुक ॥ नको नको मजलागीं ॥ १५ ॥ कैसी करावी तुझी स्तुति ॥ हें मी नेणें बा निश्चितीं ॥ चरणीं जडो तुझ्या प्रीती ॥ ऐसें आतां करावें ॥ १६ ॥ दीनदयाळा गुरुराया ॥ भावें वंदिलें तुझ्या पायां ॥ सोडिली समूळ मोहाची माया ॥ आतां मज वायां दवडूं नको ॥ १७ ॥ हें स्तोत्र तुझें लघुस्तुती ॥ तूंचि बोलविता निश्चितीं ॥ भक्त तारावया गुरुमूर्ति ॥ अवतारस्थिती दाविली ॥ १८ ॥ दीनवत्सला स्वामिराया ॥ अगाध तेजा करुणालया ॥ अघटित

जगतीं तव माया ॥ लीला कौतुक निर्धार ॥ १९ ॥ निरंजन स्वस्वरूपरूपा ॥ विश्वरूपा आदिरूपा ॥ अक्कलकोटीं दावूनि कौतुका ॥ जगत्सुखा राहिला ॥ २० ॥ अक्कलकोटीं जरी जन ॥ अवचित कोणी जाता जाण ॥ उद्धार तयाकारण ॥ स्वामिकृपें होय खरा ॥ २१ ॥ अवधूतवेष निर्धारीं ॥ निर्गुण निराकारी ॥ तेज पाहतां थरारी ॥ काळ पोटीं बापुडा ॥ २२ ॥ वेदीं रूप वर्णिलें निर्धार ॥ तैसी लीला दाविली साकार ॥ विश्वविश्वंभर गुरुवर ॥ सद्गुरुनाथ स्वामी माझा ॥ २३ ॥ चरण पाहतां सुकुमार ॥ कैसें पूजावें निर्धार ॥ ठेवूनि प्रेम गादीवर ॥ सत्य सादर पूजावें ॥ २४ ॥ प्रेम गंगा यमुना सरस्वती ॥ सिंधु कावेरी भागीरथी ॥ तयांसी प्रार्थावें निश्चितीं ॥ स्नानालागीं समर्थांच्या ॥ २५ ॥ मन कलश घेऊनि निर्धार ॥ प्रेमगंगा जलसागर ॥ स्नान घालूनि उत्तरोत्तर ॥ पूजन प्रकार करावा ॥ २६ ॥ आवडी अक्षता निर्धारीं ॥ सुमन संगती घेऊनि वरी ॥ सद्गुरुनाथ पूजावा अंतरीं ॥ प्रेमभरी होऊनियां ॥ २७ ॥ भक्तीची ती सहाण ॥ वरी नामाचा चंदन ॥ शांति केशर मिळवून ॥ गंध अर्चन समर्थांस ॥ २८ ॥ क्षमा धूप दीप निर्धारीं ॥ प्रेम नैवेद्य त्या वरी ॥ भावें

समर्पोनि निर्धारीं ॥ सद्गदित अंतरीं होऊनियां ॥ २९ ॥ क्रोध कापूर जाळावा ॥ प्रेमें स्वामी आळवावा ॥ आवडीचा तो ध्यानीं पहावा ॥ शुद्ध चित्त करूनियां ॥ ३० ॥ ऐसी पूजा झालियावरी ॥ मग प्रार्थावा निजांतरीं ॥ हृदयीं उठती प्रेमलहरी ॥ ऐशापरी आळवावा ॥ ३१ ॥ जय-जयाजी गुरुराया ॥ जयजयाजी करुणालया ॥ भक्तां दावूनियां पायां ॥ भवभया निवारिलें ॥ ३२ ॥ जय-जयाजी अनंतरूपा ॥ जयजयाजी आदिरूपा ॥ चुकवा चुकवा जन्मखेपा ॥ मार्ग सोपा दावूनियां ॥ ३३ ॥ जय-जयाजी त्रिगुणा ॥ जयजयाजी अवधूतसगुणा ॥ पुरवावया मनकामना ॥ जनीं वनीं फिरियेला ॥ ३४ ॥ जयजयाजी दिगंबरा ॥ जयजयाजी सर्वेश्वरा ॥ मज सांभाळा लेंकरा ॥ तुजविण आसरा नाहीं नाहीं ॥ ३५ ॥ जयजयाजी समर्था ॥ स्वामिराया कृपावंता ॥ तुजवीण आम्हां त्राता ॥ नाहीं नाहीं जगत्रयीं ॥ ३६ ॥ शुद्धतेजा तेजरूपा ॥ दिव्य स्वस्वरूपरूपा ॥ चुकवा चुकवा जन्मखेपा ॥ आदिरूपा जगद्गुरु ॥ ३७ ॥ जयजयाजी यतिरूपा ॥ जयजयाजी अघटितस्वरूपा ॥ निर्गुण - सगुणरूपा ॥ सच्चिदानंदा जगद्गुरो ॥ ३८ ॥ जयजयाजी त्रिगुणनाशका ॥ जयजयाजी त्रिदोष-

हारका ॥ जयाजयाजी ब्रह्मांडनायका ॥ निजभक्तसखया स्वामिराया ॥ ३९ ॥ जयजयाजी दत्तात्रेया ॥ जयजयाजी करुणालया ॥ जयजयाजी विश्वमाया ॥ संशयभयहारका स्वामिराया ॥ ४० ॥ जयजयाजी आनंदविलासा ॥ जयजयाजी पापतमनाशा ॥ जयजयाजी अवधूतवेषा ॥ भवभयपाशनिवारका ॥ ४१ ॥ जयजयाजी निजभक्तपालका ॥ जयजयाजी विश्वव्यापका ॥ जयजयाजी मोक्षसुखदायका ॥ कलियुगीं देवा तूं एक ॥ ४२ ॥ जयजयाजी विराट्स्वरूपा ॥ जयजयाजी आदिरूपा ॥ जयजयाजी विश्वव्यापका ॥ मायबापा गुरुराया ॥ ४३ ॥ त्रिलोकीं तूं समर्थ ॥ अवतार तुझाचि यथार्थ ॥ तारक भक्तांलागीं सत्य ॥ गर्भीरूप दावूनी ॥ ४४ ॥ तूं पूर्णब्रह्म जाण ॥ निर्विकार निर्गुण ॥ निरंजनीं सदा ध्यान ॥ लीलाकौतुक दाविलें ॥ ४५ ॥ तेज पाहतां थरारे ॥ कली मनीं सदा झुरे ॥ विश्वव्यापक व्यापूनि उरे ॥ तारक खरे पतितांसी ॥ ४६ ॥ तुजवीण आणिक आधार नाहीं ॥ कलियुगीं दुजा आम्हां पाहीं ॥ श्रीगुरुनाथ तूंचि खरा तोही अवताररूपें नटलासी ॥ ४७ ॥ लीला दाविली अगाध ॥ शेषा न करवे त्याचा शोध ॥ जें तुम्हीं केलें

विविध ॥ ज्ञानरूपें जाणविलें ॥ ४८ ॥ अक्कलकोटमहापुरीं ॥ वास केला निर्धारीं ॥ पवित्रक्षेत्र करूनि तारीं ॥ पाय ठेवूनि जगतासी ॥ ४९ ॥ तरी जनीं सत्य आतां ॥ अक्कल-कोटीं जावें तत्त्वतां ॥ हित साधावया यथार्था ॥ पवित्र भूमी पैं केली ॥ ५० ॥ हें वचन निर्धार ॥ समर्थांचें असे साचार ॥ बोल बोलविता उत्तर ॥ स्वामी माझा निर्धारीं ॥ ५१ ॥ अक्कलकोटीं करितां अनुष्ठान ॥ हें स्तोत्र वाचितां एक मास तेरा दिन ॥ शुद्ध चित्त करूनि ध्यान ॥ ध्यावें सदा समर्थांचें ॥ ५२ ॥ भिक्षान्न मागतां निर्धारीं ॥ पवित्र राहे सदा अंतरीं ॥ षण्मास वाचितां तरी ॥ महाव्याधी दूर होये ॥ ५३ ॥ एक संवत्सर अनुष्ठान ॥ वटच्छायेसी करितां जाण ॥ तयासी होईल पुत्रसंतान ॥ वचन सत्य समर्थांचें ॥ ५४ ॥ तेरामासीं जोडे धन ॥ चतुर्दशमासीं लक्ष्मीवंत जाण ॥ प्रेमभावें करितां अनुष्ठान ॥ सत्य वचन निर्धारें ॥ ५५ ॥ वटपूजा आवाडी पूर्ण ॥ तेथेंचि पादुका स्थापून ॥ प्रेमभावें करितां अनुष्ठान ॥ मनोरथ पूर्ण होतील ॥ ५६ ॥ कलियुगीं तारक निर्धारीं ॥ स्वामी माझा सगुण अवतारी ॥ जग तारावया निर्धारीं ॥ सृष्टीवरी पैं आला ॥ ५७ ॥ तरी सदा सादर मन ॥ ठेवूनि वंदा

आतां चरण ॥ पुढें न मिळे ऐसें निधान ॥ मायाबंधन तोडावया ॥ ५८ ॥ नाम घेतां निर्धारीं ॥ स्वामी माझा कैवारी ॥ भवामाजीं पार करी ॥ वचन निर्धारीं सत्य हें ॥ ५९ ॥ आनंद म्हणे तरी आतां ॥ स्वामिराया जी समर्था ॥ भक्तवत्सला कृपावंता ॥ वाचितां भवव्यथा चुकवावी ॥ ६० ॥ हाचि देऊनि प्रथम वर ॥ भक्तपंथ वाढवावा निर्धार ॥ आणिक कांहीं मागणें साचार ॥ तुजपाशीं दयाळा ॥ ६१ ॥ परोपकार हाचि एक ॥ तुझ्या नामें तारावे लोक ॥ आणिक मागणें तें कौतुक ॥ नाहीं नाहीं सर्वथा ॥ ६२ ॥ विश्वकर्ता विश्वाकारी ॥ विश्वरूप तूंचि निर्धारीं ॥ चालविता तुजवीण तरी ॥ कोण आहे दयाळा ॥ ६३ ॥ तूंचि सर्व सुखदायक ॥ तूंचि कृपानायक ॥ तुजवांचूनि जगा तारक ॥ नाहीं कोणी सर्वथा ॥ ६४ ॥ आतां न करीं निष्ठुर चित्ता ॥ माय जाणे बालकाची व्यथा ॥ तुजवांचूनि अन्य सर्वथा ॥ माय दुजी न जाणों ॥ ६५ ॥ तूंचि मातापिता सर्वेश्वरू ॥ जगतारक जगद्गुरू ॥ नको नको अव्हेरूं लेंकरूं ॥ दीना उदारू तूं एक ॥ ६६ ॥ दीनदयाघन नाम ॥ तुमचें असे हो उत्तम ॥ जग तारावया कारण ॥ स्वामीसमर्थ धरियेलें ॥ ६७ ॥ महापूर बोरी


पायीं उतरला ॥ मैंदर्गीहुनी येतां सोहळा देखिला ॥ अक्कलकोटस्थ जनीं डोळां पाहिला ॥ अघटित लीला समर्थांची ॥ ६८ ॥ प्रेत उंदीर सजीव केला ॥ मुक्यासी वाचा देऊनि बोलविला ॥ अंधासी रत्नें पारखविला ॥ अघटित लीला जगीं तुझी ॥ ६९ ॥ अघटित केले चमत्कार ॥ किती लिहावें साचार ॥ ग्रंथ वाढेल निर्धार ॥ या भेणें सादर लेखणी आवरिली ॥७०॥ स्वामिचरित्र ग्रंथ निर्धार ॥ पुढें स्वामिराज बोलवील सादर ॥ भक्त तारावया निर्धार ॥ कलिजोर मोडोनियां ॥ ७१ ॥ म्हणूनियां आतां लघु-चरित्र ॥ स्वामिनाम नामाचें स्तोत्र ॥ जग तारावया पवित्र ॥ लघु स्तोत्र वर्णिलें ॥ ७२ ॥ अक्कलकोटीं बहु लीला ॥ ज्यानें दाखविली अघटित कळा ॥ कोटि-मदनाचा पुतळा ॥ स्वरूपीं जयाच्या तुळेना ॥ ७३ ॥ बहुवर्षें एकभूमी वस्ती ॥ एकविचार एकस्थिति ॥ अघटित-रूप तें निश्चिती ॥ जगतालागीं तारावया ॥ ७४ ॥ हे निर्जीव पाटावरी ॥ पादुका उठल्या कलीमाझारीं ॥ अजूनि भुली कैशी जगांतरीं ॥ तरणोपाया चुकती हे ॥ ७५ ॥ नाम घेतां प्रेमलहरी ॥ हृदय शुद्ध आधीं करीं ॥ दया ठेवूनि अंतरीं ॥ वाचा निर्धारीं स्वामिलीले ॥ ७६ ॥

स्वामिपादुकापूजन ॥ नामस्तोत्रभजन ॥ तेणें वंश उद्धरे जाण ॥ कलीमाझारीं निर्धारें ॥ ७७ ॥ म्हणूनियां आतां ॥ स्वामिनाम आठवावें सर्वथा ॥ तयाविण अन्य त्राता ॥ तारक नाहीं जगांत ॥ ७८ ॥ अहा सुंदरस्वरूपनिधान ॥ अहा भक्तवत्सल अगम्य ध्यान ॥ सच्चिदानंद आनंदघन ॥ स्वामी माझा दयाळू ॥ ७९ ॥ या प्रपंचमोहाचे कांठीं ॥ बुडोनियां जातां रे निकटीं ॥ तुम्हां तरावया सुलभ गोष्टी ॥ स्वामिनाम पोटीं धरा ॥ ८० ॥ स्वामिनामाचा प्रताप ॥ पाप जाळूनि करी राख ॥ अपूर्व दाविलें कौतुक ॥ कलीमाजीं तरावया ॥ ८१ ॥ तरी आतां शुद्ध करूनि मन ॥ हेंचि जाण संध्यास्नान ॥ दया क्षमा शांति पूर्ण ॥ गुणवर्णन समर्थांचें ॥ ८२ ॥ खोट्याचा जाणूनि पसारा ॥ तोडीं तोडीं मायेच्या व्यवहारा ॥ न भुलें ह्या दुर्गतीच्या बाजारा ॥ मोहपसारा दूर करोनि ॥ ८३ ॥ मूळबिंदु हा प्रमाण ॥ तेथोनि वाढविता कोण ॥ कोणी केलें हो रक्षण ॥ पिंडालागीं जाण पां ॥ ८४ ॥ कैंची माया कैंचा मोह ॥ कोठें आहे तुझा ठाव ॥ तो आधीं शोधूनि पहा हो ॥ भुलूं नको मानवा ॥ ८५ ॥ मूळ बिंदुरूप प्रमाण ॥ देह झाला बीजा कारण ॥ वाढवोनि करचरण ॥ दीनानाथें अर्पिलें

॥ ८६ ॥ तेथें झाली जीवशिवांची वस्ती ॥ तीन गुण
गुणांची प्राप्ती ॥ सहा विकारांची स्थिति ॥ मायासंगती
खेळोनियां ॥ ८७ ॥ दया क्षमा शांति विचार ॥ विवेक
ज्ञान जागृतिसाचार ॥ अविद्येची गति निर्धार ॥ सोडोनि
भवपार करीतसे ॥ ८८ ॥ धरितां स्वामीनांवाची आवडी ॥
घेतां भवामाजीं घाली उडी ॥ नेवोनि भक्तां पैलथडी ॥
पार करी दयाळू ॥ ८९ ॥ नाम जगीं तारक ॥ काय सांगूं
नामाचें कौतुक ॥ नामें तारिले कितीएक ॥ महापापी
कलियुगीं ॥ ९० ॥ नाम घेतां संकट हरे ॥ वारी केल्या
पाप सरे ॥ सेवा करितां भावांत तरे ॥ चुकती फेरे
चौऱ्यांयशींचे ॥ ९१ ॥ अक्कलकोटीं न जातां तरी ॥ वट-
छायेसी अनुष्ठान करी ॥ तयासी तारक निर्धारीं ॥ दृष्टांत-
रूपें स्वामी माझा ॥ ९२ ॥ स्वामींची मूर्ति मनोहर ॥
प्रेमें घेऊनि शयन्यावर ॥ भावें मांडोनि गादीवर ॥ पूजन
करावें प्रेमभावें ॥ ९३ ॥ भजनपूजनाच्या रीती ॥ कली-
माजीं जग उद्धरती ॥ प्रेमा ठेवूनियां चित्तीं ॥ स्वामी
कृपामूर्ति आठवावा ॥ ९४ ॥ काय न करी श्रीगुरुनाथ ॥
सत्य होतां शरणागत ॥ भक्ततारक अवतार समर्थ ॥ कलि-
युगीं यथार्थ प्रकटला ॥ ९५ ॥ विश्वव्यापक विश्वंभरू ॥

त्यासी कैंची समाधी निर्धारू ॥ जगीं जगप्रकार दाखविणें साचारू ॥ लीला थोर समर्थांची ॥ ९६ ॥ द्वैत नाहीं तिळभरी ॥ आशा कैंची अंतरीं ॥ योगमाया दवडिली दुरी ॥ अवतार निर्धारीं स्वामी माझा ॥ ९७ ॥ भक्तां-कारणें अक्कलकोटीं ॥ वास केला हो निकटीं ॥ पाय दावूनियां सृष्टीं ॥ पतितोद्धार करविला ॥ ९८ ॥ अघटित कळा अघटित लीला ॥ पूर्णतेज तेजाचा पुतळा ॥ अगम्य ज्याची अवतारलीला ॥ कलीचा सोहळा मोडावया ॥९९ ॥ तरी नामाची संगती ॥ प्रेम ठेवूनि सदा चित्तीं ॥ स्वामी आठवा दिवसरात्रीं ॥ भवामाजीं तरावया ॥ १०० ॥ स्वामीनामाचा सोहळा ॥ धाक पडे कळिकाळा ॥ निज-दासांसी सांभाळी वेळोवेळां ॥ अवतारसोहळा करूनियां ॥ १०१ ॥ कलीमाजीं तारक ॥ भक्तांसी एकचि नाम देख ॥ स्वामिरायाविणें कौतुक ॥ आणिक नको सर्वथा ॥ १०२ ॥ स्वामीनामाचें कीर्तन ॥ सप्रेमें पादुकापूजन ॥ करितां कलीमाजीं जाण ॥ जन उद्धरे निर्धारें ॥ १०३ ॥ स्वामी पंथ तारक ॥ भव नाशील हा सत्य देख ॥ कली-माजीं जगतारक ॥ परम सुखदायक उद्भवला ॥ १०४ ॥ म्हणूनि जनीं आपुल्या हिता ॥ शरण जावें श्रीगुरुनाथा ॥

मुखीं धरोनि स्वामिवार्ता ॥ जन्मव्यथा चुकवावी ॥१०५॥ ऐसी भुललिया सोय ॥ पुढें नाहीं रे उपाय ॥ भवाचा हा भय ॥ दूर कराया निर्धारीं ॥ १०६ ॥ तरी सुंदर मानवाची काया ॥ नेवोनि लावा स्वामी पाया ॥ सुखें निवारा भवभया ॥ मोहमाया तोडोनियां ॥ १०७ ॥ समर्थें दिधलें अभय वचन ॥ जो हें स्तोत्र करील पठण ॥ तयाचे मनोरथ पूर्ण ॥ होतील जाण मज कृपें ॥ १०८ ॥ येथें धरितां संशय ॥ तयासी भवामाजीं भय ॥ पुढें नाहीं ऐशी सोय ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ १०९ ॥ हें लघुस्तोत्र समर्थांचें ॥ मनोभावें करितां पठन याचें ॥ अर्थ पूर्ण होतील अर्थि-कांचे ॥ परमार्थकांसी मोक्षपद ॥ ११० ॥ आनंद म्हणे तरी आतां ॥ स्वामीचरणीं ठेवूनि प्रीति सर्वथा ॥ प्रेमभावें स्तोत्र गातां ॥ मोक्ष हाता येईल ॥ १११ ॥ श्रीस्वामी-प्रार्थनास्तोत्र ॥ हें जगतारक पवित्र ॥ जपामाजीं महामंत्र ॥ अर्थ सादर पुरवावया ॥ ११२ ॥ इति श्रीसद्गुरुस्वामी-चरणारविंदार्पणमस्तु ॥ राजाधिराज योगिराज श्रीस्वामी-समर्थ महाराजकी जय ॥ श्रीरस्तु ॥ शुभं भवतु ॥



श्रीअक्कलकोटस्वामीमहाराजांच्या पालखींतील पादुका.

॥ अथ आत्मबोधगीताप्रारंभः ॥

॥ अध्याय १ ॥

॥ श्रीसद्गुरुदत्तात्रेयाय नमः ॥

श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥ आदीं आदरोनि श्रीगुरुस्तवराज ॥ ही निर्मिली बोधगीता सहज ॥ ती भाविकां जहाज ॥ भवामाजीं जाणिजे ॥ १ ॥ दीनवत्सल दीननाथ ॥ भक्तवत्सल तूं समर्थ ॥ तूं पुरविता आर्त ॥ निजबाळकाचें ॥ २ ॥ जे जे शरण तुज जाती ॥ त्यांसी स्फुरे वाचस्पती ॥ ते म्हणविले बृहस्पती ॥ तुझिया तेजें ॥ ३ ॥ तुझें नाम जडा तारी ॥ तूं श्रीगुरु निराकारी ॥ संभवें वेद आकारी ॥ तुजलागीं बोलिले ॥ ४ ॥ तुज स्तवावया ॥ शक्तिक्षीण झाली ब्रह्ममाया ॥ तरी अज्ञ पाडसा या ॥ कैशा उपाया बोलवेल ॥ ५ ॥ अहा जी दीनवत्सला ॥ श्रीगुरुराय तारक तूंचि भला ॥ आत्मा तव पदीं रंगला ॥ निजछंदें ॥ ६ ॥ तुज वाहिली जिव्हा ॥ ती न धरी अन्यभावा ॥ परमार्थ मज न ठावा ॥ आणिक दुजा ॥ ७ ॥ पर व्यापिलें ब्रह्म ॥ प्रकृती स्फूर्ति माया

तुझीच जाण ॥ तें हें अचल ठाण ॥ ब्रह्मादिकां नेणवे ॥ ८ ॥ परी बाळकाचे बागुडे बोल ॥ प्रेमें माय मानी अमोल ॥ तैसे मज बोलवितां बोल ॥ आपुल्या कृपें ॥ ९ ॥ तरी अहंमति अभाव ॥ येथें सरलेंचि वैभव ॥ त्वत्पदीं जडला भाव ॥ विश्ववैभव देखिलें ॥ १० ॥ ही आनंदनाथाची वाणी ॥ बोधगीतेची ध्वनी ॥ खरी तारक निशाणी ॥ भवीं जडजीवां ॥ ११ ॥ इति प्रथमाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय २ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

आनंद म्हणे श्रीगुरुताता ॥ मायबापा जी समर्था ॥ पुरवीं पुरवीं मनोरथा ॥ कृपावंता दयाळा ॥ १ ॥ मी जोडीतसें कर ॥ वेद पायींचे किंकर ॥ जो ब्रह्म साकार ॥ आकारें रंगवे ॥ २ ॥ तरी मज पुसणें किती ॥ जें जड पडलें श्रुती ॥ तें तुज निश्चिती ॥ सकरुण वृत्ती पुसतसें ॥ ३ ॥ स्फूर्ति स्फुरविता कोण ॥ सांग तुजवांचून ॥ प्रश्न हा आपण ॥ आपणा पैं करविला ॥ ४ ॥ जें मनासी न

कळे ॥ तें ब्रह्म कैसें कळे ॥ योगियां आकळे ॥ कवणे-परी ॥ ५ ॥ जैं स्फूर्ति विरूनि जाये ॥ तैं तोचि ब्रह्म होये ॥ ज्ञानयोगें पाहे ॥ निजानंदा ॥ ६ ॥ जें अविकारें रंगलें ॥ तें शुद्धतत्त्वीं मिसळलें ॥ निजबोधें जाहलें ॥ ब्रह्मचि तें ॥ ७ ॥ भ्रमाविरहित जाहलें ॥ तेंचि ब्रह्म नटलें ॥ ब्रह्म बोलविलें ॥ निजछंदें ॥ ८ ॥ भ्रमविरहित आकारु ॥ तेंचि ब्रह्म निराकारु ॥ जें व्यापिलें अंतरु ॥ भ्रमा आड करूनि ॥ ९ ॥ ब्रह्म तें सत्य ॥ जें विषमरहित ॥ समही वर्तत ॥ सर्वांभूतीं ॥ १० ॥ तरी ब्रह्मीं ब्रह्मविचार ॥ ज्ञानी जाणुनी सारासार ॥ तें घेऊनि निर्धार ॥ निजानंदें डुलती ॥ ११ ॥ ही आनंदनाथाची वाणी ॥ गीताबोध निर्वाणीं ॥ ठेविली कलींत निशाणी ॥ जगालागीं तारावया ॥ १२ ॥ इति द्वितीयाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु॥

॥ अध्याय ३ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

आदीं नमूनि श्रीगुरुचरणांप्रती ॥ आनंदसद्भाव प्रीति ॥ जे तुम्हीं उद्भविली स्फूर्ति ॥ तें तुम्हांप्रती पुसतसें ॥ १ ॥ अहा जी गुरुराया ॥ कैसी केली विश्वमाया ॥ पंचमहाभूतें

पाया ॥ कवणें उपाया रचियेलीं ॥ २ ॥ मूळ कोठूनि आकारु ॥ कैसें केलें चराचरु ॥ कवण मायेचा विस्तारु ॥ सांगा मजप्रती दयाळा ॥ ३ ॥ तंव बोलिला श्रीगुरुराणा ॥ ऐक लेंकरा विचक्षणा ॥ त्वां प्रश्न केला तो माझिया मना ॥ आल्हादरूपें उचंबळी ॥ ४ ॥ अवघा माझाचि विस्तारु ॥ वेद मज म्हणती गुरु ॥ म्यां व्यापिलें चराचरु ॥ निजप्रभेंकरूनियां ॥ ५ ॥ माझ्या आंगींची विभूती ॥ पंचमहाभूतांची स्थिती ॥ तो मी अतर्क्य निश्चितीं ॥ प्रेमाविण जाणावया ॥ ६ ॥ प्रेमेंचि जाणती ज्ञानी ॥ जे मज भजती सत्त्वगुणी ॥ ते माझें रूप होऊनी ॥ मजमाजीं खेळती ॥ ७ ॥ माझ्या उदरअंडामाजीं ॥ ब्रह्मांडें रचिलीं सहजीं ॥ तीं मज जाणती गुर्जी ॥ आत्मस्थिती ओळखुनी ॥ ८ ॥ तरी पांच तत्त्वांचा आकारु ॥ माझिया शरीराचा भारु ॥ तेही न पावती पारु ॥ माझिया रूपाचा ॥ ९ ॥ तो मी मूळगुरु ॥ अवघा माझे मायेचा विस्तारु ॥ म्यांच व्यापिलें चराचरु ॥ हें त्वां निर्धारु जाणिंजे ॥ १० ॥ आनंद म्हणे गीतासार ॥ बोध प्रेमाचा आधार ॥ जें व्यापिलें निराकार ॥ ब्रह्म आकार सारावया ॥ ११ ॥

इति तृतीयाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ४ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

ॐ नमो जी श्रीगुरुनाथा ॥ भक्तवत्सला समर्था ॥ तव पदीं ठेवोनि माथा ॥ पुसतसें ताता तुजलागीं ॥ १ ॥ जरी अवघा तुमचाचि संभारु ॥ तरी द्वयपणाचा कां व्यवहारु ॥ मीतूंपणें नरु ॥ कवण्या कार्जी भुलविले ॥ २ ॥ तंव बोलिले श्रीगुरु ॥ ऐक लेंकरा विस्तारु ॥ तुज सांगतसें निर्धारु ॥ गुज जें बीजींचें ॥ ३ ॥ म्यां बीज केलें निर्माण ॥ विस्तार वाढविला मायेच्या कारण ॥ कीं स्फूर्ति माया मजपासून ॥ मजमाजीं नटविली ॥ ४ ॥ दीपाअंगीं प्रभा जाहली ॥ ती ज्योतीमाजींच रमली ॥ परी जीवा भ्रांतीच पडली ॥ प्रभा मानिली प्रमाण ॥ ५ ॥ तिच्यापाठीं लागले जीव ॥ तेंच भ्रांतीचें वैभव ॥ मोहाचें लाघव ॥ पुढें दावी जगातें ॥ ६ ॥ तेणेंचि घडे येरझार ॥ जन्म घेणें नाना अपार ॥ अवघा भोग भ्रांतीचा विस्तार ॥ निज जीवा-लागोनी ॥ ७ ॥ जो मजचि पाहे ॥ मजमाजीं मुरुनि राहे ॥ तो प्रभा-भ्रांतीच्या संदेहें ॥ न सांपडे कदाकाळीं ॥ ८ ॥ जैसी वाती ज्योतीमाजीं मिळाली ॥ ज्योतीचि

होऊनि ठेली ॥ तैसी भ्रांती ज्याची उडाली ॥ तें रूप माझेंचि जाणिजे ॥ ९ ॥ माया मानीव भ्रांती ॥ ही ज्याणें जिरविली स्फूर्ति ॥ तोचि ब्रह्म निश्चितीं ॥ आपणा आपण देखावया ॥ १० ॥ आनंद म्हणे विस्तार ॥ प्रेमें बोलविला गीतासार ॥ ज्याचा लघु आकार ॥ जीवा आधार भवामाजीं ॥ ११ ॥ इति चतुर्थोध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरु-स्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ५ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

श्रीगुरवे नमः ॥ आनंद म्हणे श्रीगुरुनाथा ॥ भक्तवत्सला समर्था ॥ मज सांगा जी ताता ॥ जो संशयभावार्थ उदेला ॥ १ ॥ जरी तुझी स्फूर्ति माया नटली ॥ तरी तुज-विरुद्ध कां वागली ॥ ही भ्रांती कैशी पडली ॥ तुजलागीं ॥ २ ॥ हें मज सांगुनी निगुती ॥ मज समाधान करावें चित्तीं ॥ ऐका ऐका जी विनंती ॥ विनवितों प्रीतिभावेंसीं ॥ ३ ॥ तेव्हां बोलिले श्रीगुरु दयाळ ॥ तूं केवळ माझें लडिवाळ ॥ तुझी पुरविणें आळ ॥ मज सर्वकाळ पडतसे ॥ ४ ॥ माझी माया मजविरुद्ध नसे ॥ परी जीवा

लावीतसे पिसें ॥ भोगवी भ्रमदशे ॥ आपुलिया कर्में ॥ ५ ॥ ग्रेमें जाणिजे दीपातें ॥ तसें मायेनें ओळखिजे मातें ॥ तें नेणोनि जीव भ्रमातें ॥ मायेपाठीं लागत ॥ ६ ॥ जो मायेसी भुलला ॥ मायेनें तयासी भ्रमविला ॥ अंधारीं लोटूनि दिला ॥ अज्ञान म्हणोनी ॥ ७ ॥ म्हणोनि माया मृगजलवत जाणणें ॥ मजचि प्रमाण मानणें ॥ मजमाजीं मुरवणें ॥ मीपणा सोडूनियां ॥ ८ ॥ जीवाचा मीपणा हरला ॥ तो मायेपासूनि निसरला ॥ माझिया स्वरूपीं लागला ॥ निजसुखा ॥ ९ ॥ माया मीपणें व्यापिली ॥ द्वयपणासीं ठेली ॥ मोहलीला चालविली ॥ खेळ व्यवहारू ॥ १० ॥ आनंद म्हणे गीतासार ॥ याचा करणें विचार ॥ तो होईल भवपार ॥ मायाव्यवहार जाणोनी ॥ ११ ॥ इति पंचमाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ६ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

भावें चरणीं ठेवूनि माथा ॥ आनंद म्हणे श्रीगुरुनाथा ॥ भक्तवत्सला जी समर्था ॥ सांगें ताता मजलागीं ॥ १ ॥ उपजतांचि जीव भ्रांतींत पडे ॥ तयासी ज्ञान कैसें जोडे ॥

नें काय करील बापुडें ॥ आपुल्या कर्मबंधातें ॥ २ ॥
त्यासी कैसी करावी योजना ॥ जीव कैसा जागेल आत्म-
खुणा ॥ कैसी चुकेल भ्रमणा ॥ त्याची सांगा जी ॥ ३ ॥
जीव मूढत्वें भरला ॥ वरी मायेनें व्यापिला ॥ शुद्ध अंधारीं
पडला ॥ त्याणें तुज कैसें जाणावें ॥ ४ ॥ तुज याचा
सांगतों प्रकारू ॥ जेणें स्थिरावे अंतरू ॥ आत्मसिद्धी
सारासारू ॥ तें सिद्धी जाणिजे ॥ ५ ॥ विवेकें जोडिजे
ज्ञान ॥ ज्ञानें पाविजे विज्ञान ॥ विज्ञानातें समरूप जाण ॥
माझिया स्वरूपाचें ॥ ६ ॥ तें मज जाणावया ॥ स्फूर्ति
स्फुरे ब्रह्ममाया ॥ तेथोनि रचिला पाया ॥ उलटदृष्टीचा
॥ ७ ॥ उलटदृष्टीचें पाहणें ॥ मजमाजींच मज जाणणें ॥
आपण हें विसरणें ॥ अहंभावातें ॥ ८ ॥ जेव्हां आपण
आपणा विसरे ॥ तेव्हां अभिमान सहज सरे ॥ मग तो
मजमाजीं सुरे ॥ ब्रह्मसुख भोगावया ॥ ९ ॥ सत्त्वगुणाचा
अंगिकार ॥ तेथोनि माझाचि विस्तार ॥ त्याचा ज्याणें धरिला
पदर ॥ तो भवपार होईल ॥ १० ॥ आनंद म्हणे हो
विचारखाणी ॥ गीता-बोधरत्नें निघती जेथुनी ॥ ते आदरें
लेईजे जनीं ॥ जीव कर्मबंधनीं चुकवाया ॥ ११ ॥
इति षष्ठाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ७ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

अहा जी सर्वातीता ॥ मायातीता अपरिमिता ॥ तुज नमिलें समर्था ॥ श्रीगुरुताता दयाळा ॥ १ ॥ आनंद म्हणे करुणाघना ॥ माझें पुसणें आणावें मना ॥ बाळ विनवी लडिवाळ ताना ॥ माझी करुणा येऊं दे ॥ २ ॥ अहंभाव मी कारण ॥ हें कां जी केलें निर्माण ॥ जरी तूं होसी परिपूर्ण ॥ तरी भावना भिन्न किंनिमित्त ॥ ३ ॥ याचा करूनि उलगडा ॥ माझ्या मनाचा बांधिजे धडा ॥ सोहं-स्फूर्तीचा गाडा ॥ कवण्यापरी वर्तविला ॥ ४ ॥ तंव बोले श्रीगुरु दयाळ ॥ तुझी पुरवितों आळ ॥ मी माय कनवाळ ॥ म्हणविली ॥ ५ ॥ अहंभाव माझाचि गुण ॥ तो निर्मिला व्यवहाराकारण ॥ जेणें जोडे समाधान ॥ विश्वमायेचें ॥ ६ ॥ हा नटला व्यवहार ॥ याचा चालवावया भार ॥ राखिला अहंकार ॥ त्या गुणें ॥ ७ ॥ याचा हाचि गळाला ॥ मग अहंकार कैसा उरला ॥ जो स्वरूपीं मुरला ॥ माझिया गुणांतें ॥ ८ ॥ मीपण जैं सरे ॥ तैं व्यवहार कैसा उरे ॥ मग तो सहजचि मुरे ॥ माझिया स्वरूपीं ॥ ९ ॥ अहंभाव अहंकार ॥ हा मृगजल मायाव्यवहार ॥ परी जो शुद्ध

जहाला नर ॥ तो मजमाजींच डुलतो ॥ १० ॥ आनंद म्हणे अद्भुत वाणी ॥ बोलियली कलींत निशाणी ॥ जें सुख न लाधे निरंजनीं ॥ तें जनीं दावियलें ॥ ११ ॥ इति सप्तमाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ८ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

अहा जी श्रीगुरुनाथा ॥ भक्तवत्सला समर्था ॥ तव पदीं ठेवूनि माथा ॥ पुसतसें ताता तुजलागीं ॥ १ ॥ जग हें भ्रांतीअंधारीं गर्द झालें ॥ मायामोहें भुलूनि गेलें ॥ आपण आपणा विसरलें ॥ तें कैशापरी तरेल ॥ २ ॥ याचा मज सांगा जी विचार ॥ जें पुसणें उद्भवलें आधार ॥ जरी हा न होई भव पार ॥ तरी अंतरव्यवहार कायसा ॥ ३ ॥ तंव बोले श्रीगुरु दयामूर्ती ॥ ऐक बाळा वाचस्पती ॥ जेथोनि माझी हे स्फूर्ती ॥ तेथोनि जगती उद्भवली ॥ ४ ॥ तंव खेळविलें खेळा ॥ पसरिला विश्वमळा ॥ मत्तत्त्वचि अगोळा ॥ गुणकुळा जोडिलें ॥ ५ ॥ त्या बीजसंभवा भाव मीच ॥ अणुरेणुप्रमाण साच ॥ व्यापूनियां व्यापक हाच ॥ निजआत्मीं रंगला ॥ ६ ॥ परी शून्यशून्या अंधकार ॥ वेगळे योजिले प्रकार ॥ जे संभव

संभवती भार ॥ आपुलिया कर्में ॥ ७ ॥ जंव अहंपणासी जडे ॥ तंव मायेचें सर्व कोडें ॥ मोहाचें हें वेडें ॥ भोगी सदा कर्म-जन्मा ॥ ८ ॥ जंव मी माझें विसरला ॥ तोचि कर्मासी सरला ॥ जिवंत असुनी उरला ॥ निजबोधतत्त्वासी ॥ ९ ॥ बोधोनियां बोध ॥ आत्मयोगांचा हा शोध ॥ तेथें जोडिल्या आमोद ॥ मग ब्रह्मानंद सहज घडे ॥ १० ॥ आनंद म्हणे निर्धारू ॥ गीताबोध हा सारू ॥ जें आकारीं आकारू ॥ व्यापक निराकारू बोलविलें ॥ ११ ॥ इति अष्टमाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ९ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

जयजयाजी श्रीगुरुराया ॥ भक्तवत्सला करुणालया ॥ माझें पुसणें इतुकेंचि पाया ॥ श्रवणार्त होऊनियां ॥ १ ॥ तूं कृपावंत कृपाळू होसी ॥ माझे मनोरथ पुरविसी ॥ समाधान करिसी ॥ निजछंदें ॥ २ ॥ हा स्थिर चर रचिला भारू ॥ अनेक रूपीं अनेक आकारू ॥ भिन्न भिन्न व्यवहारू ॥ वर्तविला निर्धारू कवणे परी ॥ ३ ॥ ही कैशी केली मांडणी ॥ कवण मूळ यालागुनी ॥ उत्पत्ति स्थिति

संहार करणे गुणीं ॥ होतसे सांगावें जी दातारा ॥ ४ ॥ तंव बोलिले श्रीगुरुराज ॥ ऐक सांगतों तुज गुज ॥ जें मूळतत्त्वांचें बीज ॥ ब्रह्म सहज व्यापिलें ॥ ५ ॥ मजमाजीं स्फूर्ति माया निर्मिली ॥ आकारीं सृष्टी पैदा केली ॥ माझ्या अंगभूतें व्यापिली ॥ ब्रह्मछाया ॥ ६ ॥ अहंबीजाचिया कारणीं ॥ बीज संभवे मीच जनीं ॥ तो आकारें रंगवुनी ॥ ब्रह्मसृष्टी निर्मिली ॥ ७ ॥ धरा पर्वत नद्या सागर ॥ हा अवघा माझाचि विस्तार ॥ वायु आकाश संभार ॥ तेजस्वरूपीं निर्मिलीं ॥ ८ ॥ ऐसा करूनि सर्वसंभारू ॥ माझ्या मायेंत वर्तविला आकारू ॥ तो ब्रह्मविश्व गोलाकारू ॥ अवघें चराचरू मीचि पाहें ॥ ९ ॥ जंव मजमाजीं मज पाहासी ॥ तंव समाधी न पावसी ॥ मग विश्राम होसी ॥ जीवशिवांतें ॥ १० ॥ आनंद म्हणे निरोपिलें ॥ जें सूक्ष्मबीज भलें ॥ जें समाधान पावलें ॥ आत्मसिद्धी ॥ ११ ॥ इति नवमाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १० ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

जयजयाजी श्रीगुरुराया ॥ भक्तवत्सला करुणालया ॥ माझें पुसणें इतुकेंच पाया ॥ संशयभया हरावया ॥ १ ॥

जरी अवघें चराचरीं ब्रह्म व्यापिलें ॥ आत्माचि सर्वां भूतीं संचरलें ॥ जें तन्मय ऐक्य जाहलें ॥ वेगळें राहिलें तें काय ॥ २ ॥ त्याचा करूनि उलगडा ॥ मज सांगावा निवाडा ॥ जो तारक होई सजडा ॥ भवामाझारी ॥ ३ ॥ तंव बोलिला श्रीगुरुराव ॥ तुझा फेडितों संशयभाव ॥ जो तुज जाहला स्वभाव ॥ ब्रह्मभुलीचा ॥ ४ ॥ आत्मा तोचि आत्माराम ॥ परमात्मा स्वयं ब्रह्म ॥ हेंचि वेगळें वर्म ॥ भाविकालागीं भजावया ॥५॥ मी परिपूर्णत्वें भरलों ॥ परि अपरिमितें वेगळा राहिलों ॥ ते सूक्ष्मीं जाणवलों ॥ आत्मबोधा ॥ ६ ॥ मी सर्वां भूतांचा निर्मिता ॥ परी माझी वेगळीच सत्ता ॥ माझी माया अपरिमिता ॥ भुलविते सत्ता जीवाची ॥ ७ ॥ तो मी परेशीं ध्याइंजे ॥ आत्मींच मज ओळखूनि घेइंजे ॥ मग अवघेंचि तूंपण जिरविंजे ॥ मीपणही सारिजे तयामाझारीं ॥ ८ ॥ जरी मी वेगळा जाहलों ॥ तरी नामेंचि सामावलों ॥ तोही आत्मीं रंगलों ॥ परमात्मभावें ॥ ९ ॥ तरी मी कर्ता हा तुटे अभिमान ॥ तेव्हांचि जिरला अहंकारकारण ॥ मग मन मुरलें उन्मनीलागुन ॥ जाहलें समाधान ठाईं ठाईं ॥ १० ॥ आनंद म्हणे ही बोधसार ॥

गीता नामाचा उच्चार ॥ अन्वयबोधें सूक्ष्मसार ॥ प्रेमें उच्चार बोलविले ॥ ११ ॥ इति दशमाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय ११ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

आनंद म्हणे श्रीगुरु सदया ॥ भक्तवत्सला करुणालया ॥ मज इतुकें सांगा जी अद्वया ॥ आत्म तें काय ॥ १ ॥ आत्मीचा कैसा आकारू ॥ स्वरूप तें निराधारू ॥ कवण रंगीं भारू ॥ त्याचा सदा वर्तत ॥ २ ॥ श्रीगुरु बोलिले परम प्रीती ॥ ऐक बाळा निगुती ॥ जें त्वां पुसिलें निश्चितीं ॥ जगाचिया हिताकारणें ॥ ३ ॥ आत्म तें शुद्ध सत्य ॥ जें वसे हृदयस्थ ॥ ज्याचा आकार स्वस्थ ॥ स्वरूपानंदीं ॥ ४ ॥ जें आकारावेगळें ॥ तें सर्वां सर्वीं मिळे ॥ तोय जैसें प्रवाहबळें ॥ आपुलिया छंदें ॥ ५ ॥ तैसें आत्म जाणिजे ॥ सत्या पैं ओळखिजे ॥ जें शुद्ध तत्त्वीं गोविजे ॥ आपणा आपणचि ॥ ६ ॥ शुद्धरंगींच जें रंगे ॥ चिन्मय-ब्रह्मीं सदा वागे ॥ प्रवृत्तींत नसे जागें ॥ स्थित आनंदें ॥ ७ ॥ सत्यापरतें आत्म नसे ॥ जें सदा आनंदेंचि

विलसे ॥ जें ब्रह्म दिसे ॥ चराचरगोचरीं ॥ ८ ॥ तेथें मारुनि दडी ॥ सहज व्हावें भ्रमाचे पैलथडी ॥ भवादिक बापुडीं ॥ काय तेथें ॥ ९ ॥ जंव शुद्धानंद नाकळे ॥ तंव बोधानंद कैसा कळे ॥ वृत्तिआनंद तो मिळे ॥ कवण्या परी ॥ १० ॥ आनंद म्हणे निजखूण ॥ कळींत वचन प्रमाण ॥ तारक जें निरंजन ॥ तें सूक्ष्म ध्यानीं आणियलें ॥ ११ ॥ इति एकादशाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामी-समर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १२ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

आनंद म्हणे श्रीगुरुनाथा ॥ मज सांगावें समर्था ॥ जें पुसणें उद्भवलें माझ्या चित्ता ॥ त्याची शांतता करींजे ॥ १ ॥ सत्यानंदेंचि आत्म ध्याइलें ॥ तें परमात्मीं स्थित झालें ॥ मग ज्ञानासी काय राहिलें ॥ सांगा जी ॥ २ ॥ जरी आत्म परमात्मीं विरूनि गेलें ॥ तरी पूर्णानंदचि ज्ञान उदेलें ॥ स्वरूपीं जें जागलें ॥ निजछंदें ॥ ३ ॥ तेंचि ज्ञान गोजिरें ॥ जें चिदानंदीं सदा फिरे ॥ जेथें अहंपणा जिरे ॥ मायावृत्तीचा ॥ ४ ॥ शून्याशून्यीं शून्य जाहलें ॥

परी विश्वरंगासी आकारलें ॥ जें शिवशांतीसी जोडिलें ॥ आत्मसिद्धीं ॥ ५ ॥ तेथें सूक्ष्मीं अंतरगत ॥ जो विचार वागे स्थित ॥ तो नित्यही शोधीत ॥ शुद्धानंदें ॥ ६ ॥ तेथें जें जाहलें समाधान ॥ तेंचि आत्मीचें पूर्णज्ञान ॥ ब्रह्म तें निवडूनि सूक्ष्म ॥ सदानंदें ध्याइंजे ॥ ७ ॥ जंववरी न घडे आत्मशोध ॥ तंववरी काय बोधिला बोध ॥ जोंवरी न पावे आमोद ॥ आपुलिया स्वरूपाचा ॥ ८ ॥ तरी आत्मा सत्य स्थित ॥ हें जाणोनि यथार्थ ॥ ब्रह्म हें निश्चयार्थ ॥ सुखानंदें भोगावें ॥ ९ ॥ ऐसी जाणोनि आत्मखूण ॥ ओळखी सहज आपणा आपण ॥ ब्रह्म तें व्यापून ॥ स्वानंद आत्मीं डुलवी ॥ १० ॥ आनंद म्हणे निगुती ॥ गीताबोध हा वाचिजे अर्थीं ॥ तेचि जाणती परमार्थी ॥ आपुलिया सुखातें ॥ ११ ॥ इति द्वादशाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १३ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

श्रीगुरुराया जी दयाळा ॥ तुजऐसा कोणासी न कळे कळवळा ॥ माझा पुरविला लळा ॥ मायप्रेमेंकरूनि ॥ १ ॥ काय आठवूं उपकार ॥ किती स्मरूं वारंवार ॥ परी हें

चराचर ॥ त्वांचि व्यापियेलें ॥ २ ॥ दया विवेक विचार विज्ञान ॥ यांसंगें जोडे ब्रह्मज्ञान ॥ जे आत्मसिद्धीची खूण ॥ तुज निजबोधें बोधियली ॥ ३ ॥ तेथें सूक्ष्मा गांठोनि गांठी ॥ ब्रह्मानंद वागवी जें हृदयसंपुटीं ॥ जेथें अहंपणाची गोष्टी ॥ न वर्ते कदाकाळीं ॥ ४ ॥ ऐसें केलें समाधान ॥ आत्मा ध्यायिला पूर्ण ॥ तव स्वरूपीं विरून ॥ निजसुखें राहिलों ॥ ५ ॥ आणिक सांगूं काय ॥ व्यवहार-द्वयाचें भय ॥ मीतूंपण हें होय ॥ व्यवहाराअर्थीं ॥ ६ ॥ व्यवहार मायेचें कारण ॥ तेथूनि वेगळी आत्मखूण ॥ त्याचा नसे अभिमान ॥ आपुलिया स्वरूपीं ॥ ७ ॥ जें होणें तेंचि घडे ॥ भोगीं भोगे भोगणें पडे ॥ त्याचें न मानूनि सांकडें ॥ आत्मनिवाडे साधावे ॥ ८ ॥ केल्या कर्मांची उपस्थिती ॥ स्फुरेल कैंची जिरालिया वृत्ती ॥ अभिमान तो चित्तीं ॥ कोठूनि स्फुरेल ॥ ९ ॥ तोचि जाणिजे कर्मातीत ॥ कर्मीं असोनियां स्थित ॥ ब्रह्म तें भोगीत ॥ आपुलिया संगें ॥ १० ॥ ही निजपट्टूची खूण ॥ आनंद बोलिला कारण ॥ जे साधिती आत्मज्ञान ॥ विश्वमाया जिरवुनियां ॥ ११ ॥ इति त्रयोदशाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १४ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

आनंद म्हणे श्रीगुरुनाथा ॥ भक्तवत्सला समर्था ॥ जे पुसणें उद्भवली वार्ता ॥ माझिया स्फूर्तीतें ॥ १ ॥ अवघा गुरुस्वरूपाचा आकारू ॥ चिदानंद तें काय गुरु ॥ याचा मज सांगूनि विस्तारू ॥ संशयभारू हरावा ॥ २ ॥ तंव बोलिला श्रीगुरुराणा ॥ तुज सांगतों मूळबीजींची ही खुणा ॥ जे न कथिली आजवरी कवणा ॥ सूक्ष्म बीज म्हणोनि ॥ ३ ॥ जें शुद्धापासूनि शुद्ध निवडिलें ॥ तें चिदानंदीं ब्रह्म ध्याइलें ॥ जें स्वरूपानंदीं रंगलें ॥ आपणा पैं जाणावया ॥ ४ ॥ माझिया स्वरूपीं जें शुद्ध सत्य निवडिलें ॥ तें पूर्णानंदींच ठेलें ॥ जें प्रवृत्तींत बोलिलें ॥ तें चिदानंदीं बोलिजे ॥ ५ ॥ जें सूक्ष्मासूक्ष्मींचें सूक्ष्म ॥ जें बोधाबोधींचें निगम ॥ जें आत्माआत्मींचें परम ध्यान ॥ तें सूक्ष्मबीजीं गांठिजे ॥ ६ ॥ जंव निवडिया निवडूनि काढिलें ॥ जें स्थिरचरीं रंगलें ॥ परी अविनाशचि ठेलें ॥ मायेसी जाणावया ॥ ७ ॥ शुद्धानंदेंचि चिदानंद जोडे ॥ चिदानंदें ब्रह्मानंद जोडे ॥ मग कैंचें उरलें कोडें ॥ जिवाचें या ॥ ८ ॥ जीवपणासी वितुळलें ॥ ब्रह्म तईंच केलें ॥ उगा

माजविलीं खुळें ॥ भ्रमबोधाचीं ॥ ९ ॥ जैं जैं करावा विचारू ॥ तैं तैं स्थिरावे अंतरू ॥ ब्रह्म देखिलिया चराचरू ॥ मग व्यवहारू आत्मस्थितीचा ॥ १० ॥ आनंद म्हणे निजखूण ॥ ही गीता बोधकारण ॥ तारकनिधान वचन ॥ कलीमाजीं तारावया ॥ ११ ॥ इति चतुर्दशाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १५ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

आनंद म्हणे दिगंबरा ॥ पूर्णव्यापका चराचरा ॥ ब्रह्मादिकां आसरा ॥ तुझिया पदाचा ॥ १ ॥ तो तूं निर्गुण निर्विकारी ॥ ब्रह्म व्यापक चराचरीं ॥ परी जाहलासी सगुण अवतारी ॥ कवणिया निमित्तें ॥ २ ॥ हें मज सांगा जी निधडा ॥ मनाचा करूनि उलगडा ॥ झाडूनि कल्पनेचा झाडा ॥ पुढें पवाडा बोलवा ॥ ३ ॥ तंव बोलिला श्रीगुरुराय ॥ पूर्ण कनवाळू बापमाय ॥ ज्याचा वरद अभय ॥ निजभाविकां ॥ ४ ॥ जरी मी चराचरीं भरलों ॥ तरी मायेनें जीवा शून्य जाहलों ॥ जो असुनी नसलों ॥ भ्रमभ्रांतीकारणें ॥ ५ ॥ म्हणोनि घेणें पडे अवतार ॥

हरावया धरेचा भार ॥ सगुण रूपीं चराचर ॥ ध्यान-धारणें तरतील ॥ ६ ॥ तें भक्तभाविकां तारी ॥ जागा केलिया अंतरीं ॥ ध्यान-धारण हें भवपारीं ॥ सहज उतरी भाविकां ॥ ७ ॥ हेंचि अवताराचें कारण ॥ धर्माचें करणें स्थापन ॥ सत्यातें वाढवून ॥ शुद्ध जगीं राखावया ॥ ८ ॥ जरी हें विश्व मींच केलें निर्माण ॥ तरी अवतार घेणें मज काय कठिण ॥ जो लाविला मळा कारण ॥ रक्षणें पडे लावित्यासी ॥ ९ ॥ ऐसा मज विश्वाच्या कारणें सांभाळ ॥ दुरिताचें करणें निर्मूळ ॥ तोडूनि मोहाचा गोंधळ ॥ भक्तभाविकांचा ॥ १० ॥ आनंद म्हणे हे निजखूण ॥ जी मज कथिली निर्वाण ॥ ती जगाच्या कारण ॥ गीतास्वरूपें ठेविली ॥ ११ ॥ इति पंचदशाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरु-स्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १६ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

आनंद म्हणे श्रीगुरुनाथा ॥ माझें पुसणें इतुकेंचि ताता ॥ हें ऐकावें समर्था ॥ मायबापा गुरुराया ॥ १ ॥ अज्ञान-भ्रांतीनें घेरले जन ॥ जे नेणती कांहींच ज्ञान ॥

जगस्थितीचें कारण ॥ तेंही मना नेणवे ॥ २ ॥ ऐशां कैसें मार्गीं लावावें ॥ तें मज निगुती सांगावें ॥ कीं जडा भवीं तारावें ॥ म्हणुनी येणें तूमचें ॥ ३ ॥ तंव बोलिले श्रीगुरु दयाळ ॥ जे भक्तवत्सल कनवाळ ॥ किती पुरवूं तुझी आळ ॥ तूं लडिवाळ खरें कीं ॥ ४ ॥ तरी एक सांगतों तुजलागीं ॥ जे मार्ग सोडूनि योगी ॥ भक्तीचिया सद्योगीं ॥ सगुणरूपा भजावें ॥ ५ ॥ भक्तिआंगें वैराग्य जडे ॥ तेथूनि परमार्थीचें कोडें ॥ जें पुढें सुगम पडे ॥ आपणा आपण ॥ ६ ॥ वैराग्याआंगीं ज्ञान जाहलें ॥ तें आत्मतेजेंचि रंगलें ॥ ब्रह्म तें देखिलें ॥ आपणा आपण पैं ॥ ७ ॥ तरी सगुणीं भक्ति-आकारू ॥ भजनानंद प्रेम-आधारू ॥ सदयपणें व्यवहारू ॥ विश्वामाजीं वर्तवी ॥ ८ ॥ तैं भक्ति जडे पूर्ण ॥ सहज वैराग्याचें ज्ञान ॥ आत्मयाची खूण ॥ आपेंआप पावती ॥ ९ ॥ म्हणुनी आधीं सगुणीं रत व्हावें ॥ भक्तिभावेंचि भजावें ॥ तेंचि ब्रह्म चराचरीं पहावें ॥ वैराग्य-ज्ञानें ॥ १० ॥ आनंद म्हणे गीतासार ॥ ब्रह्मबोध हाचि व्यवहार ॥ सहजानंदें अरुवार ॥ भवपार करील ॥ ११ ॥

इति षोडशाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १७ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

आनंद म्हणे श्रीगुरुनाथा ॥ मज सांगावें समर्था ॥ पुसणें उद्भवलें माझ्या चित्ता ॥ आतांही संशयानें ॥ १ ॥ त्याचा करूनि निवाडा ॥ आधीं करा कल्पनाझाडा ॥ जेथें समाधानीं न पडे वेढा ॥ संदेहाचा ॥ २ ॥ जरी भजन-भक्तींत ज्ञान जोडे ॥ तरी वनीं कष्टले कां गाढे ॥ घोकुनी वेदाचे पवाडे ॥ फुका श्रम पावले ॥ ३ ॥ अहंमति राहिली जीवा ॥ नाहीं देखिलें प्रेमानंदींच्या वैभवा ॥ मज सांगिजे ऐशियाच्या भावा ॥ कवण उपावा कष्टले ॥ ४ ॥ तंव बोलिले श्रीगुरुराव ॥ त्यासी नाहीं अहंभाव ॥ जें अहंकार-स्फूर्तीचें वैभव ॥ कर्मभाव भोगवी ॥ ५ ॥ जरी ज्ञान तया जडतें ॥ तरी इतुकें कां कष्टतें ॥ यासीच ब्रह्म ना जाणतें ॥ सकरुण होउनी ॥ ६ ॥ तरी भजनाऐसा आनंद ॥ स्वर्गींही नसे आमोद ॥ सत्यपुरीचा भेद ॥ जया छंदें होय पहा ॥ ७ ॥ भजनभक्तीचा अनुभव ॥ भाविक जाणती लाघव ॥ तें बोलतां वाव ॥ पाखंड्यासी पडेल ॥ ८ ॥ सगुण भक्तीचें कारण ॥ तेंचि वैराग्याचें बीज

जाण ॥ जें जोडे आत्मज्ञान ॥ शुद्धतत्त्वाचें ॥ ९ ॥ हें बोधोनि निगुती ॥ आर्धीं लागिजे भक्तिपंथीं ॥ सदय सत्य शुद्धार्थीं ॥ आत्मसिद्धी जोडेल ॥ १० ॥ आनंद म्हणे गीतासार ॥ हा बोलविला लघु विस्तार ॥ याचा करितां विचार ॥ भवपार नर होतील ॥ ११ ॥ इति सप्तदशाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

॥ अध्याय १८ ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमो नमः ॥

श्रीगुरुचरण ध्यातां अनुभवे ॥ जें प्रेम उद्भवलें भावें ॥ तें तारक सद्भावें ॥ विश्वालागीं अर्पिलें ॥ १ ॥ हे अठरा अध्यायांची गीता ॥ आत्मसिद्धीची सारता ॥ जगीं अनुभव घेतां ॥ सिद्धी हाता येईल ॥ २ ॥ याचा न धरीं संशय भावें ॥ अनुभवेंचि पाहें ॥ जी तारक होये ॥ जडजीवांतें ॥ ३ ॥ ही अठरा अध्यायांची ध्वनी ॥ केवळ चिद्रत्नांची खाणी ॥ जे आणिती सूक्ष्मीं ध्यानीं ॥ तयांलागीं डुलवी ॥ ४ ॥ याचा करणें विचार ॥ मूळ शोधणें अंतर ॥ सूक्ष्म घेणें सारासार ॥ आपुलिया हितासी ॥ ५ ॥ तरी ही गीता निधान ॥ सूक्ष्मींचें सूक्ष्म ध्यान ॥ आत्मशुद्धीचें कारण ॥

बोध प्रमाण कलियुगीं ॥ ६ ॥ तरी हें शुद्धज्ञानाचें ज्ञान ॥ जें सूक्ष्मींचें बीजकारण ॥ जी ही निजखूण ॥ जगालागीं ठेविली ॥ ७ ॥ याचा केलिया विचार ॥ सूक्ष्म घेतलिया सारासार ॥ सहज होईल भवपार ॥ यासी अंतर नसेचि ॥ ८ ॥ तरी ही पूर्ण शोधकळा ॥ सहज करी जिवाचा उजाळा ॥ नुरे भ्रांतीचा चाळा ॥ ज्ञानअभ्यासें ॥ ९ ॥ शोध बोधाचा व्यापून ॥ बळें दाविली आत्मखूण ॥ जेथें स्थित राहिलों रंगून ॥ आपुलिया आनंदें ॥ १० ॥ आनंद म्हणे गीतासार ॥ हे जाहले बोधउच्चार ॥ स्फूर्तीचा मूळ आधार ॥ श्रीगुरु जाणिजे ॥ ११ ॥ इति अष्टादशाध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुस्वामीसमर्थार्पणमस्तु ॥

लेखनकाल–

शालिवाहन शके अठराशें दहांत ॥ मासामाजीं उत्तम आषाढ विदित ॥ वद्य एकादशी उत्तम व्रत ॥ जड-जीवांसी तारावया ॥ १ ॥ ते दिनीं पूर्ण जाहली ॥ हे बोधगीता बोलविली ॥ जे आनंदें रंगविली ॥ जड-जीवांकारणें ॥ २ ॥

॥ इति श्रीआत्मबोधगीता समाप्ता ॥

श्रीआनंदनाथकृत आत्मोपदेश

॥ अध्याय १ ॥

ॐ नमो जी दिगंबरा ॥ भक्तवत्सला करुणाकरा ॥ तुज स्मरतां ब्रह्मादि हरिहरां ॥ जाहलासी आसरा निजछंदें ॥ १ ॥ तो तूं पुराणपुरुष ॥ जो तूं आदिमायेचा ईश ॥ आत्मा आत्मीं आदेश ॥ ब्रह्मवेष धरियेला ॥ २ ॥ जो गोचर गोचरागोचरीं ॥ योगी नेणती जया अंतरीं ॥ जे स्मरती रूप निरंतरीं ॥ ब्रह्मरंध्रीं घोळत ॥ ३ ॥ तें आयुतायुताचे परतें ॥ जें सूक्ष्म जाणिवा रते ॥ तें आरतें आमुतें ॥ कैंवि जाहलें ॥ ४ ॥ परि स्मरणास्मरणीं स्मरण ॥ जें डुल्लवी योगियांचें ध्यान ॥ तें आत्मया तनमन ॥ करी निजछंदें ॥ ५ ॥ सोहंकाराचा आकारू ॥ जें मूळतत्त्व ब्रह्मगुरू ॥ जयापासूनि बीज ओंकारू ॥ आल्हाद स्वरूपीं निर्मिला ॥ ६ ॥ जैं सच्चिच्छक्तीचा आभासु ॥ जो स्वरूपप्रकृतीचा भासु ॥ तो पावे नासु ॥ अविनाशकाळीं ॥ ७ ॥ प्रकृति-पुरुष दोन जाहलीं ॥ तैंपासुनि दोघें नटलीं ॥ आपआपणा विसरलीं ॥ भ्रमूं लागलीं निजभुली ॥ ८ ॥ जैसा गुहेगृहीं शिरतां नरू ॥ जंव जंव जाय तंव अंधारू ॥

भ्रम पावे निर्धारू ॥ परी भुली न सरे ॥ ९ ॥ तो उलटलिया माघारा ॥ सहजचि विसरे अंधारा ॥ प्रकाशाचा धरूनि थारा ॥ सुख अंतरा पाविजे ॥ १० ॥ तैसा हा संसारभारू ॥ केवळ जाणिजे अंधारू ॥ त्यांत भ्रम पावती नरू ॥ आप-आपणा नेणोनि ॥ ११ ॥ जरी गुरुपदीं लीन व्हावें ॥ तरी आत्मया ओळखावें ॥ मग स्वयेंचि रमावें ॥ निजस्वरूपीं ॥ १२ ॥ जरी एकापासूनि अनेक जाहले ॥ तरी ते एकचि भासले ॥ मग भ्रमदशेसीं नासले ॥ अद्वैतनरू ॥ १३ ॥ जरी ईश्वर जाहला आपण ॥ तरी तारक राहिला कोण ॥ हें जंव नुमजे निर्वाण ॥ तंव सगुण भजावें ॥ १४ ॥ स्थिरचरामाजीं जरी भासे भासला ॥ मग आपणामाजीं कां न वसला ॥ जो स्वरूपीं असला ॥ निजछंदें ॥ १५ ॥ तरी करोनि विचार ॥ नरदेह गृह सारासार ॥ तेथें आत्मस्थितिविचार ॥ ब्रह्म निर्धार भोगवी ॥ १६ ॥ हें लघु स्तोत्र निगुती ॥ जो जपे अहोरात्रीं ॥ त्याचे मनोरथ पुरती ॥ सांगे निश्चितीं स्वामिराज ॥ १७ ॥ ही आनंदनाथाची वाणी ॥ अठरा ओंव्यांची निशाणी ॥ भावभक्ती गातां जनीं ॥ तारक निर्वाणीं होय जीवा ॥ १८ ॥ इति प्रथमाध्यायः समाप्तः ॥

॥ अध्याय २ ॥

ॐ नमो जी निर्गुणा ॥ सच्चिदानंदा आनंदघना ॥ सोहं स्वरूपाच्या कारणा ॥ ॐकारगुणा खेळविलें ॥ १ ॥ ऐसा तूं अपरंपारू ॥ तुज म्हणती श्रीगुरू ॥ तुझ्या स्फूर्तीचा आकारू ॥ विश्वमाया नटविली ॥ २ ॥ त्या तुज स्तवावया ॥ शक्तिक्षीण जाहली ब्रह्ममाया ॥ नेति म्हणोनि नमिती पाया ॥ पावती भया वेदादि ॥ ३ ॥ ऐसा तूं अभयवरदु ॥ भवहारक अभेदु ॥ जो ब्रह्मानंदीं आमोदु ॥ तुझिया स्वरूपाचा ॥ ४ ॥ परी स्तवनाकारण ॥ अनेक नामांचें वर्णन ॥ तुज आळविती भक्तजन ॥ प्रेमभावेंकरूनियां ॥ ५ ॥ तयालागीं अजिता ॥ अच्युता अनंता अवधूता ॥ अपारतेजा अपरिमिता ॥ तारीं आतां मजलागीं ॥ ६ ॥ तूं सर्वव्यापी सर्वेश्वरू ॥ तूं आदिमायेचा ईश्वरू ॥ तुझें स्फूर्तिस्वरूप चराचरू ॥ निजलीलें वर्तविलें ॥ ७ ॥ मी अन्यायी आगळा ॥ परी तूं जाणसी कळवळा ॥ विश्वमायास्वरूप दयाळा ॥ तुझें म्हणविलें ॥ ८ ॥ माझे अपराध क्षमा कीजे ॥ मायबापें मज सांभाळिजे ॥ जें मूळ ब्रीद तुझें ॥ भक्तवत्सल म्हणोनी ॥ ९ ॥ तुझी मूर्ति दिगंबरू ॥ अतितेज निर्धारू ॥ जी अगोचरा गोचर निरंतरू ॥ ब्रह्मादिकां-

लागीं स्तवावया ॥ १० ॥ करूनि मनातें सोज्वळ ॥ प्रेमें भरूनी गंगाजळ ॥ स्नान घालावें निर्मळ ॥ निजगुरुपदीं ॥ ११ ॥ सुमनसुगंध सुप्रकार ॥ पूजन करावें निर्धार ॥ आत्मसिद्धी निरंतर ॥ पाविजे गुरुकृपें ॥ १२ ॥ नित्यपाठ करावया ॥ हें लघुस्तोत्र स्तविलिया ॥ आत्मसिद्धि भाविकांचिया ॥ पाया सदा नमिजेल ॥ १३ ॥ नित्यपाठ निगुती ॥ प्रेमभावें निश्चितीं ॥ त्याचे मनोरथ पुरती ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ १४ ॥ दया धरावी अंतरीं ॥ विचारें मनातें आवरीं ॥ मग स्वरूप पावसी निर्धारीं ॥ आत्मसुखाचें ॥ १५ ॥ सर्वीं सर्व पाहिंजे ॥ तेथें आपणा पैं ओळखिजे ॥ मग अनुष्ठान कीजे ॥ अहोरात्रीं ॥ १६ ॥ अठरा दिन अठरा रात्रीं ॥ शुद्ध करूनि चित्तवृत्ति ॥ स्तव केलिया गुरुमूर्ति ॥ दर्शन देईल निर्धारें ॥ १७ ॥ ही आनंदनाथाची वाणी ॥ खरी भवतारक निशाणी ॥ जे बोलविली निर्वाणीं ॥ भक्तांलागीं तारावया ॥ १८ ॥ इति द्वितीयाध्यायः समाप्तः ॥

॥ अध्याय ३ ॥

श्रीपणा ओढूनि घेसी ॥ मग भक्तां कां अव्हेरिसी ॥ तरी तूं भावुक कैसा होसी ॥ निजनामालागोनियां ॥ १ ॥

मज जिवा जीवीं पाहणें ॥ शरीरभावा अव्हेरणें ॥ कर्मबंधा तोडणें ॥ निजनामेंकरूनियां ॥ २ ॥ मज नाहीं भेदाभेद ॥ मी सदाही अभेद ॥ माझे पायीं ब्रह्मानंद ॥ निजभाविकां डुलवी ॥ ३ ॥ जो मजमाजीं गळाला ॥ तो माझाचि होउनी राहिला ॥ मग मीपण विसरला ॥ आपुलिया मायेतें ॥ ४ ॥ माझें मजचि कळलें ॥ मग मी हें समूळ गळालें ॥ तूंपणा वितुळलें ॥ सहज हरले भेदाभेद ॥ ५ ॥ हें ब्रह्म निराकार ॥ जेथें नाहीं विकार ॥ हें नेणोनि पामर ॥ आकाररहित वर्तविती ॥ ६ ॥ जें सर्वांभूतीं ऐक्य जाहलें ॥ तें निराकार बोलविलें ॥ ब्रह्म ऐसें ठेलें ॥ शुद्धसत्त्व ॥ ७ ॥ कर्माचा कर्ता आपण ॥ हा जेव्हां घडे अभिमान ॥ तेव्हां पावे बंधन ॥ मोहपाशीं ॥ ८ ॥ बंधविरहित जरी होणें ॥ तरी मी हें विसरणें ॥ माझें ऐसें भुलविणें ॥ विश्वजगातें ॥ ९ ॥ ऐक्य दया भूतीं जाहली ॥ तरी ब्रह्मछाया वर्तली ॥ भ्रांती सहजचि हरली ॥ मी जीवपणाची ॥ १० ॥ जंव जंव ज्ञान जिरे ॥ तंव तंव अभिमान मुरे ॥ मीपणासी विसरे ॥ ज्ञानगती ॥ ११ ॥ जो शुद्धतत्त्वीं बोधला ॥ तो परमानंदीं डुलूं लागला ॥ कल्पनेसी विसरला ॥ निजबोधें ॥ १२ ॥ मी कर्ता कारण ॥ करविता असे कोण ॥ हें

जेथें नसे भान ॥ विषयमायेचें ॥ १३ ॥ अंतरीं शुद्ध बोधें बोधला ॥ ज्ञानरंगें जागों लागला ॥ जो कदा नाहीं भ्रमला ॥ जीव आत्म्यासी ॥ १४ ॥ तो अविनाशीं अविनाश ॥ जो जीवाजीवीं स्वयंप्रकाश ॥ तेथें कल्पनेचा नाश ॥ सरे भवपाश निजबळें ॥ १५ ॥ जे स्वयंरूपासी रंगले ॥ ते मीपणा विसरले ॥ कल्पनेसी सरले ॥ निजछंदें ॥ १६ ॥ जंव सूक्ष्मीं सूक्ष्म कळे ॥ तंव स्वरूप सहजचि आकळे ॥ तेथें ब्रह्मानंद अळुमाळें ॥ निजलीलें खेळवी ॥ १७ ॥ तरी कर्ता भूतकारणी ॥ हा जीव वृथा मानी ॥ मायेनें गुंते अभिमानीं ॥ कर्मबंधनीं पावती ॥ १८ ॥ हे आनंदनाथाची वाणी ॥ अठरा ओंव्यांची निशाणी ॥ प्रेमभावें गातां जनीं ॥ उन्मनी मनीं प्रगटेल ॥ १९ ॥ इति तृतीयाध्यायः समाप्तः ॥

॥ अध्याय ४ ॥

श्रीगुरुकृपेचें भांडवल ॥ आत्मसिद्धी अमोल ॥ नसे जया मोल ॥ जगत्रयीं ॥ १ ॥ श्रीगुरूनें कृपा केली ॥ तयींच आत्मसिद्धी लाधली ॥ सहजें भुली हरली ॥ अंतरींची ॥ २ ॥ आत्मज्योतीची कळा ॥ तिचा देखिला उजाळा ॥ सहजें प्रकाशे बाळा ॥ अळुमाळा खेळत ॥ ३ ॥

जंव अंधकार सरे ॥ तंव प्रकाशीं वस्तु ओमरे ॥ परि उरी न उरे ॥ मायासुखाची ॥ ४ ॥ तयीं सिद्धी साधिली ॥ माजीं मी ही भ्रांती हरली ॥ नेत्रमाया तरळली ॥ सत्रावी-कारणें ॥ ५ ॥ मना केलें उन्मन ॥ तेंच भोगी स्थान ॥ मीपणातें मोडून ॥ ब्रह्म आपण वागवी ॥ ६ ॥ जंव जंव हा विरे ॥ तंव तंव तोही सरे ॥ मग आत्मींच मुरे ॥ आपण उरे निजठाया ॥ ७ ॥ कर्मी असतां कर्मातीत ॥ जो सत्यभ्रांतिरहित ॥ आत्मसिद्धी भोगीत ॥ निजानंदयोगें ॥ ८ ॥ जाणे जीवाची जीवनकला ॥ परी आपण राहूनि वेगळा ॥ खेळवी खेळा ॥ मायाभुलीच्या ॥ ९ ॥ जैं भुलीच सरली ॥ मग भ्रांती कोठूनि उरली ॥ आत्मसिद्धी मुरली ॥ स्वरूपानंदें ॥ १० ॥ तरी यांच्यामधून वेगळें होणें ॥ तेव्हां स्वरूपा गांठणें ॥ आत्म तें शोधोनि घेणें ॥ तया ठाया ॥ ११ ॥ जरी धरिशी शरीराचा भावो ॥ तरी तें गृहचि पहाहो ॥ वागविता तूं तो हो ॥ जो जाणसी आपणातें ॥ १२ ॥ तुज कैशी पडली भुली ॥ कीं जी छाया आपुली ॥ तिशीं जीव मानुनी बोली ॥ कां गा वृथा वर्तसी ॥ १३ ॥ हें तंव देखसी स्वप्न ॥ तुज जंव गांटेल सूक्ष्म ॥ तेव्हां होईल जागरण ॥ आत्मसिद्धी साधावया

॥ १४ ॥ चराचरींचा आकारू ॥ तो आत्म जाणिजे गुरू ॥ ब्रह्म हें निर्विकारू ॥ ठायीं ठायीं वर्तलें ॥ १५ ॥ तरी गुरुगुज गांठोनि हातीं ॥ आत्म शोधावें निगुती ॥ स्थूळ वितुळलिया शांती ॥ सहज जीवीं घडेल ॥ १६ ॥ नरदेहाचा आकारू ॥ आत्मसिद्धीचें घरू ॥ तें चुकलिया पामरू ॥ वृथा जन्मीं भ्रमतील ॥ १७ ॥ ही आनंदनाथाची वाणी ॥ अठरा ओंव्यांची निशाणी ॥ भावें वाचितां जनीं ॥ आत्मसिद्धी साधेल ॥ १८ ॥ इति चतुर्थोध्यायः समाप्तः ॥

॥ अध्याय ५ ॥

श्रीगुरुकृपेचें कारण ॥ सोहंकारें स्फूर्ति निर्मून ॥ बीज ओंकारीं स्थापून ॥ गुणालागीं वर्तवी ॥ १ ॥ स्वरूप-स्वरूपींचा अंतरभेद ॥ तो स्थित बोलियला वेद ॥ बीज ओंकारसिद्ध ॥ ब्रह्मआकारू देखियला ॥ २ ॥ स्थिरचराचा आकार ॥ व्यापक ब्रह्म निराकार ॥ जेथें नाहीं विकार ॥ स्वरूपतेचा ॥ ३ ॥ तया व्याप्यता व्यापूनि गेली ॥ मृगजळ माया देखिली ॥ भ्रांति सहजचि हरली ॥ मीतूंपणाची ॥ ४ ॥ जंव जंव दृष्टी धांवे ॥ तंव तंव समाधान पावे ॥ आत्म तें सुखावे ॥ निजानंदीं ॥ ५ ॥ जेथें जाणा ध्वनीचा

आकारू ॥ तोच जाणिजे सोहंकारू ॥ स्वरूप आत्मा चरा-
चरू ॥ निजछंदें व्यापिला ॥ ६ ॥ गुजागुजीं गुज पाहिलें ॥
आत्मस्थित ऐसें जाणिलें ॥ जें स्वच्छंदा वितुळलें ॥ माये-
चिया ॥ ७ ॥ तरी देह जाणोनि घर ॥ हा पहावा कोणाचा
व्यवहार ॥ कोण कर्ता निर्धार ॥ लाघव जाणिजे तयाचें
॥ ८ ॥ तो जाणोनि देहीं स्थित ॥ ब्रह्म आपण कां न
होत ॥ आत्मसिद्धीतें साधत ॥ मी हें जिरालिया ॥ ९ ॥
जरी दयाभूत पाहावें अंतर ॥ तरी आपण व्यापिलें
चराचर ॥ द्वैतभावासी अंतर ॥ सहज तेथें पडियेलें ॥ १० ॥
स्मरती श्रुतीच्या कारणीं ॥ मन जेथें जाहलिया उन्मनी ॥
मग ते करणी ॥ कोण जाणे ॥ ११ ॥ याचा हाचि
गळूनि गेला ॥ मग द्वयपणासी कैंचा राहिला ॥ जो
संभवा चुकला ॥ कर्मभोगाच्या ॥ १२ ॥ अज्ञान जइं
सरे ॥ तइं ज्ञानचि उरे ॥ परी विज्ञानाविण फेरे ॥ कैसे
चुकती ॥ १३ ॥ तरी विवेकाच्या गांठीं ॥ विज्ञान जोडावें
निकटीं ॥ मग चढावें ब्रह्मघाटीं ॥ आपेंआप ॥ १४ ॥
जंव हें न घडे ॥ तंव जाणिलें अवघेंची कोरडें ॥ शांति ती न
जडे ॥ आत्मस्वरूपाची ॥ १५ ॥ शुद्धाशुद्धी शुद्ध पाहिलें ॥
तें आत्म शोधोनि काढिलें ॥ जें सत्यानें गोविलें ॥

आपपर नेणोनी ॥ १६ ॥ तरी सिद्धांत साधोनि सिद्धी ॥ ब्रह्म व्यापिलें आमोदीं ॥ जें लाभे निजछंदीं ॥ आत्मसुखाचे ॥ १७ ॥ ही आनंदनाथाची वाणी ॥ अठरा ओंव्यांची निशाणी ॥ जे भवतारकांनीं ॥ सदा ध्यानीं आणिल्या ॥ १८ ॥ इति पंचमाध्यायः समाप्तः ॥

श्रीआनंदनाथकृत गुरुस्तव.

ॐ नमोजी श्रीगुरुनाथा । भक्तवत्सला समर्था । तव पदीं ठेऊनि माथा । स्तवितों ताता तुजलागीं ॥ १ ॥ तूं नित्य निरंजन । तुज म्हणती निर्गुण । तूंच जगाचें कारण । अहंभावें प्रगटलासी ॥ २ ॥ तुझी स्तुति करावया । शक्ति नसे हरिहरां ब्रह्मया । परि अघटित तुझी माया । जी संशयभयां निवारीत ॥ ३ ॥ मूळ मूळींचा आकारू । तुज म्हणती श्रीगुरू । सच्चिच्छक्तीचा आधारू । पूर्णाधारू ॐकारासी ॥ ४ ॥ ऐसा तूं देवाधिदेव । हें विश्व तुझेंचि लाघव । इच्छेचें वैभव । मूळब्रह्मीं नटविलें ॥ ५ ॥ ऐसा तूं बा अपरंपारू । या अनंत ब्रह्माचा आधारू । चराचरींचा आकारू । पूर्णाधारू म्हणविलें ॥ ६ ॥ ऐशा तुजप्रती । स्तवावया अल्प माझी मती । तूं जाणसी हें चित्तीं । विश्व-

व्यापक म्हणवूनि ॥ ७ ॥ तरी देवा मतिदान । देणें तुजचि कारण । जरी करणें समाधान । तरी दातृत्वपूर्ण ब्रीद बोलिलें ॥ ८ ॥ अहा जी निर्गुणा । विश्वव्यापका सगुणा । सत्यनिराकार निरंजना । भक्तांकारणें प्रगटलासी ॥ ९ ॥ रूप पहातां मनोहर । मूर्ती केवळ दिगंबर । कोटीमदनतेज-निर्धार । ज्याच्या स्वरूपीं नटलें ॥१०॥ कर्णीं कुंडलाकृती । वदन पाहतां सुहास्यमूर्ती । भ्रुकुटी पाहतां मना वेधिती । भक्तभाविकांचे ॥ ११ ॥ भोंवयांचा आकारू । जेथें भुले धनुर्धरू । ऐसें रूप निर्धारू । नाहीं नाहीं जगत्रयीं ॥ १२ ॥ सरळ दंड जानु प्रमाण । आजानुबाहु कर जाण । जो भक्तां वरद पूर्ण । ज्याचे स्मरणें भवनाश ॥ १३ ॥ ऐसा तूं परात्परू । परमहंसस्वरूप सद्गुरू । मज दावूनि ब्रह्म चराचरू । बोलविला आभारू जगतासी ॥ १४ ॥ ऐशा तुज स्तवुनी । मौन पावले सहस्त्रफणी । वेद श्वान होऊनि । सदा द्वारीं तिष्ठती ॥ १५ ॥ तेथें मी लडिवाळ । खरें जाणिजे तुझें बाळ । म्हणवोनि पुरवीं माझी आळ । माय कनवाळ म्हणविसी ॥ १६ ॥ मी अन्यायी नानापरी । कर्मैं केलीं दुर्विचारीं । तीं क्षमा करोनि निर्धारीं ॥ मज तारीं गुरुराया ॥ १७ ॥ मनाचिया वारें । जे उठती पापांचे

फवारे । तेणें भ्रम भ्रमलों बा रे । चुकवीं फेरे भवाचे ॥ १८ ॥ कायिक वाचिक मानसिक । सर्व पापें झालीं जीं अनेक । तीं क्षमा करूनि देख । मज तारीं गुरुराया ॥ १९ ॥ मातृउदरीं तुम्हीं तारिलें । तें विस्मरण जीवासी पडिलें । हें क्षमा करूनि वहिलें । मज तारीं गुरुराया ॥ २० ॥ परोपकार विस्मरण । पापें केलीं अघटित कर्म । अहंभावक्रोधालागून । सदाचि गृहीं ठेवियलें ॥ २१ ॥ हें क्षमा करोनि दातारा । मज तारावें लेंकरा । तुजविण आसरा । नाहीं नाहीं जगत्रयीं ॥ २२ ॥ मज न घडे नेम-धर्म । न घडे उपासना कर्म । नाहीं अंतरीं प्रेम । परी ब्रीदाकारण तारणें ॥ २३ ॥ नाम तुझें पाहीं । कदा वृथा गेलें नाहीं । ऐसी देती ग्वाही । संत सज्जन पुराणें ॥ २४ ॥ मागें बहुत तारिले । हें त्यांहीं अनुभविलें । मज कां अव्हे-रिलें । निष्ठुर केलें मन किंनिमित्त ॥ २५ ॥ तूं विश्वाकारू विश्वाधारू । त्वांचि रचिलें चराचरू । तूंचि बीज आधारू । व्यापक निर्धारू जगत्रयीं ॥ २६ ॥ चार देहांच्या सूक्ष्मीं । तूंचि झुलविसी निजलगामीं । हे ठेवूनी कारणीं । अहंभाव तोडावया ॥ २७ ॥ जन्ममरणांच्या व्यापारीं । जे भ्रमुनी पडले मायाभरारीं । ते सोडविशी जरी । निजनामेंकरू-

नियां ॥ २८ ॥ ऐसा तूं अनादि आधारु । तुज म्हणती वेदगुरु । परी हें व्यापूनि अंतरु । स्थिरचरीं व्यापिलें ॥ २९ ॥ भावभक्ती चोखट । करणें नेणें विकट । नाम तुझें सुभट । तोडीं घाट भवाचा ॥ ३० ॥ हें जाणुनी अंतरीं । पिंडब्रह्मांड शोधिलें जरी । तरी सूक्ष्मींच्या आधारीं । व्यापक निर्धारीं तूंचि एक ॥ ३१ ॥ म्हणोनि सौम्यमती । तुज निजानंदें स्तविती । जरी बोलविसी वाचाशक्ती । तरी हातीं तुझ्या दयाळा ॥ ३२ ॥ म्हणोनि स्तवणें स्तवनीं । तुज सांगणें एक जनीं । वश व्हावें भक्ती-लागुनी । अवतारकरणी जाणोनियां ॥ ३३ ॥ अहंभाव तुटोनि गेला । प्रेमभाव प्रगटला । देव तेथेंचि राहिला । अनुभवशुद्धी खेळवी ॥ ३४ ॥ यज्ञ कोटि करूं जातां । जें फळ न ये हाता । तें प्रेमभावें स्तवितां । हरितें व्यथा भवाची ॥ ३५ ॥ म्हणोनि सांगणें खूण । हा स्तव नित्य प्रेमें जाण । जो वाचील अनुप्रमाण । अकरा वेळां निर्धारें ॥ ३६ ॥ शुचिस्मित करूनि चित्ता । जो जपे प्रेम-भरिता । पुरवीं तयाच्या मनोरथा । सत्य सत्य त्रिवाचा ॥ ३७ ॥ हें लघुस्तव स्तवन । तारक जगाच्या कारण । भक्तिभावें पूर्ण । चुके चुके भवफेरा ॥ ३८ ॥

जो हा स्तव करील पठण । त्या घरीं आनंद प्रगटेल जाण । देवोनि भक्तां वरदान । तारक त्रिभुवनीं करील ॥ ३९ ॥ हा स्तव नित्य वाचा । भाव धरूनि जीवाचा । फेरा चुकवा चौऱ्यांशींचा । गर्भवास पुन्हां नाहीं ॥ ४० ॥ हें जगा हितकारी । चुकवी चुकवी भ्रमफेरी । मृगजळ दावूनि संसारीं । मग तारी जीवातें ॥ ४१ ॥ ही आनंदनाथाची वाणी । जगतारक निशाणी । स्मरतां झुलवी निरंजनीं । योगी ध्यानीं डोलविले ॥ ४२ ॥

॥ इति श्रीगुरुस्तवः समाप्तः ॥

श्रीअक्कलकोटनिवासी राजाधिराज योगिराज श्रीगुरु स्वामीसमर्थ महाराजकी जय.

आनंदनाथकृत श्लोक

आरक्तवर्ण तनु दिव्य कांती ॥ पद्मनेत्र ज्याचे जगीं सूर्यदीप्ती ॥ आनंदवदनीं मित हास्य पाहें ॥ पाहूं जयातें करिती तपा हे ॥ १ ॥ सगुणरूपें जगीं हाचि झाला ॥ श्रीगुरुस्वामी म्हणती जयाला ॥ देखोनियां ते जगीं धन्य झाले ॥ त्याच्या पदीं जे सदा निवाले ॥ २ ॥ व्यापूनि भुवन स्थिर या चरांतें ॥ वेगळाच आहे म्हणती तयातें ॥

ज्याच्या शक्तिनें जाण हें विश्व चाले ॥ तया नेणती वेद जेथून झाले ॥ ३ ॥ निराकार वस्तू मुनि हेंच पाहती ॥ पहातां जयातें न लवेच पातीं ॥ पाहूनि यातें जन मुक्त व्हा रे ॥ आनंदवाणी परि हीत ध्या रे ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥

॥ श्रीगुरुस्वामीसमर्थाय नमः ॥

श्रीगुरू तुला नित्य आठवूं ॥ ध्यानभाव हा शुद्ध कीं ठेवूं ॥ म्हणुनियां त्वरा पाव लेंकरा ॥ श्रीगुरूपदीं अर्पिलें शिरा ॥ १ ॥ विश्वभूषणा भावि जाणसी ॥ प्रेम द्यावें जी सत्य मानसीं ॥ काय त्या करूं वेदकिंकरा ॥ श्रीगुरूप० ॥ २ ॥ पतित तारिले विश्व या जनीं ॥ श्रुतिहि वर्णिती कीर्ति ते मनीं ॥ ठावें गूज तें जाणत्या हरा ॥ श्रीगुरूप० ॥ ३ ॥ पांचतत्त्व ते आंगभूत हो ॥ सम हे कृपा विश्वरूप हो ॥ म्हणुनियां त्वरा आजि कीं करा ॥ श्रीगुरूप० ॥ ४ ॥ मूळबीज जें रूप देखिलें ॥ सोहंकार हें नाम शोभलें ॥ आणिलें तरी विश्व आकरा ॥ श्रीगुरूप० ॥ ५ ॥ तीन गूण ते मायसंगती ॥ खेळ खेळवी जाण निश्चिती ॥ गुप्त तो तथा विश्व आकरा ॥ श्रीगुरूप० ॥ ६ ॥ द्वैत-भाव तो नाहिं ठेविला ॥ आत्मराज हा सत्य रंगला ॥

म्हणुनियां जिवा शोध हा करा ॥ श्रीगुरूप० ॥ ७ ॥ हृदयमंचकीं रूप देखिलें ॥ सत्यध्यान तें नयनिं रेखिलें ॥ म्हणुनियां भवा नाशिलें खरा ॥ श्रीगुरूप० ॥ ८ ॥ अहंभाव हा सत्य मुरविला ॥ रूपशांति ते रंग देखिला ॥ म्हणोनियां अजी पूर्ण हें करा ॥ श्रीगुरूप० ॥ ९ ॥ नाहीं ठावुकें आणिक निकें ॥ ब्रह्म बोलुं तें गुरु कौतुकें ॥ पूर्ण शांतकीं जीव हा खरा ॥ श्रीगुरूप० ॥ १० ॥ आनंदनाथें हा स्तव बोलिला ॥ पाहुनी जया श्रीगुरु डुल्ला ॥ पदीं लोटिला काळ किंकरा ॥ श्रीगुरूप० ॥ ११ ॥

॥ अभंग १४ ॥

माझी लाज तुज स्वामिराया ॥ पडतों मी पायां ॥ चुकवीं ह्या अपाया ॥ करा कृपेची छाया ॥ माझी अपवित्र वाणी ॥ वंगाळ माझी काया ॥ व्यर्थ दवडूं नका वायां ॥ माझी० ॥ रंगलें मन गुण तुझे गाया ॥ करा कृपेची छाया हो ॥ माझी० ॥ स्वामीसुत म्हणे बापराया ॥ अघटित तुझी माया ॥ माझी० ॥

॥ अभंग १५ ॥

देवा कृपेच्या सागरा ॥ श्रीगुरुराया दिगंबरा ॥ १ ॥ पूर्णब्रह्म पूर्णज्योत ॥ सखा माझा कृपावंत ॥ २ ॥

अनंत ब्रह्मींचा देखावा ॥ ज्याच्या रूपींच्या वैभवा ॥ ३ ॥
सच्चिच्छक्तीचा आधार ॥ जेथून जाहला आकार ॥ ४ ॥
तीन गुणांचें मंडण ॥ मूळ पायांचें कारण ॥ ५ ॥
बीजा बीजा नटुनि गेला ॥ विश्वब्रह्मीं एकचि झाला ॥ ६ ॥
आनंद म्हणे निजखूण ॥ गुरुपायीं आठवण ॥ ७ ॥

॥ अभंग १६ ॥

पूर्ण ब्रह्म निराकार ॥ श्रीगुरुस्वामींचा अवतार ॥ १ ॥
धराभार उतरावया ॥ देव विनविती पाया ॥ २ ॥
आणिकांची सत्ता काय ॥ शिव म्हणे बाप माय ॥ ३ ॥
कर जोडी लक्ष्मीपती ॥ आज्ञा वागवितो चित्तीं ॥ ४ ॥
ब्रह्मा बापुडा तो काय ॥ भेणें वंदी श्रीगुरुपाया ॥ ५ ॥
देव द्वारींचे किंकर ॥ काळ पायाचा चाकर ॥ ६ ॥
मुनी घेती दिगंबर ध्यान ॥ तया भुलले हे जन ॥ ७ ॥
आनंद म्हणे विचार करा ॥ अवघा भ्रमाचा पसारा ॥ ८ ॥

॥ अभंग १७ ॥

धन्य गुरुरायें कृपा मज केली ॥ भ्रांति हरविली अंतरींची ॥ १ ॥ रूपारूपीं रूप मिळवूनी पाहें ॥ जिरविलें आहे निजछंदें ॥ २ ॥ समाधान देहीं नाहीं तें संदेहीं ॥

सोडविलें पाहीं कृपाबळें ॥ ३ ॥ नाहीं तळमळ प्रेमाचा कल्होळ ॥ मोडाया गोंधळ दुरिताचा ॥ ४ ॥ आनंद म्हणे मज रूपीं जिरविलें ॥ आपणा ऐसें केलें कृपाबळें ॥ ५ ॥

॥ अभंग १८ ॥

गुरुराया तुम्हीं केले उपकार ॥ थोर निराधार जगामाजी ॥ १ ॥ नाहीं पारावार तुझ्या उपकारा ॥ सख्या गा दातारा दीनबंधु ॥ २ ॥ मायपोटीं मज बळें सांभाळिलें ॥ आपुलें म्हणविलें वेळोवेळीं ॥ ३ ॥ प्रेमें स्तनपान केलें हो पालन ॥ दिलें समाधान जिवालागीं ॥ ४ ॥ आनंद म्हणे नाहीं नाहीं पारावार ॥ तुझा उपकार गुरुराया ॥ ५ ॥

॥ अभंग १९ ॥

तारीं तारीं हो समर्था ॥ सर्व जगीं तुमची सत्ता ॥ १ ॥
तुम्हीं केली खेळवण ॥ स्वयें करितां पाळण ॥ २ ॥
जगीं धर्मलोप झाला ॥ म्हणोनि अवतार धरिला ॥ ३ ॥
आतां ताराल निश्चितीं ॥ पायीं ठेविलिया प्रीती ॥ ४ ॥
आनंद म्हणे शरणागता ॥ स्वामिराज माझा दाता ॥ ५ ॥

॥ अभंग २० ॥

स्वामिराया कृपावंता ॥ मज तारावें अनाथा ॥ १ ॥
येऊं द्यावी आतां कींव ॥ कासावीस होतो जीव ॥ २ ॥
थोर वाटे मज चिंता ॥ वेळ नाहीं हो आयुष्य जातां ॥ ३ ॥
अंतकाळ गोड व्हावा ॥ ऐसें वाटतसे जीवा ॥ ४ ॥
म्हणुनी आलों शरणागत ॥ तुझा म्हणवितों अंकित ॥ ५ ॥
आनंद म्हणे माझी चिंता ॥ असों द्यावी कृपावंता ॥ ६ ॥

॥ अभंग २१ ॥

स्वामी माझा जीव स्वामी माझा देव ॥ हें देहवैभव स्वामी माझा ॥ १ ॥ स्वामी हा पालक स्वामी हा तारक ॥ सांभाळिता देख स्वामीराव ॥ २ ॥ जीवाचें जीवन करी समाधान ॥ मनाचें विश्राम स्वामी माझा ॥ ३ ॥ अंतर्बाह्य पाहतां तूंचि एक खरा ॥ जग हा पसारा त्याचा असे ॥ ४ ॥ आनंद म्हणे मज स्वामी सर्वभूत ॥ निरंजनीं पाहत स्वामीराज ॥ ५ ॥

॥ अभंग २२ ॥

स्वामी माझा बोल स्वामी भांडवल ॥ व्यापारासी मोल नाहीं माझ्या ॥ १ ॥ सदा तोचि नफा झाला हो

फायदा ॥ नुकसान तें कदा नाहीं नाहीं ॥ २ ॥ नामाची तिजोरी प्रेमाची रोकड ॥ देह खरडाखोड सोडीयेली ॥ ३ ॥ काम क्रोध लोभ घालूनियां खर्ची ॥ अहंकाराची स्थिती ओपियेली ॥ ४ ॥ आनंद म्हणे आम्हीं केला हा व्यापार ॥ भरतों बाजार स्वामीनामीं ॥ ५ ॥

॥ अभंग २३ ॥

काया केलीसे अर्पण ॥ आतां आकळावें मन ॥ १ ॥
हेंचि मागणें दातारा ॥ दिलें वचन आठवण करा ॥ २ ॥
आणिकाची आस नाहीं ॥ शिर अर्पियेलें पायीं ॥ ३ ॥
आतां झालों जी निधडा ॥ तुझा गातों मी पवाडा ॥ ४ ॥
बळें आपुलें जतन करीं ॥ मायें घेतलें शेजारीं ॥ ५ ॥
आनंद म्हणे ब्रीद राखा ॥ स्वामीराज माझा सखा ॥ ६ ॥

॥ अभंग २४ ॥

येईं येइ करुणावंता ॥ माझ्या रंगणीं समर्था ॥ १ ॥
प्रेमें नाचूं धुडधुडा ॥ करूं कलीचा चुराडा ॥ २ ॥
बळें दुरिताचा नाश ॥ सहज तोडूं भवपाश ॥ ३ ॥
आनंद म्हणे निर्गुण ॥ रंगीं आणिलें सगुण ॥ ४ ॥

॥ अभंग २५ ॥

निष्ठुर तें मन नको करूं माया ॥ आणिक रूपा या तुझ्या नेणें ॥ १ ॥ पाजीं प्रेमपान्हा आहें तुझा तान्हा ॥ धरितों चरणा लडीवाळ ॥ २ ॥ राग नको आतां धरूं हा अंतरीं ॥ हातीं शिर सुरी दिली खरी ॥ ३ ॥ आनंद म्हणे बापा कृपेच्या सागरा ॥ सख्या दिगंबरा गुरुराया ॥ ४ ॥

॥ अभंग २६ ॥

निष्ठुर तें मन माय कैसी करी ॥ सांग बाळावरी निरधारीं ॥ १ ॥ नाहीं नाहीं नाहीं आणिक ज्या आस ॥ जीवाजीवीं खास माय तया ॥ २ ॥ हेतु तूं जाणसी अगा हे दातारा ॥ कैंचें बा लेंकरा दूर केलें ॥ ३ ॥ आनंद म्हणे काया ओंवाळिली पायीं ॥ देह तुझा तूंही सांभाळावा ॥४॥

॥ अभंग २७ ॥

मूळमूळींचा विचार ॥ तुम्ही आम्ही निराकार ॥ १ ॥ ज्ञानजागृतीचा भास ॥ सच्चित् आनंदाचा वास ॥ २ ॥ तेथून झाला हा उकार ॥ तया म्हणती ओंकार ॥ ३ ॥ गुणागुणाचेंही बीज ॥ अर्धमातृकेचें तेज ॥ ४ ॥ तेथूनि झाला हा विचार ॥ पंचतत्त्व सारासार ॥ ५ ॥ एक मेळा

मेळूनि गेला ॥ डाव रंगासी आणिला ॥ ६ ॥ आनंद म्हणे निजखूण ॥ बळें देतों आठवण ॥ ७ ॥

॥ अभंग २८ ॥

धराभार उतराया ॥ जागे झालां खरे राया ॥ १ ॥
याची याची आठवण करा ॥ धरादुःखातें निवारा ॥ २ ॥
करा दुरिताचा नाश ॥ बळें तोडा भवपाश ॥ ३ ॥
आपुलें सांभाळा सांभाळा ॥ आतां ब्रीद तें दयाळा ॥ ४ ॥
आनंद म्हणे करुणाकरा ॥ देतों आठवण करा ॥ ५ ॥

॥ अभंग २९ ॥

येणें जाणें कशासाठीं ॥ वास केला अक्कलकोटीं ॥ १ ॥
दीननाथ म्हणवितां ॥ हरा जगाची ही व्यथा ॥ २ ॥
नाम घेतां भव तारा ॥ सुख दावूनि संसारा ॥ ३ ॥
जनीं ओळखुनी चाला ॥ चुकवीं गर्भवासघाला ॥ ४ ॥
आनंद म्हणे निजखूण ॥ बळें देतों आठवण ॥ ५ ॥

॥ अभंग ३० ॥

स्वामी माझी माउली स्वामी माझी माउली ॥ वत्सासी गाउली स्वामी माझी ॥ १ ॥ स्वामी हा आसरा स्वामी हा पसारा ॥ स्वामीपायीं थारा सदा मज ॥ २ ॥ सदा

पाठीराखा स्वामी माझा सखा ॥ धाक तिहीं लोकां पायांचा तो ॥ ३ ॥ केवळ तें ब्रह्म अवतार सगुण ॥ तारक निधान कलीमाजीं ॥ ४ ॥ आनंद म्हणे तरी भावें भक्ति करा ॥ मनोरथ खरा पूर्ण होय ॥ ५ ॥

॥ अभंग ३१ ॥

येतों येतों गुरुराया ॥ दीनवत्सला करुणालया ॥ १ ॥
प्रेमें येतों काकुळती ॥ तुज धरोनियां चित्तीं ॥ २ ॥
दीननाथ म्हणविसी ॥ आतां राखावें दीनासी ॥ ३ ॥
ठेवा ठेवा अभिमान ॥ हातीं दिली सुरी मान ॥ ४ ॥
आनंद म्हणे पायापाशीं ॥ देह दिला जी दानासी ॥ ५ ॥

॥ अभंग ३२ ॥

नामीं दुरिताचा नाश ॥ बळें तोडूं भवपाश ॥ १ ॥
करूं काळाची मुरकुंड ॥ कापूं कलीचीही मुंड ॥ २ ॥
सहज दुरिताचा नाश ॥ बळें तोडूं भवपाश ॥ ३ ॥
आनंद म्हणे निर्गुण ॥ बळें आणिलें सगुण ॥ ४ ॥

॥ अभंग ३३ ॥

कांहीं करा रे विचार ॥ नरदेह नाहीं वारंवार ॥ १ ॥
दिसे तेथें नाशिवंत ॥ सत्य काढा येथें मिथ्य ॥ २ ॥

मेळूनि गेला ॥ डाव रंगासी आणिला ॥ ६ ॥ आनंद म्हणे निजखूण ॥ बळें देतों आठवण ॥ ७ ॥

॥ अभंग २८ ॥

धराभार उतराया ॥ जागे झालां खरे राया ॥ १ ॥
याची याची आठवण करा ॥ धरादुःखातें निवारा ॥ २ ॥
करा दुरिताचा नाश ॥ बळें तोडा भवपाश ॥ ३ ॥
आपुलें सांभाळा सांभाळा ॥ आतां ब्रीद तें दयाळा ॥ ४ ॥
आनंद म्हणे करुणाकरा ॥ देतों आठवण करा ॥ ५ ॥

॥ अभंग २९ ॥

येणें जाणें कशासाठीं ॥ वास केला अक्कलकोटीं ॥ १ ॥
दीननाथ म्हणवितां ॥ हरा जगाची ही व्यथा ॥ २ ॥
नाम घेतां भव तारा ॥ सुख दावूनि संसारा ॥ ३ ॥
जनीं ओळखुनी चाला ॥ चुकवीं गर्भवासघाला ॥ ४ ॥
आनंद म्हणे निजखूण ॥ बळें देतों आठवण ॥ ५ ॥

॥ अभंग ३० ॥

स्वामी माझी माउली स्वामी माझी माउली ॥ वत्सासी गाउली स्वामी माझी ॥ १ ॥ स्वामी हा आसरा स्वामी हा पसारा ॥ स्वामीपायीं थारा सदा मज ॥ २ ॥ सदा

पाठीराखा स्वामी माझा सखा ॥ धाक तिहीं लोकां पायांचा तो ॥ ३ ॥ केवळ तें ब्रह्म अवतार सगुण ॥ तारक निधान कलीमाजीं ॥ ४ ॥ आनंद म्हणे तरी भावें भक्ति करा ॥ मनोरथ खरा पूर्ण होय ॥ ५ ॥

॥ अभंग ३१ ॥

येतों येतों गुरुराया ॥ दीनवत्सला करुणालया ॥ १ ॥
प्रेमें येतों काकुळती ॥ तुज धरोनियां चित्तीं ॥ २ ॥
दीननाथ म्हणविसी ॥ आतां राखावें दीनासी ॥ ३ ॥
ठेवा ठेवा अभिमान ॥ हातीं दिली सुरी मान ॥ ४ ॥
आनंद म्हणे पायापाशीं ॥ देह दिला जी दानासी ॥ ५ ॥

॥ अभंग ३२ ॥

नामीं दुरिताचा नाश ॥ बळें तोडूं भवपाश ॥ १ ॥
करूं काळाची मुरकुंड ॥ कापूं कलीचीही मुंड ॥ २ ॥
सहज दुरिताचा नाश ॥ बळें तोडूं भवपाश ॥ ३ ॥
आनंद म्हणे निर्गुण ॥ बळें आणिलें सगुण ॥ ४ ॥

॥ अभंग ३३ ॥

कांहीं करा रे विचार ॥ नरदेह नाहीं वारंवार ॥ १ ॥
दिसे तेथें नाशिवंत ॥ सत्य काढा येथें मिथ्य ॥ २ ॥

पहातां पहातां अवघे गेले ॥ डोळ्यांपुढें हे दाखले ॥ ३ ॥
बाप आजे तुझे होते ॥ कोणे ठायीं गेले पहा ते ॥ ४ ॥
दारा सुत तुझीं कोण ॥ देती देहातें बांधोन ॥ ५ ॥
काका मामा बंधु येती ॥ तुज उचलोनी नेती ॥ ६ ॥
इष्ट मित्र गण आले ॥ त्यांहीं स्मशानीं ठेविलें ॥ ७ ॥
तेथं आहे तुझें कोण ॥ मना काढीं ओळखून ॥ ८ ॥
फुका नको लटपट ॥ जन्म गेला कीं फुकट ॥ ९ ॥
याचा आजि विचार करीं ॥ पुढें खापर फुटेल शिरीं ॥१०॥
आनंद म्हणे लेंकरा ॥ सोडीं भ्रमाच्या बाजारा ॥ ११ ॥

॥ अभंग ३४ ॥

करीं करीं सावध चित्ता ॥ तुझी हरी भवव्यथा ॥ १ ॥
तेथें होई समाधान ॥ मग सदा तें कल्याण ॥ २ ॥
विचार करोनियां पाहें ॥ आत्महित कोठें आहे ॥ ३ ॥
फुका नको गडबड ॥ यम फोडील जाबाड ॥ ४ ॥
रंग भरोनियां सारा ॥ आधीं मनातें आवरा ॥ ५ ॥
लोभ सोडा अभिमान ॥ नाहीं दंभाचें कारण ॥ ६ ॥
मन मुंडुनि तन्मय करा ॥ गुरु आपण आपुल्या घरा ॥ ७ ॥
तेथें होईल समाधान ॥ मग तुटेल बंधन ॥ ८ ॥
आनंद म्हणे खटपट ॥ कृपेवांचूनि फुकट ॥ ९ ॥

॥ अभंग ३५ ॥

अज्ञानाचे भासें भ्रमोनियां गेलें ॥ मीपण राहिलें देहालागीं ॥ १ ॥ आशा धुरंधर माजली प्रबळ ॥ करी ते व्याकुळ चित्तालागीं ॥२॥ मोह आणि ममता पहातां उभी सन्मुख ॥ भोगविते दुःख भ्रांतीचें हें ॥ ३ ॥ द्वैत हो मत्सर पीडी अहंकार ॥ क्रोध वारंवार जागवुनी ॥ ४ ॥ दम शम तेथें भीती हे सर्वथा ॥ अंतरींची व्यथा जाणूनियां ॥ ५ ॥ म्हणोनियां तुम्हां येतों काकुळती ॥ आवरा प्रकृती आपुली हे ॥ ६ ॥ येऊं द्यावी कींव कासावीस जीव ॥ आणिक वैभव नको नको ॥ ७ ॥ ब्रह्मा विष्णु शिव जोडिताती करा ॥ काळ तो बिचारा ज्याच्या नामें ॥ ८ ॥ आपले अंकीत उपेक्षी ना कधीं ॥ प्रेमभावबुद्धी देवोनियां ॥ ९ ॥ आनंद म्हणे आम्ही त्याचे लडिवाळ ॥ भिवबूं हा काळ निजनामें ॥ १० ॥

॥ अभंग ३६ ॥

प्रेमभाव तुझ्या हातीं ॥ देह अर्पियला प्रीतीं ॥ १ ॥ कैसें वर्णूं तुझ्या गुणां ॥ मौन झाले चारी जाणा ॥ २ ॥ तुझा तूंचि बोलविता ॥ अवघी जाहली तुझी सत्ता ॥ ३ ॥ आनंद म्हणे माझें नाहीं ॥ मीपण हें आणिक पाहीं ॥ ४ ॥

॥ अभंग ३७ ॥

देवा येतों काकुळती ॥ माझी ऐकावी विनंती ॥ १ ॥ प्रेमदान मज द्यावें ॥ खरें भजनीं रंगवावें ॥ २ ॥ आणिक जिवा आस नाहीं ॥ देह अर्पियेला पायीं ॥ ३ ॥ आतां सांभाळा सांभाळा ॥ बापा दीनाच्या दयाळा ॥ ४ ॥ विश्व व्यापुनियां राहसी ॥ स्वयंब्रह्म म्हणविसी ॥ ५ ॥ आनंद म्हणे हा निधडा ॥ माझ्या जीवींचा उलगडा ॥ ६ ॥

॥ अभंग ३८ ॥

रूप पाहतां डोळेभरी ॥ जाहलें समाधान अंतरीं ॥ १ ॥ मूर्ति साजिरी गोजिरी ॥ माझ्या समर्थाची खरी ॥ २ ॥ कोटी मदनाची प्रभा ॥ पहावा लावण्याचा गाभा ॥ ३ ॥ तेज पाहतां हें अरूप ॥ ब्रह्म देखिलें स्वरूप ॥ ४ ॥ आनंद म्हणे निर्गुण ॥ जाहला कलींत कारण ॥ ५ ॥

॥ अभंग ३९ ॥

भक्तवत्सल देव खरा ॥ ज्याचा दासांसी आसरा ॥ १ ॥ माय सांभाळी सांभाळी ॥ नाम घेतां प्रतिपाळी ॥ २ ॥ खरी मनाची कळवळ ॥ पुरवी बाळाचे लडिवाळ ॥ ३ ॥

दीनवत्सल म्हणविली ॥ प्रेमपाशें ही बांधिली ॥ ४ ॥
एक भावाच्या कारणीं ॥ लोभ वागवितो जनीं ॥ ५ ॥
आनंद म्हणे करुणावंत ॥ सखा माझा हा समर्थ ॥ ६ ॥

॥ अभंग ४० ॥

अन्याय कोटी घालूनियां पोटीं ॥ पाहावें कृपादृष्टि नाम गातां ॥ १ ॥ ब्रीद हें आपुलें ओळखोनी घ्यावें ॥ विचारूनि पाहावें मनालागीं ॥ २ ॥ बाळ तें अज्ञान माय कृपावंत ॥ जग हें विख्यात चालविलें ॥ ३ ॥ आनंद म्हणे बापा कृपेच्या सागरा ॥ सख्या दिगंबरा गुरुराया ॥ ४ ॥

॥ अभंग ४१ ॥

अगा गुरुराया अगा कृपावंता ॥ अगा हे समर्था मायबापा ॥ १ ॥ अनाथाच्या नाथा पतितपावना ॥ ब्रीद हें कारणा धरियेलें ॥ २ ॥ ठावें ज्याचें तया असे हेंचि गूज ॥ आम्हांलागीं बीज लाधलें हें ॥ ३ ॥ सांपडली कळा मुळींचीही खूण ॥ दिली आठवण कृपासिंधु ॥ ४ ॥ आनंद म्हणे माझी वाणी निरवावी ॥ बोलतां वचन तुमचें तुम्हीं ॥ ५ ॥

॥ अभंग ४२ ॥

माझें सुख दुःख आणिक तें हित ॥ तुझे पायीं हेत सदोदित ॥ १ ॥ आणिक आवड नसे नसे जोड ॥ जोडियली जोड प्रेमभावें ॥ २ ॥ सगुणीं व्यापक व्यापुनियां गेला ॥ निर्गुणीच ठेला स्वामी माझा ॥ ३ ॥ स्वामी माझा एक ब्रह्मांडनायक ॥ कृपेचें कौतुक काय सांगूं ॥ ४ ॥ काय सांगूं तुम्हां आतां याची गोडी ॥ भवभय तोडी क्षणमात्रें ॥ ५ ॥ क्षणमात्रें विश्व रंगूनियां गेलें ॥ आपणाऐसे केले कितीएक ॥ ६ ॥ आनंद म्हणे बीज गुजाचिये ठायीं ॥ पेरीतसे पाहीं जगालागीं ॥ ७ ॥

॥ अभंग ४३ ॥

धन्य जिणें माझें झालें ॥ तुझीं देखिलीं पाऊलें ॥ १ ॥ पूर्वसुकृताच्या कोटी ॥ म्हणुनी जाहली तुझी गांठी ॥ २ ॥ पाप ताप दैन्य गेलें ॥ देह रंगासी आणिलें ॥ ३ ॥ जाणुनि सत्रावीची कळा ॥ ब्रह्म ठायासी आकळा ॥ ४ ॥ आनंद म्हणे धन्य केलें ॥ जगीं तुझें म्हणविलें ॥ ५ ॥

॥ अभंग ४४ ॥

ऐका ऐका गुरुराया ॥ माझ्या जीवींच्या विसांव्या ॥ १ ॥

मूळ मुळींचा आकारू ॥ तूंच गुरू निराकारू ॥ २ ॥
रूपापासुनी तत्त्वें केलीं ॥ ज्याचे आंगीं निर्मियेलीं ॥ ३ ॥
धरा आप तेज पाहे ॥ वायु आकाश देखत आहे ॥ ४ ॥
मूळ सूक्ष्मींचा थारा ॥ सच्चिद्रूपींच्या आकारा ॥ ५ ॥
जयापासूनि आनंद झाला ॥ मूळ ओंकार हा केला ॥ ६ ॥
तीन गुणांच्या मंडणीं ॥ अर्धं मात्रा खेळे जनीं ॥ ७ ॥
स्थिरचरींचा आकारू ॥ विश्वब्रह्म जाण गुरु ॥ ८ ॥
आनंद म्हणे स्वामीराणा ॥ आम्हीं देखिलें निर्गुणा ॥ ९ ॥

॥ अभंग ४५ ॥

काय सांगू तुजपाशीं ॥ एक इच्छा ही मानसीं ॥ १ ॥
प्रेम द्यावें घडोघडी ॥ हीच जीवाची आवडी ॥ २ ॥
देह नामें रंगुनि जावा ॥ भाव भजनीं आणावा ॥ ३ ॥
तोडीं तोडीं मायापाश ॥ आनंद जीवासी उदास ॥ ४ ॥

॥ अभंग ४६ ॥

नको नको गा अन्हेरूं ॥ तूं माय मी लेंकरूं ॥ १ ॥
कोण पाहील जडभारी ॥ कोण होईल कैवारी ॥ २ ॥
कोण निवारिता दुःख ॥ कोणा सांगू सुख दुःख ॥ ३ ॥
आनंद म्हणे करुणावंता ॥ सख्या ऐकावें समर्था ॥ ४ ॥

॥ अभंग ४७ ॥

तुझ्या नामाची ही जोडी ॥ जीवीं माझ्या कीं आवडी ॥ १ ॥
प्रेमें ओंवाळिली काया ॥ भाव ठेवूनियां पायां ॥ २ ॥
जाहलों जाहलों मी उदास ॥ आतां कैंचा मायापाश ॥ ३ ॥
भवभार भार काय ॥ भावें धरिले तुझे पाय ॥ ४ ॥
काळ आणूं लोटांगणीं ॥ तुझ्या नामाचे स्मरणीं ॥ ५ ॥
आनंद म्हणे निर्वाण ॥ बापा ऐकावें वचन ॥ ६ ॥

॥ अभंग ४८ ॥

परम सुंदर सुंदर ॥ स्वामीरूप मनोहर ॥ १ ॥
डोळां पाहीन आवडी ॥ प्रेमें पायीं देईन दडी ॥ २ ॥
नका करूं जी वेगळा ॥ हेंचि मागतों दयाळा ॥ ३ ॥
माझा भाव तुमच्या पाया ॥ प्रेम तुमचें स्वामीराया ॥ ४ ॥
आनंद म्हणे निर्गुणा ॥ पाठी राखावें सगुणा ॥ ५ ॥

॥ अभंग ४९ ॥

सोंपविला जरी भार ॥ देवा सोसावा जंजार ॥ १ ॥
दिल्या वचना आठव करा ॥ भक्तवत्सला दातारा ॥ २ ॥
सर्व व्यापूनियां राहसी ॥ मज कां गा अव्हेरिसी ॥ ३ ॥
तुझ्यावीण अन्य सुख ॥ मज नाहीं तें कौतुक ॥ ४ ॥

अवघा जिवाचा सोहळा ॥ तुझ्या प्रेमाचा कळवळा ॥ ५ ॥
सर्वां भूतींच्या विसांव्या ॥ प्राणमय परमात्मया ॥ ६ ॥
आनंद म्हणे निराकारा ॥ तुज नमूं दिगंबरा ॥ ७ ॥

॥ अभंग ५० ॥

काय सांगूं तुज देवा ॥ ऐशी घ्यावी माझी सेवा ॥१॥
जाहलों जिवासी उदार ॥ तुझ्या पायींचा किंकर ॥ २ ॥
काळ येई लोटांगणीं ॥ विश्व लोळेल आंगणीं ॥ ३ ॥
आनंद म्हणे कृपावंत ॥ सखा पाहील समर्थ ॥ ४ ॥

॥ अभंग ५१ ॥

नको पाहूं आतां अंत ॥ जरी होसी कृपावंत ॥ १ ॥
ब्रीद तुझेंचि दातारा ॥ दीनानाथ आठव करा ॥ २ ॥
श्रीगुरुनामाचा हा धाक ॥ करी दुरितांची राख ॥ ३ ॥
पूर्ण ब्रह्म निराकारा ॥ श्रीगुरुराया जी अवतारा ॥ ४ ॥
जागें व्हावें करुणाकरा ॥ घेणें जरी अवतारा ॥ ५ ॥
आनंद म्हणे कींव करीं ॥ जरी धरिलें पदरीं ॥ ६ ॥

॥ अभंग ५२ ॥

अगा माझ्या गुरुराया ॥ सख्या तूं सदया दीनबंधू ॥१॥
जोडूनियां कर येतों काकुळती ॥ ऐकावी विनंती बाळकाची

॥ २ ॥ नको मज कांहीं अन्य दुजें पाहीं ॥ प्रेमभाव देहीं रंगवावा ॥ ३ ॥ नाम तुझें गोड मनासी आवड ॥ कल्पना ही तोड वासनेची ॥ ४ ॥ आनंद म्हणे बापा अगा गुरुराया ॥ सख्या तूं सदया दीनबंधू ॥ ५ ॥

॥ अभंग ५३ ॥

जगीं तूंचि कृपामूर्ति ॥ माझी ऐकावी विनंती ॥ १ ॥
येतों येतों काकुळती ॥ कर जोडोनि तुम्हांप्रती ॥ २ ॥
नको करूं निष्ठुर मना ॥ पाहें ब्रीदाच्या कारणा ॥ ३ ॥
आनंद म्हणे सांभाळिलें ॥ मातागर्भीं बाळ आपुलें ॥ ४ ॥

॥ अभंग ५४ ॥

कोणा येऊं काकुळती ॥ कोण थोर या जगतीं ॥ १ ॥
कोण हरी जडभारी ॥ कोण दासाचा कैवारी ॥ २ ॥
कोणा सांगूं सुख दुःख ॥ पाहूं कोणाचें हें मुख ॥ ३ ॥
कोण कुरवाळी प्रेमभावें ॥ आपुलें म्हणोनि स्वभावें ॥ ४ ॥
आनंद म्हणे लडिवाळ ॥ माता पुरवी त्याची आळ ॥ ५ ॥

॥ अभंग ५५ ॥

तुज येतों काकुळती ॥ कैशी होईल आमुची गती ॥ १ ॥
कोण सांभाळी दातारा ॥ तुजवीण नाहीं थारा ॥ २ ॥

निद्रा सोडा कृपावंता ॥ उठा उठा जी समर्था ॥ ३ ॥ युगायुगीं दास झाले ॥ निद्रा सोडूनि उठविलें ॥ ४ ॥ तयालागीं खटपट ॥ वेद करिती गोंगाट ॥ ५ ॥ मजसाठीं जड झाला ॥ कैसी निद्रा आली तुला ॥ ६ ॥ आनंद म्हणे करुणाकरा ॥ आतां उठावें दातारा ॥ ७ ॥

॥ अभंग ५६ ॥

तुज पाहीन मी डोळां ॥ माझा पुरवीन सोहाळा ॥ १ ॥ जिवा जीवीं समाधान ॥ तुज देईन आठवण ॥ २ ॥ सुखदुःख हरुनी जातां ॥ मग कैंची भवचिंता ॥ ३ ॥ आनंद म्हणे देह जड ॥ परी तारिले दगड ॥ ४ ॥

॥ अभंग ५७ ॥

कां केलें निष्ठुर मना ॥ बापा सांगा करुणाघना ॥ १ ॥ बोला बोला मंजुळ वाणी ॥ शब्द पडो माझ्या कानीं ॥ २ ॥ माझा पुरावा मनोरथ ॥ सखा खरा कीं समर्थ ॥ ३ ॥ आनंद म्हणे ओंवाळिली ॥ पायीं तनु ही आपुली ॥ ४ ॥

॥ अभंग ५८ ॥

नको नको दारा धन ॥ नको आणिक वतन ॥ १ ॥ तुज पाहीन डोळांभरी ॥ प्रेमभाव हा अंतरीं ॥ २ ॥

हेंचि इच्छीं सदोदित ॥ माझा पुरवावा हेत ॥ ३ ॥
आनंद म्हणे करुणावंता ॥ गुरुराया तूं समर्था ॥ ४ ॥

॥ अभंग ५९ ॥

कां हो केलें निष्ठुर मना ॥ सांगा आतां कृपाघना ॥ १ ॥
इभ स्मरणीं तारिला ॥ नाहीं आठव कैसी तुला ॥ २ ॥
भक्त प्रल्हाद तारिसी ॥ नरहरी होणें घडलें तुसी ॥ ३ ॥
काय सांगूं हा विचार ॥ पापी अजामीळ पार ॥ ४ ॥
ध्रुव अढळ कीं झाला ॥ उपमन्यु बाळ ध्याईयला ॥ ५ ॥
किती आठवूं दातारा ॥ तुम्हीं केलें उपकारा ॥ ६ ॥
देवा कृपावंत होसी ॥ कृपें जिवासी तारिसी ॥ ७ ॥
आनंद म्हणे श्रीगुरुनाथा ॥ सख्या ऐकावें समर्था ॥ ८ ॥

॥ अभंग ६० ॥

घडोघडी मना प्रेमाचा उल्हास ॥ नको आशापाश तिळभरी ॥ १ ॥ नको तें बंधन मोहाचें कारण ॥ ठेवीं उदासीन सदोदित ॥ २ ॥ प्रेमानंद काळ बोध हा निर्मळ ॥ बोलवी रसाळ घडोघडीं ॥ ३ ॥ आणिक ती आस नाहीं नाहीं खास ॥ जाहलों गा उदास जीवें भावें ॥ ४ ॥ नको धन वित्त नको राज्यभार ॥ नको हा संसार माया-

पाश ॥ ५ ॥ कारणीं कारण त्यागविलें मन ॥ शोधासी सगुण देखियेलें ॥ ६ ॥ सगुणीं मुरालों निर्गुणी मी झालों ॥ परब्रह्म ठेलों निज अंगें ॥ ७ ॥ आनंद म्हणे कला जिवासी आकला ॥ ज्ञानयोगबळा करूनियां ॥ ८ ॥

॥ अभंग ६१ ॥

नको नको मना धरूं अन्य आस ॥ होईं रे उदास जीवेंभावें ॥ १ ॥ शोधोनियां पहातां मृगजल सारा ॥ मोहक पसारा विश्वमाया ॥ २ ॥ व्यापूनियां गेला भरूनियां आला ॥ तारक तो जाहला जीवालागीं ॥ ३ ॥ काय उणें आहे सांग त्याच्या घरा ॥ माय ती लेंकरा कष्टवीना ॥ ४ ॥ जलतरंगींचा रंग हाचि सारा ॥ देखिला पसारा मायासंगें ॥ ५ ॥ आशापाशें जन मोहूनियां गेले ॥ बंधासी पावले नाना योनी ॥ ६ ॥ तुझें नाहीं कोणी तुझें नाहीं कोणी ॥ घेईं ओळखूनि निज जीवा ॥ ७ ॥ पांच तत्त्वां रूपीं रूपासी आगळा ॥ ब्रह्मखेळ खेळा खेळविला ॥ ८ ॥ समाधान होणें मुरूनियां जाणें ॥ ओळखूनि घेणें निज रूपा ॥ ९ ॥ आनंद म्हणे मना मुरवूनि घ्यावें ॥ ब्रह्मसुख पहावें घडोघडीं ॥ १०॥

॥ अभंग ६२ ॥

श्रीगुरुनामानें तरती हे जन ॥ वाचे नित्यनेम ठेवि-
लिया ॥ १ ॥ ठेविल्यानें खरे चुकती हे फेरे ॥ गर्भवास
तो रे नाहीं तयां ॥ २ ॥ नाहीं तयां कांहीं आणिक
उपाधी ॥ दूर होय व्याधी दुरिताची ॥ ३ ॥ दुरिताचा
नाश तोडी भवपाश ॥ जाहलिया दास समर्थांचा ॥ ४ ॥
समर्थांचा दास भवाचा हा नाश ॥ तोडी मायापाश नाम
गातां ॥ ५ ॥ नाम गातां जन तरतील जाण ॥ वचन
प्रमाण कलियुगीं ॥ ६ ॥ कलियुगीं माझें तारक नेमाचें ॥
बोलणें हें साचें माना तुम्ही ॥ ७ ॥ माना तुम्ही जन
सोडा अभिमान ॥ दुरिता कारण करूं नका ॥ ८ ॥
करूं नका तुम्ही फुका ही धुमाळी ॥ आयुष्याची होळी
होत असे ॥ ९ ॥ होत असे खरी नरदेह-हानी ॥
तारक निशाणी देतों तुम्हां ॥ १० ॥ देतों तुम्हां घ्या रे
अमोल मोलाचें ॥ भवालागीं साचें कामा येत ॥ ११ ॥
कामा येत तुम्हां जडांसी तारील ॥ दुःखासी हरील शरण
गेल्या ॥ १२ ॥ शरण गेल्या प्राणी वायां नाहीं गेला ॥
पुरातन दाखला पहा तुम्हीं ॥ १३ ॥ पहावें तुम्हीं तरी
आत्मा हा निर्मळ ॥ साधु हा व्याकुळ तुम्हांलागीं ॥ १४ ॥

तुम्हांलागीं बाहे नेतो भवपार ॥ दंभाचा संसार करूं नका ॥ १५ ॥ संसारासी जाण कारण त्या खूणा ॥ वेद तो प्रमाणा बोलियेला ॥ १६ ॥ बोलियेल्या तरी श्रुतिही निर्धारी ॥ मौन झाल्या चारी म्हणोनियां ॥ १७ ॥ म्हणोनियां तुम्हां सांगतसें वाचे ॥ प्रेम तें जीवाचें सोडूं नका ॥ १८ ॥ सोडूं नका तुम्ही आत्मींचा हा राम ॥ श्रीगुरु आराम करी तुम्हां ॥ १९ ॥ करी तुम्हां खरें ब्रह्म तें निर्मळ ॥ मग तो व्याकुळ जीव कैंचा ॥ २० ॥ जीव कैंचा उरे आरम एक पहा रे ॥ ब्रह्म तें गोजिरें देखियेलें ॥ २१ ॥ देखियेलें डोळां आपणा आपण ॥ झालें समाधान तयांलागीं ॥ २२ ॥ तयांलागीं नाहीं नाहीं भवचिंता ॥ हरियेली व्यथा भ्रममाया ॥ २३ ॥ भ्रममाया सरे श्रीगुरु उच्चारें ॥ चुकतील फेरे गर्भवास ॥ २४ ॥ गर्भवास नाहीं तयांसी हा जाण ॥ तारक प्रमाण जीवालागीं ॥ २५ ॥ जीवालागीं जाहला तोचि तारावया ॥ सद्गुरूची माया जोडियेली ॥ २६ ॥ दयेचें कारण शांतीतें प्रमाण ॥ विवेक विज्ञान जोडे तेथें ॥ २७ ॥ जोडे तेथें जोड ब्रह्मींची ही खूण ॥ देतों आठवण जगालागीं ॥ २८ ॥ जगालागीं माझी हिताची

सूचना ॥ तारक प्रमाणा कलियुगीं ॥ २९ ॥ कलियुगीं खरी हीच भवतरी ॥ भवासी उतरी प्रेमछंदें ॥ ३० ॥ प्रेमछंदें घ्या रे वाचुनियां पहा रे ॥ कुळ त्याचें तरे भवालागीं ॥ ३१ ॥ आनंद म्हणे तरी नित्य पाठ करा ॥ स्वामी त्याच्या घरा वसतसे ॥ ३२ ॥

॥ धांवा २ ॥

गुरुराया ॥ नरहरि दत्तात्रेया ॥ येईं येईं बा ॥ करुणासागरा ॥ पुरुषोत्तमा ॥ नरहरि कल्पद्रुमा ॥ अठरा पुराणां ॥ तव महिमा ॥ न कळे निगमागमा ॥ पतितपावना ॥ करुणालया ॥ नरहरि दत्तात्रेया ॥ येईं येईं बा ॥ गुरुराया ॥ स्वामी दत्तात्रेया ॥ येईं येईं बा ॥ ध्रु० ॥ १ ॥ तापत्रयानें तापविलें ॥ देह माझें कष्टविलें ॥ कोठें विश्रांति नाढळे ॥ चरण तुझे सांपडले ॥ आतां कृपेची ॥ करीं छाया ॥ नरहरि दत्तात्रेया० ॥ २ ॥ कामक्रोधादि ॥ अहंकार ॥ उठती वारंवार ॥ अंगीं मातला ॥ अविचार ॥ पडला अंधकार ॥ स्त्रिया पुत्रांची ॥ बहुमाया ॥ न० ॥ ३ ॥ वर्णूं तुझी कीर्ति ॥ लवलाहीं ॥ रजकाला पाच्छाई ॥ दिधली क्षणांत बा ॥ तूं काई ॥ तूंचि बाप माई ॥

अघटित घटना तुझी ॥ श्री सखया ॥ न० ॥ ४ ॥
नवस करुनि तुला ॥ निघाला ॥ धनिक उदीमा गेला ॥
लाभ चौगुणी त्या झाला ॥ चोरांनीं मारिला ॥ तस्कर
वधूनियां ॥ उठविसि तया ॥ न० ॥ ५ ॥ अन्न भक्षितां
उठे शूळ ॥ विप्र करी तळमळ ॥ प्राण त्यागितां ॥ तात्काळ ॥
आणविसि आपणाजवळ ॥ अन्नचि औषध दे ॥ भक्षाया ॥
न० ॥ ६ ॥ करविर क्षेत्रींचा ॥ द्विजपुत्र ॥ विद्येविण
अपवित्र ॥ जिव्हा छेदुनियां ॥ अहोरात्र ॥ करि भुवनेश्वरी
स्तोत्र ॥ देसी चौदाही ॥ विद्या तया ॥ न० ॥ ७ ॥
अन्नपूर्णा तुज ॥ कर जोडी ॥ पक्कान्नें बहु वाढी ॥
घेवड्या शेंगांची ॥ तुज गोडी ॥ भला दीनांचा गडी ॥
देसी घागर ॥ भरून ॥ पुतळ्या तया ॥ न० ॥ ८ ॥
शिरोळ ग्रामींची ॥ द्विजनारी ॥ पुत्रा समंध मारी ॥
ठेवी कलेवर ॥ औदुंबरीं ॥ म्हणे पाव श्रीहरी ॥ उठविसि
तात्काळ ॥ पुत्रा तया ॥ न० ॥ ९ ॥ वांझ महिषीचें ॥
दुग्ध पिसी ॥ विप्रस्त्री सुखविसी ॥ पतितामुखिं वेद ॥
बोलविसी ॥ द्विजगर्वा छेदीसी ॥ नकळे कवणाला ॥
तव चर्या ॥ न० ॥ १० ॥ त्रिविक्रम भारती ॥ करि निंदा ॥
म्हणे हा दांभिक धंदा ॥ विश्वरूप तया ॥ मुकुंदा ॥

दाखविसी गोविंदा ॥ नरसिंह सरस्वती ॥ गुरुराया ॥ न० ॥ ॥ ११ ॥ माहुर पुरींचा ॥ रोगी पती ॥ घेऊनि निघाली सती ॥ मार्गीं मरण आलें ॥ तयाप्रती ॥ करि बहु काकुळती ॥ देशी अभय तया ॥ सौभाग्या ॥ न० ॥ १२ ॥ सत्कर्माचरणीं बहुश्रुत ॥ नेमें वरिलें चित्त ॥ परान्न भक्षाया ॥ उद्युक्त ॥ स्त्री बहु तळमळीत ॥ आज्ञा देउनियां ॥ दंपत्या ॥ विपरीत देखे जाया ॥ आली बा भेटाया ॥ तव पायां ॥ न० ॥ १३ ॥ तीन पात्रांची ॥ सामुग्री ॥ ब्राह्मण भिक्षा करी ॥ छाटी झांकुनियां ॥ अन्नावरी ॥ जेविले सहस्र चारी ॥ कीर्ती झाली बा ॥ जगत्रया ॥ न० ॥ १४ ॥ साठ वर्षांची ॥ म्हातारी ॥ वंध्या पदर पसरी ॥ करुणा येऊं दे ॥ तुज नरहरी ॥ देसी पुत्र कुमारी ॥ समर्थ दुःखचि तूं ॥ हराया ॥ न० ॥ १५ ॥ श्वेतकुष्टानें ॥ व्यापिला ॥ ब्राह्मण धांवत आला ॥ रक्षीं रक्षिं म्हणे ॥ दयाळा ॥ शुष्क काष्ठ द्रुम केला ॥ निर्मळ झाली बा ॥ तत्काया ॥ न० ॥ १६ ॥ तंतुक भक्त तुझी ॥ करि सेवा ॥ म्हणे पाव गा देवा ॥ दर्शन श्रीशैल्य ॥ महादेवा ॥ करविसी केशवा ॥ मातापिता तूं ॥ गुरुराया ॥ न० ॥ १७ ॥ देवा दिपावळीचे दिवशीं ॥ अष्टरूप झालासी ॥ भिक्षा आठ गृहीं ॥ तूं घेसी ॥

दीनबंधु म्हणविसी ॥ करिशी भक्तार्थी ॥ बहुमाया ॥ न० ॥ १८ ॥ गाणगापुरींचा ॥ कुळवाडी ॥ मार्गी उभा कर जोडी ॥ आडवा पडे पुढें ॥ घडोघडी ॥ पीक हजारों खंडी ॥ देशी शूद्राला ॥ स्वामिया ॥ न० ॥ १९ ॥ सायंदेवपंत ॥ निजभक्त ॥ तव भजनीं आसक्त ॥ दिधलें तयासि बा ॥ निज तत्त्व ॥ अशा कथा अनंत ॥ शेषादिक थकले ॥ गुण गाया ॥ न० ॥ २० ॥ केवळ मतिमंद ॥ पातकी ॥ बहु जन्मांचा दुःखी ॥ महादेवात्मजा ॥ करा सुखी ॥ कृपादृष्टि अवलोकीं ॥ ठेवा हात शिरीं ॥ करा दया ॥ न० ॥ २१ ॥

॥ धांवा २ ॥

येईं बा गुरुराया ॥ मज घे पदरीं ॥ लोटेना भवसिंधु ॥ बळिया लहरी ॥ येईं बा० ॥ ध्रु० ॥ मायेचा पूर लोटे ॥ मज वाहवितो ॥ काळाचें भय वाटे ॥ तुज आठवितों ॥ युगसम बहु कष्टी बा ॥ दिस घालवितों ॥ तुजसाठीं उर दाटे ॥ जीव आळवितों ॥ येईं बा० ॥ १ ॥ कोठें न गमे देवा ॥ हरि काय करूं ॥ कोणातें दुःख सांगूं ॥ गुरु कल्पतरू ॥ आतां तुजविण दत्ता ॥ किति धीर धरूं ॥ भेटाया गुणराशी ॥ तप कोण करूं ॥ येईं बा० ॥ २ ॥ कोण दुजा प्रणेता बा ॥ प्रतिपाळ करी ॥ तुजविरहित

मज नाहीं ॥ गति बा दुसरी ॥ बुडतों या भवडोहीं ॥ करीं कोण धरी ॥ देवा श्रम झाले बा ॥ मम दुःख हरीं ॥ येईं बा० ॥ ३ ॥ योगीजनमनरमणा ॥ जननी जनिता ॥ देवा बहु दिन जाहले ॥ मज चाळवितां ॥ कैसें मज दुःख झालें ॥ शिरीं तूं असतां ॥ स्वामी तूं गुरु माझा ॥ भव उद्धरिता ॥ येईं बा० ॥ ४ ॥ प्राणविसांवा माझा ॥ हरि तूं असभी ॥ सागर तूं करुणेचा ॥ मज कां छळिसी ॥ सुरजनमुनि सकळांच्या ॥ हृदयीं वससी ॥ सेवक मी हरि तूझा ॥ दुरी कां धरिसी ॥ येईं बा० ॥ ५ ॥ तव विरहें मम नयनीं ॥ जळ पाझरतें ॥ लव पळ आयुष्य माझें ॥ हरि हें सरतें ॥ साधन काय करूं मी ॥ मन ना परते ॥ जिवलग तूं कधीं येसी ॥ मन घाबरतें ॥ येईं बा० ॥ ६ ॥ खलाची हद झाली ॥ मति ही भ्रमली ॥ नाहीं धीर दयाळा ॥ वृत्ती डळमळली ॥ तव पदसेवा कांहीं ॥ मज नाहीं घडली ॥ निरपेक्षा हरि माझी ॥ भुल कां पडली ॥ येईं बा० ॥ ७ ॥ कैसा तरी गुरुवर्या ॥ तव दास असें ॥ सम्यक् सगुण रूप तुझें ॥ नयनीं विलसे ॥ नारायण विनवी ॥ पंथ पाहतसे ॥ स्वामी निरंजन दत्ता ॥ पदीं लागतसे ॥ येईं बा० ॥ ८ ॥

॥ आरती ॥

आरती विश्वहिरजनाची ॥ मम मानस गुरुघनाची ॥ध्रु०॥ सोहंकार मूळस्वरूप विश्वगुणभजनाची ॥ १ ॥ बीजरूप हें ओंकार दावुनि त्रिगुणरहित निर्गुणाची ॥ २ ॥ वेदहि नेति म्हणोनि वदती प्रीति जया स्वरूपसदनाची ॥ ३ ॥ मुनिवर नित्य निरंतर स्मरणी धरती ज्याची ॥ ४ ॥ बोधहि वाणी श्रुति निशाणी जगतारक आनंदाची ॥ ५ ॥ आरती० ॥

॥ आरती ॥

आरती स्वामीराजा ॥ भक्तवत्सल खरा माझा ॥ अवतार पूर्ण ब्रह्म ॥ कोण वर्णी तुमच्यां तेजा ॥ ध्रु० ॥ निराकार निर्गूण ॥ भक्तांसाठीं तूं सगूण ॥ तुमच्या नामाची ती खूण ॥ तारितसे तिहीं जगा ॥ १ ॥ आरक्तवर्ण तनु शोभे ॥ तिहीं लोकीं ब्रीद गाजे ॥ टोपी टिळा माळा ॥ गळां रुद्राक्ष आगळा ॥ कैसा शोभतो हा तेजा ॥ २ ॥ केशराची उटी जाणा ॥ काय ध्यान आणूं मना ॥ पाहातां योगियांचा राणा ॥ जेणें बोलविला आनंद माझा ॥ ३ ॥

॥ पाळणा ॥

बाळा जो जो रे ॥ जो जो रे निर्गुणा ॥ हे गुणसदना ॥ ॥ ध्रु० ॥ हे अद्वयभजना ॥ मम मानसरंजना ॥ तुज घालुनि पर्यंकीं ॥ हालविते निजछंदें अंकीं ॥ १ ॥ मूळ मायेचा, मायेचा निर्मिता ॥ अवघी तुझी सत्ता ॥ शक्ती नाहीं, नाहीं वर्णितां ॥ शेषालागीं ताता ॥ २ ॥ अनंत भूजा, भुजांचें मंडण ॥ रूप अनुवाद जाण ॥ देखोनी अवघें ध्यान ॥ भक्तांचें कारण ॥ ३ ॥ आनंद म्हणे हालवूं ॥ मनसूत्रदोरी पाहूं ॥ निजछंदें तुजला गाऊं ॥ प्रेमानंदें राहूं ॥ ४ ॥

समाप्त